कोणत्याही शक्तीचा उपयोग रचनात्मक किंवा विध्वंसात्मक कसाही होऊ शकतो. विचाराची शक्ती अशीच असते. विचार पुरोगामी असल्यास मनुष्याचे उज्ज्वल भविष्य घडू शकते. परंतु ते प्रतिगामी असेल तर विनाशाचे कारण बनतात. अधोगामी विचार मनाला चंचल, क्षुब्ध व असंतुलित करतात. सद्‌विचार मनुष्याला सर्व दृष्टीने उन्नत बनवितात.

मनुष्याचे जीवन त्याच्या विचाराचे प्रतिबिंब असते. सफलता–असफलता, उन्नती–अवनती, महानता–तुच्छता, सुख–दु:ख, शांती–अशांती अशा अनेक बाबी मनुष्याच्या विचारांवर अवलंबून असतात. माणसाच्या विचारसरणीवरून त्याचे मूल्यमापन करता येते. मनुष्य निर्मितीमध्ये त्याच्या विचारांचे महत्त्वपूर्ण स्थान असते. मनुष्य आपल्या विचारांच्या अनुरूप बनतो किंवा बिघडतो. सद्‌विचार उन्नत बनवितात तर हीन विचार त्याला पतीत.

स्वामी विवेकानंद म्हणतात, ‘‘स्वर्ग आणि नर्क कुठे अन्यत्र नाहीत, ते आमच्या विचारात निवास करतात.’’ तर प्रसिद्ध लेखक डेल कार्नेजी आपला अनुभव कथन करताना म्हणतात, ‘‘जीवनात मी एक अतिशय महत्त्वपूर्ण गोष्ट शिकलो आणि ती अशी की, विचारांची अपूर्व शक्ती आणि महत्त्व, विचारांची शक्ती सर्वोच्च व अपार आहेत.’’

सर्वच थोर विचारवंतांनी विचारांची शक्ती व त्यांच्या असाधारण महत्तेचा स्वीकार केला आहे. आमच्या जीवनातील घडामोडींचे संचालन करण्यात विचारसरणीचा मुख्य सहभाग असतो. विचारांच्या प्रेरणाच आमच्या हातून श्रेष्ठत्व, हीनकृत्य घडवितात. हे सारे विश्‍व मनुष्याच्या विचारांच्या छायेतच असते.

Website : www.ascpulgaon.rgbgi.org , E-mail : ascpulgaon@gmail.com
Phone & Fax : 07158-228774

MAHILA VIKAS SANSTHA

# अंतर्नाद




## कला व विज्ञान महाविद्यालय, नाचणगाव - पुलगाव

वार्षिकांक २०१७–२०१८

NAAC ACCREDITED WITH "B" GRADE

## ✻ आमचे प्रेरणास्थान ✻



**Dr. R.G. Bhoyar**
**President**
Mahila Vikas Sanstha, Wardha.
**Chairman**
Dr. R.G. Bhoyar Group of Institutions, Wardha.

## ✻ आमचे मार्गदर्शक ✻



**Dr. Abhijit Verulkar**
**Secretary**
Mahila Vikas Sanstha, Wardha.



**Dr. Vilas V. Hadge**
**Principal**
Arts & Science College, Pulgaon



## NAAC ACCREDITATION AWARD "B+" GRADE AT. BANGLORE




डॉ. वेदप्रकाश चेअरमन, यू.जी.सी., डॉ. रंगनाथन, डॉ. दिनेश सिंह यांचे कडून पुरस्कार स्वीकारताना कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. हाडगे

# कला व विज्ञान महाविद्यालय
# नाचणगाव–पुलगाव

# अंतर्नाद

## वार्षिक अंक: २०१७–१८


**अध्यक्ष**

प्राचार्य, डॉ. विलास हाडगे

**कार्यकारी संपादक**

प्रा. काशीनाथ तरासे

–० सहायक संपादक ०–

डॉ. सतीश चहांदे

डॉ. संदीप हातेवार

प्रा. सचिन भोयर

मुखपृष्ठ : श्री सनदकुमार भैसारे

## प्राचार्यांचे मनोगत

महाविद्यालयाच्या 'अंतर्नाद' वार्षिकांकाच्या रूपाने मनोगत व्यक्त करताना अतिशय आनंद होत आहे. दरवर्षी साकारणाऱ्या वार्षिकांकामधून विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेच्या भावनांचा अविष्कार शब्दरूपाने साकारतो. त्याला दिशा देण्याचे काम महाविद्यालायाचा वार्षिकांक करीत आहे. यावर्षी महाविद्यालयाचे सहा विद्यार्थी विद्यापीठ पारीक्षेत गुणवत्ता यादीत आलेले आहेत त्याचा आम्हाला अभिमान वाटतो. विद्यापीठ स्तरावर घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी साहित्य, संगीत, नृत्य, कला, वक्तृत्व, निबंध, आणि क्रीडा इत्यादी विविध क्षेत्रात घवघवीत यश संपादन करून महाविद्यालयाने गौरवशाली परंपरा कायम राखली आहे.

महाविद्यालयाची सुसज्ज इमारत, निसर्ग सानिध्य प्रशस्त वातावरण, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज अशा प्रयोगशाळा, आकर्षक संगणक कक्ष, अभ्यासनीय वाचनालय शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच इतर पूरक अभ्यासक्रमांना गती देणारा उच्च विद्याविभूषित प्राध्यापक वर्ग, कर्तव्यदक्ष कर्मचारी वर्ग आणि सदा तत्पर, उल्हासित असलेला, प्रतिसाद देणारा विद्यार्थी वर्ग या सर्वांचे हित जोपासणारे व महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगत विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सदा धडपडणारे संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जी. भोयर यांना प्रगतीचे श्रेय दिले जाते.

'अंतर्नाद' वार्षिकांकाचे संपादक प्रा. काशीनाथ तरासे यांच्या धडपडीतून चालू घडामोडींचा आढावा घेणारा एक चांगला अंक प्रकाशित होत आहे. त्यासाठी संपादक मंडळाने घेतलेल्या अथक परिश्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.व या वार्षिकांकास शुभेच्छा देतो!

प्राचार्य

# संपादकीय

हे वर्ष म्हणजे उपक्रमांची रेलचेल! आणि आदर्शांचा कळस. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला उत्तमोत्तम सुविधा इथे प्राप्त होत आहेत आणि त्याला आयुष्यभर पुरणारी विचारांची शिदोरी आम्ही उपक्रमांमधून दूत आहोत. सामाजिक परिवर्तनासाठी केवळ उसासे सोडून व टीका करून चालणार नाही, तर निश्चित मार्ग शोधले पाहिजेत. नवा विचार स्वीकारण्यासाठी चिंतन करून परस्पर विचार विनिमय होणे गरजेचे आहे. हेच काम आम्ही एकदिलाने करीत आहोत. शैक्षणिक प्रवास हा सामाजिक जीवनाशी समांतर असेल तर परिसरासाठी तो फलदायी ठरतो. जमिनीवर घट्ट पाय रोवून थेट गगनाचे पिसे लावणारी मनीषा, चिकित्सक विचारांती स्वीकारून पेरलेली विचारबीजे, संस्काराच्या रोपट्यातून मिळणारा सकारात्मक हुंकार आणि मनामनातून गुंफलेली कृतिगीते याने आमची ओंजळ भरलली आहे. विद्यार्थी शिक्षकांचे नाते दृढ मैत्रीत बदलून मित्रमेळा स्थापन झाल्यावर राष्ट्रीय एकात्मतेसाठी वेगळा उपक्रम करावयाचे प्रयोजनच शिल्लक राहणार नाही. याचा वस्तुपाठ आमच्या विद्यार्थ्यांनी घालून दिला. हा पायंडा निश्चित विश्वासाचा भक्कम आधार देणारा ठरला.

वार्षिकांक हा महाविद्यालयाच्या प्रगतीचा केवळ आलेख नसतो तर नव्या तरुण प्रतिभेची स्पंदने वार्षिकांकाने अविष्कृत करावयाची असतात. अंतर्नाद या वार्षिकांकात अशीच महाविद्यालयातील उमलणाऱ्या तरुण प्रतिभेची दखल घेतली आहे. समाजाचा एक घटक म्हणून विद्यार्थी जे पाहतो, अनुभवतो त्याचे प्रतिबिंब शब्द रूपाने बाहेर पडतात. त्यांच्या शब्दातील वेदना, प्रेम, सहानुभूती, हळहळ, समाजाभिमुखता याबद्दल आपल्या परीने व्यक्त होत असतात. या भावनांना मूर्त रूप देण्याची जबाबदारी 'अंतर्नाद' करीत आहे. या वार्षिकांकाच्या निर्मितीत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. प्राचार्यांनी व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी वार्षिकांकाच्या निर्मितीसाठी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार!

**संपादक**

# अंतरंग

## लेख


- माझ्या शेतकऱ्याचे मनोगत– अक्षय कराळे .................. १
- चांगल्या लोकांना ओळखाळला शिका–मयुरी चिरडे ................. २
- बालकवी व निसर्ग यांचे नाते–सोनाली येसकर ................. ३
- गं. बा. सरदार यांच्या साहित्याचा परिचय–आरती बमनोटे ................. ४
- मराठी निबंध वाङ्मयाचे प्रकार व त्याची जडणघडण–प्रफुल नागोसे .................. ६
- भालचंद्र नेमाडे यांच्या कविता–वैशाली चवरे ......................... ८
- प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्याची राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी–योगेश ठाकरे .................... १०
- मराठीच्या वऱ्हाडी, अहिराणी, डांगी आणि कोकणी बोलींचा स्वनिम प्रक्रिया, व्याकरण प्रक्रिया, शब्दसंग्रह–शाम दरणे ........................... ११
- दलित कथा–प्रतीक भोयर ................................... १४
- लोकसाहित्याचे संकलन व संशोधन–स्नेहा ठाकरे ................... १६
- लोसाहित्याचे स्वरूप–आम्रपाली घरडे .............................. १८
- मराठी वैचारिक साहित्याची जडणघडण–करिश्मा उमक ................. २०
- मराठी निबंध वाङ्मय : स्वरूप–निशिगंधा उमक.................... २३
- मराठी वैचारिक साहित्याचा उगम : कारणमीमांसा–शीतल वाढवे ................................................ २६
- वैचारिक साहित्यनिर्मितीची उद्दिष्ट्ये–शिवानी देऊळकर ......................... २८
- वैचारिक साहित्य : संकल्पना व स्वरूप–तृप्ती गावंडे ....................... ३१
- उत्तम समीक्षेचे/समीक्षकाचे गुणविशेष–स्नेहा दाभाडे ...................... ३४
- समाजशास्त्रीय समीक्षापद्धती–पायल काकडे .......................... ३६
- उत्खनन–चेतना रावेक . ................................. ३९
- मराठी साहित्यातील स्त्री–जयश्री कोकांडे .............................. ४१
- चांगले आरोग्य–विक्की रंगारी .............................. ४२
- Ethics in Research : A Perspective – Madhuri Thote ......... 43
- Gandhi and Vegetarianism – Nikhil Bhende ....................... 44
- Personality Development and English Communication Skills – Hemlata Sonawane ................................ 45
- Gandhi and Gender Equality – Aniket Deogade .................... 47
- R. K. Narayan, Attitude Towards English Language- Nipil Dhore ........... 50

## कविता


- माझा भाऊ—रोशनी थोटे ........................ ५५
- मुलीची किंमत—अमर केवट ......................... ५६
- आई—अपूर्व बैलमारे ............................ ५६
- जीवन—पल्लवी मेहकरे .......................... ५७
- स्त्रीभृणहत्या—दीक्षा रामटेके ......................... ५७
- लोकसंख्या—सूरज होरे ........................... ५८
- आई—सोनल धांदे ............................. ५९
- जीवन हे जगून पहावे—सागर होले ............................ ५९
- शहीद जवान—वसुधरा नान्हे ........................... ५९
- आज का मनुष्य—मीनल श्रीवास्तव ........................ ६०
- बेटी —दामिनी मांढरे .............................. ६०
- Independence – Aachal Atram ………………………….. 61
- My Father – Payal Kelwatkar ……………………….. 61
- I am a Soldier – Aarti Gajbe ……….……………….. 62
- Saluting the Real Heroes – Sanket Dahake ……………….. 62
- Teacher – Mamta Parise ………………… 62
- A Little Seed – Roshan Kale ………………… 63
- Prayer for Peace – Minal Shriwastav ………………… 63
- Mother’s Day – Pragati Kale ………………… 63
- Spring is Here – Roshni Thote ………………….. 64
- Winter Animals – Yogita Ade ………………… 64
- Love is – Vasundhara Nanhe ………………… 64
- My Friends – Diksha Jambhulkar ………………… 64


# *REPORTS*


- College Report ………………….. 65
- IQAC Report ………………… 66
- N. S. S. Report ………………..… 68
- Cultural Report ………………… 69
- Sports Dept. Report ………………… 73
- Library Report ………………… 76



प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. आर. जी. भोयर

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग














विदर्भवादी नेता वामनराव चटप मार्गदर्शन करताना

वेगळ्या विदर्भावर विचार व्यक्त करताना ॲड. दिनेश शर्मा

## महाविद्यालयातील विविध विभागांद्वारे आयोजित विविध व्याख्याने





















## सांस्कृतिक विभाग 'अभिनव कला मंच' द्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन







नृत्य सादर करताना विद्यार्थी





नाटिका सादर करताना विद्यार्थी

दुल्हन मेक अप





फॅशन शो





आनंद मेळावा







**WILD LIFE** रॅलीचे उद्घाटन करताना ब्रिगेडियर आयव्हर गोल्डस्मिथ, संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जी. भोयर आणि मान्यवर





**WILD LIFE** भव्य रॅलीचे आयोजन






**WILD LIFE** सप्ताहाअंतर्गत आंतरविद्यालयीन चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन






आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन

महाविद्यालयाला विदेशी प्रतिनिधींची सदिच्छा भेट

## महाविद्यालयाद्वारे साजरे करण्यात आलेले दिनविशेष






आंतरराष्ट्रीय युवादिन

आंतरराष्ट्रीय ओझोन दिनानिमित्त सायकल रॅलीचे आयोजन





विज्ञान दिनानिमित्त प्रदर्शनीचे आयोजन

मराठी भाषा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन





विज्ञानप्रदर्शनी

वस्त्र प्रदर्शनी





जागतिक योगदिनानिमित्त महाविद्यालयात योग प्रशिक्षणाचे आयोजन

स्वच्छता रॅली





पाणी परीक्षण करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी



फॅशन डिझाईनिंग विभागाच्या विद्यार्थिनी कला कुसरीचे कपडे शिवताना



ICT द्वारे सेमिनार सादर करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी



भारत टेक्सटाइल, पुलगाव येथे औद्योगिक भेटी दरम्यान विविध उपकरणांची माहिती घेताना विद्यार्थी

# क्रीडा विभाग





## महाविद्यालयाद्वारे राबविले गेलेले विविध उपक्रम




गरजू विद्यार्थ्यांना कपड्यांचे वाटप



महाविद्यालयाद्वारे विद्यार्थ्यांना संत्रा कलमांचे वाटप




रद्दी संकलन केंद्र



विद्यार्थी समुपदेशन केंद्र





गरजू व्यक्तींना धान्याचे वाटप करताना प्राध्यापक वर्ग चरख्यावर सूत कताई विषयी अतिथींना माहिती देताना प्राध्यापक



इतिहास विभाग व ग्राम पंचायत नाचणगाव यांच्या संयुक्त आयोजनाने सरईची स्वच्छता, राजे मुधोजी भोसले यांची सरईला सदिच्छा भेट



Moodle cloud online examination



मोफत रक्त तपासणी शिबिर



Moodle cloud online examination1stprize

# आमचे गुणवत्ताधारक

## विद्यापीठ परीक्षेत मेरीट आलेले विद्यार्थी



सोनल श्रीवास्तव
बी. ए. (इतिहास)
पहिला मेरीट



आचल बाजारे
बी. ए. (गृहअर्थशास्त्र)
पहिला मेरीट



दीपा जुनेजा
**B. Sc.**
**Gold Medal(Microbiology)**



काजल उमक
एम. ए. मराठी
तिसरा मेरीट



वैशाली साव
एम. ए. मराठी
सातवा मेरीट



शीतल सुरशे
एम. ए. मराठी
सातवा मेरीट





रा.तु. म. विद्यापीठाचे कुलगुरू मा. सिद्धार्थविनायक काणे वं तामीळनाडूचे राज्यपाल मा. बनवारीलाल पुरोहित यांच्या हस्ते मेरीट आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

## मेरीट आलेल्या व विविध स्पर्धेत कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण सोहळा
















निरोप समारंभ







विद्यार्थ्यांनी स्वत:तयार केलेले चित्र

## Spoken English & Competitive Classes




मा.लिखितकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना




ॲड. दिनेश शर्मा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

# महाविद्यालयातील उपक्रमांच्या विविध वर्तमानपत्रांतील बातम्या

## विद्यार्थियों को समझाया मराठी भाषा का महत्व

दै. आपला ... दि. 24/01/2017

## सिद्धांत मांडणे, रहस्य उलगडणे म्हणजे संशोधन

डॉ. विलास हाडगे : कला, विज्ञान महाविद्यालयात संशोधन पद्धतीवर चिंतन



## अडचणींना सामोरे जाऊन आव्हाने स्वीकारा

प्रा. प्रभाकर पुसदकर : कला, विज्ञान महाविद्यालयात मार्गदर्शन वर्ग



दै. सकाळ 01 feb 2017

## निसर्गाचे संरक्षण काळाची गरज

सागर मैदानकर : पर्यावरणपूरक घटकांची दिली माहिती

## कला व विज्ञान महाविद्यालय



## कला, विज्ञान महाविद्यालयाचे यश

## देहगाव येथे रासेयोचे श्रमसंस्कार शिबिर

दै. सकाळ दि. 16-02-2018

## कला व विज्ञान महाविद्यालयाचे यश

## कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय कार्यशाळा

## कला व विज्ञान महाविद्यालयास नॅकचे उच्च नामांकन

15/1/2013



## सांस्कृतिक सप्ताहाचे उद्घाटन

## आष्टीत ग्रामस्वच्छता अभियान

# कार्यशाळेतून लैंगिक छळापासून संरक्षण

लोकमत - ३।३।१८

स्थानिक स्वावलंबी शिक्षण महाविद्यालय येथे महाराष्ट्र राज्य महिला आयोग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ याबाबत एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. प्रास्ताविक वनश्री भुसारी यांनी केले. उज्वला सदाफळ यांनी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ हा कायदा तयार होण्यामागची पार्श्वभूमी, कायद्यातील विविध तरतुदी व शिक्षा याबद्दल सविस्तर माहिती दिली. कामाच्या ठिकाणी वर्तनावर व बोलण्यावर नियंत्रण ठेवणे कसे आवश्यक आहे, यावर चर्चा झाली. आभार प्रदर्शन शुभा भिडे यांनी केले. संचालन डॉ. किरण नागतोडे यांनी केले. डॉ. डी.बी. पुनसे, डॉ. जी.जी. कुंभारे, संस्थेच्या विविध शाळांचे प्रमुख देशमुख, शेंडे, राठी, भिडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आकाश चांदुरकर, मनोज उईके, लोखंडे व विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्याभारती महाविद्यालय

सेलू : विद्याभारती महाविद्यालय येथे सदर विषयावर घेण्यात आलेल्या कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा येथील अ‍ॅड. तृप्ती रोटकर होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय कानोडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. करूणा गणविर यांनी केले. संचालन प्रा. अभिजीत पाटील यांनी केले. डॉ. संजय कानोडे म्हणाले, महाविद्यालयात असे वर्तन घडू नये, योग्य शिस्त पाळण्यात येणे गरजेचे आहे. यावेळी महिला तक्रार निवारण समितीची स्थापना केली. अध्यक्षपदी डॉ. करूणा गणविर यांची निवड केली. कॉलेजमध्ये कार्यरत महिला कर्मचारी व विद्यार्थी त्यांना याबाबत त्रास असल्यास तक्रार नोंदवू शकता. या समितीमार्फत प्रश्न सोडविण्यात येईल, असे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. प्रशस्तीपत्र देवून अतिथींना सन्मानित करण्यात आले. आभार, सपना रहांगडाले हिने मानले.

## कला व विज्ञान महाविद्यालय

पुलगाव : राज्य महिला आयोग व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कला व विज्ञान महाविद्यालयात कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ व संरक्षण, प्रतिबंध, मनाई आणि निवारण कायदा २०१३ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. प्रमुख अतिथी अ‍ॅड. माधुरी तराळ होत्या. अजूनही पाहिजे त्याप्रमाणात स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदललेला नाही. महिलांवर होणारे अत्याचार, शोषण, अपमानास्पद वागणूक असे प्रकार घडत आहे. महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहे. तरी समाजात त्यांना माणूस म्हणून



कार्यशाळेला मार्गदर्शन करताना डॉ. अशोक पावडे, मंचावर मान्यवर व उपस्थित विद्यार्थिनी.

---

आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा 'युवारंग'मध्ये

8/3/2012 गुरुवार लोकमत

# पुलगावच्या विद्यार्थ्यांची छाप



पुरस्कार प्राप्त विद्यार्थी व मान्यवर.

पुलगाव। दि. ७ (तालुका प्रतिनिधी)

---

कला व विज्ञान महाविद्यालयात लोकमत सोमवार 30/01/12

# रासेयोचे श्रम संस्कार शिबिर



मार्गदर्शन करताना प्राचार्य हाडके व मंचावर उपस्थित मान्यवर.

पुलगाव। दि. २१ (तालुका प्रतिनिधी)

---

दैनिक भास्कर - 26/2/2018

# क्रीड़ा व सांस्कृतिक कार्यक्रम के





संवाददाता | पुलगांव.

विद्यार्थियों के गुणों को बढ़ावा मिले, विद्यार्थियों के बीच से कलाकार निर्मित हो वे विविध क्षेत्रों में उत्तम कार्य कर अपना व्यक्तित्व निर्माण करे, विद्यार्थियों में रहे क्रीड़ा वृत्ति को बढ़ावा मिले आदि कई उद्देश्य से स्थानीय कला व विज्ञान महाविद्यालय में हाल ही में सांस्कृतिक व क्रीड़ा सप्ताह का आयोजन किया गया था। इस सप्ताह अंतर्गत सांस्कृतिक विभाग अभिनव कला मंच द्वारा गीत, गायन, स्वरचित कविता, एकल व समूह नृत्य, मिमिक्री, एकपात्री नाटीका, इंग्लिश स्पिकिंग, वाद विवाद स्पर्धा, पाक कला, सलाद डेकोरेशन, मेहंदी, रंगोली, पुष्परचना, दुल्हन मेकअप, दुल्हा मेकअप, वेशभूषा, केशविन्यास, कचरे से कला, भित्तिचित्र, निबंध, घोषवाक्य, शुभेच्छा पत्र, कविता लेखन, वक्तृत्व, स्वयंस्फुर्त, कथाकथन आदि स्पर्धा ली गई। क्रीड़ा क्षेत्र में राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरपर अच्छा प्रदर्शन करने वाले विद्यार्थियों का इस समय सत्कार किया गया। यह स्पर्धा डॉ. जयंत बुराडे, प्रा. काशीनाथ तरासे, व डॉ. मनीषा अजमिरे के मार्गदर्शन में हुए। सभी विद्यार्थियों का प्राचार्यों ने मार्गदर्शन कर उनकी सराहना की। इस उपलक्ष्य में स्पर्धाओं में सहभागी विद्यार्थियों को पुरस्कार वितरित किए गए।

इंटेलिजेंस में चिंतन दिवस मनाया

अंनिस की ओर से अभ्यास

साहि

---

# स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार

## दोन्ही गटातील गुणानुक्रमे आलेल्या स्पर्धकांना धनादेशाचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

देवळी : स्वच्छ भारत मिशन अंतर्गत तालुकास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात गुणानुक्रमे येणाऱ्या स्पर्धकांना धनादेशाचे वाटप करण्यात आले. स्थानिक पंचायत समितीच्या वतीने आयोजित स्पर्धेचे पुरस्कार वितरण पं.स. सभापती विद्या भुजाडे यांच्या हस्ते उपसभापती किशोर गव्हाळकर, गटविकास अधिकारी मनोहर बारापात्रे यांच्या आतिथ्यात करण्यात आले.

स्पर्धेतील गट अ मध्ये प्रथम पुरस्कार कोमल गोमासे, द्वितीय किरण कापडे व तृतीय निकीता रवींद्र कांबळे यांनी प्राप्त केला. गट ब मध्ये प्रथम पुरस्कार वैष्णवी प्रशांत भुसारी, द्वितीय मयुरी सुधाकर ईखार तर तृतीय पुरस्कार किरण डडमल हिने प्राप्त केला. गुणानुक्रमे येणाऱ्या प्रत्येक गटातील स्पर्धकांना धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले.

स्वच्छ भारत अभियानात प्रत्येकाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. यासाठी आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासोबतच प्रत्येक ग्रामस्थाने शौचालयाचा वापर करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक झाले आहे, असे मत पं.स. सभापती भुजाडे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला सर्व पं.स. सदस्य, गटशिक्षणाधिकारी सतीश आत्राम, दशरथ भुजाडे, अधिकारी राजेश शेंडे, आरोग्य विस्तार अधिकारी सालम सईद यांच्यासह सर्व विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



विजेत्यांना पुरस्कृत करताना पं.स. सभापती विद्या भुजाडे व उपस्थित मान्यवर.

---

न के अनाज का कोटा घोषित

# तीन छात्राएं मेरिट सूची में

दैनिक भास्कर - 1/3/2018

संवाददाता | पुलगांव.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ की ओर से मराठी वाड्मय पारंगत एम ए की परीक्षा में विद्यार्थियों ने सफलता हासिल की। राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ की ओर से मराठी वाड्मय पारंगत (एम ए) की छात्रा काजल उमक ने तीसरा क्रमांक हासिल करके सफलता प्राप्त की है। शीतल सुरजे व वैशाली साव ने विद्यापीठ के प्राविण्यता सूची में सातवा क्रमांक हासिल किया है। छात्राओं की सफलता पर प्रा. डॉ. विलास हाडगे ने सत्कार करके बधाई दी। मराठी विभाग प्रमुख डॉ. सतीश चहांदे, प्रा. काशीनाथ तरासे ने विद्यार्थियों की प्रशंसा करके बधाई दी। इस अवसर पर डॉ. संदीप हातेकर, प्रा. सुनील वाटोरे उपस्थित थे।

आंदोलन के बाद वार्डन का तबादला

कपास के

---

सकाळ - 29/1/18

# 'वेगळ्या विदर्भ राज्याचा लढा तीव्र करा'

सकाळ वृत्तसेवा

पुलगाव, ता. २९ : महाराष्ट्राच्या निर्मितीपासूनच विदर्भावर कायमच अन्याय होत आहे. यठिकाणी सर्व प्रकारची संसाधने व साधनसंपत्ती असूनही त्याचा लाभ विदर्भाला होत नाही. अनेक दिवसांपासून वेगळ्या विदर्भराज्याची मागणी असून तरुणांनी हा लढा तीव्र करावा, असे आवाहन विदर्भवादी नेते वामनराव चटप यांनी केले.

येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात वेगळा विदर्भ का, या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. चटप म्हणाले, विदर्भाची भूमी सुजलाम सुफलाम आहे. इथे मोठ्या प्रमाणात खनिजसंपत्ती, कोळसा, नद्या, पाणी, जंगले, वीज, सुपीक जमीन आहे.

वऱ्हाड सोन्याची कुऱ्हाड असेही विदर्भाला म्हटले जाते, परंतु महाराष्ट्राच्या निर्मितीपासून विदर्भावर कायम अन्यायच होत आहे. आता मात्र हा अन्याय सहन केला जाणार नाही, असे चटप म्हणाले. विदर्भाच्या वाट्याच्या सर्व गोष्टी पश्चिम महाराष्ट्रात नेल्या जात असल्यामुळे विदर्भाचा अनुशेष दिवसेंदिवस वाढतच आहे. हक्काचा वाटा मिळत नसल्याने सिंचनाला निधी नाही. शेतकऱ्यांच्या पिकाला भाव देणारी व्यवस्थाही अन्यायकारक असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे असल्यामुळे तेथील जनता सुखी असून विदर्भात तरुणांच्या हाताला काम नसल्याने तो गुन्हेगारीचा आधार घेतो, अशी खंतही चटप यांनी व्यक्त केली. सर्वांगीण विकासासाठी वेगळ्या विदर्भाशिवाय पर्याय नाही, त्यासाठी सर्व तरुणांनी लढ्यात सहभागी होऊन चळवळ अधिक तीव्र करावी, असे आवाहन त्यांनी केले. सतीश दाणी यांनीही विदर्भाला नेहमी सापत्न वागणूक दिली जात असल्यामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आल्याचे सांगितले. यावेळी गजानन निकम, प्राचार्य डॉ. विलास हाडगे, डॉ. संदीप हातेकर, प्रा. सुनील वाटोरे, डॉ. सतीश चहांदे यांची प्रमुख उपस्थिती होती. संचालन प्रा. काशिनाथ तरासे यांनी केले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

---

# कला-विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश

पुलगाव, ता. ९ : उत्तम, सुजाण व अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक बांधीलकी जपणारे नागरिक घडविणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये श्रमाप्रति प्रतिष्ठा निर्माण करणे, निरोगी ग्राम, निर्मल ग्राम, तंटामुक्त व हागणदारीमुक्तग्राम निर्माण करणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट आहे. या अनुषंगाने स्वच्छ भारत अभियानांतर्गत महात्मा गांधी कला, वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनीद्वारे ग्राम पालोरा येथे विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात कला व विज्ञान महाविद्यालयातील लोकेश अडेकर, निकेश मोजनकर आणि आदित्य पाली हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

शिबिरादरम्यान विविध कार्यक्रम व स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये या तिन्ही शिबिरार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास हाडगे यांनी कौतुक करून अभिनंदन केले. या स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजने कार्यक्रमाधिकारी अंकुश वाकोडे व सहकार्यक्रमाधिकारी डॉ. मनीषा अजमिरे यांचे मार्गदर्शन मिळाले.





पुलगाव : कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मान्यवर.

दै. सकाळ 10-02-2018

---

एकनाथ मुरकुटे : अ.भा. अंनिस वर्धा तालुकास्तरीय महावक्तृत्व स्पर्धा

# युवकांच्या पुढाकारातूनच अंधश्रद्धा निर्मूलन

लोकमत न्यूज नेटवर्क 11/1/2018

वर्धा : विज्ञान आणि तंत्रज्ञान विकासाच्या काळातही पारंपारिक विचारांच्या प्रभावाखाली युवापिढी विवेक बाजूला करून वाटचाल करीत आहे. भारतीय संविधानाने पुरस्कृत केलेला वैज्ञानिक दृष्टीकोन ही आजच्या काळाची गरज असून त्यानुसार महाविद्यालयीन युवकांनी दैनंदिन जीवनात वाटचाल करावी, तरच विवेकी समाज साकार होवू शकेल, असे मत प्रा. एकनाथ मुरकुटे यांनी व्यक्त केले.

येथील यशवंत महाविद्यालय येथे अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्यावतीने युवा जागृती अभियान अंतर्गत तालुकास्तरीय महावक्तृत्व स्पर्धा पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांनी केले. अंनिस राज्य युवा संघटक पंकज वंजारे, स्पर्धा संयोजक मोहित सहारे, तालुका स्पर्धा संयोजक आशिष नंदनवार, प्रा. अरुणा हरले, डॉ. खोडे उपस्थित होते.

१९८२ पासून ज्येष्ठ विचारवंत प्रा. श्याम मानव यांच्या नेतृत्वात आमच्या देवा-धर्माला विरोध नाही तर या नावावर लुबाडणाऱ्याविरुद्ध ही चळवळ प्रभावीपणे कार्य करीत आहे. ही चळवळ समाजातील युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोण रूजविण्याचे मुख्य कार्य करते, असे मत पंकज वंजारे यांनी याप्रसंगी मांडले. स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका आणि प्रास्ताविक जिल्हा स्पर्धा संयोजक मोहित सहारे यांनी केले. या महावक्तृत्व स्पर्धेत २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अनिकेत समाजकार्य महाविद्यालय, वर्धा येथील सुनील सुर्वे प्रथम, प्रियदर्शिनी महाविद्यालयातील प्रिया वाडेकर द्वितीय तर मिहाल मुन न्यू आर्ट्स महाविद्यालय, वर्धा यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेचे परीक्षक प्रा. स्वप्नील उभाड, प्रा. वैशाली देशमुख, प्रा. कल्याणी टेंभरे होते. आयोजनाला आशिष नंदनवार यांनी सहकार्य केले. स्पर्धेला महाविद्यालयीन प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती बहुसंख्येने होती.

स्पर्धेच्या आयोजनासाठी अ.भा. अंनिस जिल्हाध्यक्ष हरिष इथापे, नागपूर विभागीय स्पर्धा संयोजक डॉ. धनंजय सोनटक्के, अ.भा. अंनिस तालुका संघटक रवी पुनसे, जिल्हा महिला संघटक प्रा. सुचिता ठाकरे, अ.भा. अंनिस तालुका कार्यकारिणी सदस्य भूषण आदींनी सहकार्य केले.



मार्गदर्शन करताना डॉ. देशमुख व मंचावर अतिथी

## तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क 11/1/2018

देवळी : एस.एस.एन.जे. महाविद्यालय आणि अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा पार पडली. विविध महाविद्यालयाचे १० स्पर्धकांनी सहभाग घेतला.



यात प्रथम क्रमांक निलीमा कांबळे, आर्ट, सायन्स कॉलेज, पुलगाव, द्वितीय कोमल गोमासे एस.एस.एन.जे. महा. देवळी, तृतीय क्रमांक डोरे आर्ट सायन्स कॉलेज, पुलगाव तर चतुर्थ क्रमांक सुरज घायवट यांना देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय तर प्रमुख मार्गदर्शक राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक तथा अंनिसचे देवळी तालुका उपाध्यक्ष प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे होते. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांनी केले. परीक्षकांची जबाबदारी अंनिस सहसचिव अजय इंगोले आणि डॉ. मालधुरे यांनी सांभाळली. कार्यक्रमाचे संचालन स्वयंसेविका प्रणीता जाधव यांनी केले. आभार सोनाली पंधरे हिने मानले. कार्यक्रमाला प्रा. डॉ. दखडे, डॉ. खोटेले, डॉ. वाले, प्रा. देशमुख, प्रा. मॅन्युअल, प्रशांत घुमरे, विजय पचारे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

---

मार्गदर्शन शिबिर

17/12/17 लोकमत

# जिद्द व चिकाटी ठेवल्यास यश निश्चित

## सुमंत टेकाडे : व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

पुलगाव : यश मिळविण्याकरिता एका ध्येयाची निवड करून त्यामध्ये स्वत:ला झोकून देत त्या दिशेने वाटचाल करण्याकरिता प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. जिद्द, चिकाटी, धाडस, आत्मविश्वास व परिश्रम या पाच तत्वांचा पाठलाग केल्यास निश्चितच यश प्राप्त होते, असे मत नागपूर येथील प्रा. सुमंत टेकाडे यांनी केले. स्थानिक कला व विज्ञान महाविद्यालयाद्वारे आयोजित व्यक्तीमत्व विकास कार्यशाळेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

संस्थेच्या सभागृहात आयोजित कार्यशाळेच्या प्रथम सत्रात व्यक्तीमत्व विकास व संभाषण कौशल्य या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. टेकाडे म्हणाले, प्रत्येकाच्या जीवनात अडचणी असतात. परंतु त्या अडचणींवर मात करून आपल्याला स्वत:मध्ये शक्ती निर्माण करावी लागेल. प्रत्येक स्पर्धेत सहभागी होऊन विजय मिळविण्याचे धाडस केले पाहिजे.

प्रत्येकामध्ये काहीतरी कमतरता असते. त्यावर लक्ष केंद्रीत केल्यास आपल्याला अनुभव संपन्नता प्राप्त होवून आपल्यात नेतृत्व गुण वाढीस लागतात, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासात आवश्यक असणाऱ्या बाबींवर प्रकाश टाकला.

यावेळी शहरातील आर.के. हायस्कूल, सेन्ट जॉन हायस्कूल, गांधी सिटी पब्लीक स्कूल, मुन्नालाल पाटणी महाविद्यालय तसेच विविध शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

दुसऱ्या सत्रात शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. शिक्षक हा देशाच्या विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावणारा घटक आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनात त्याचे स्थान उच्च आहे. विद्यार्थी शिक्षण घेवून बाहेर पडल्यावर तो स्वयंभू कसा होईल, यासाठी त्यांना प्रात्यक्षिक शिक्षण देवून आत्मविश्वास निर्माण करण्याच्यादृष्टीने शिक्षकांनी लक्ष देणे गरजेचे आहे, असे आवाहन टेकाडे यांनी यावेळी केले.

या सत्रात विविध शिक्षण संस्थेतील शिक्षक सहभागी होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विलास ढाइणे होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. काशिनाथ तासे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. विवेक जेवे यांनी केले. कार्यशाळेला प्राध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

3/1/17 लोकमत

# कथाकथन कार्यक्रम

पुलगाव : स्थानिक कला व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा कार्यक्रम घेण्यात आला. याअंतर्गत कथाकथन पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास ढाइणे, सनद भैसारे उपस्थित होते. यावेळी ढाइणे म्हणाले की, मराठ्यांचे, पेशव्यांचे राज्य महाराष्ट्रात होते. त्याकाळात येथे मराठी भाषा व्यवहारात आणि बोलीभाषेत होती. इंग्रजांनी त्यांच्या सोयीसाठी इंग्रजी भाषा आवश्यक केली. इंग्रज गेल्यानंतरही आपण स्वतंत्र भारतात इंग्रजीचे हे लादलेपण झुगारले नाही. याची खंत व्यक्त करताना आजही व्यवहारात, शिक्षणात, नोकरीत इंग्रजीचे आक्रमण झाल्याचे पाहावयास मिळते. डॉ. सतीश चहांदे यांनी कथाकथन प्रसंगी कथा ऐकण्याची, सांगण्याची आवड आपणास फार पूर्वीपासून आहे. आख्यायिका, दंतकथा, काल्पनिककथा, सत्यकथा अशा अनेक कथा मनुष्य सांगत आला आहे. याप्रसंगी उपस्थितांनी वर्तमानपत्रातील साहित्य म्हणून नव्हे, तर विचारांच्या पुस्तकातील कथांचा आस्वाद घ्यावा असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन ममता दिगांबर हिने केले तर आभार अक्षय यांनी मानले. यशस्वीतेकरिता सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# कला व विज्ञान महाविद्यालय

पुलगाव : स्थानिक कला व विज्ञान महाविद्यालयातील रा.से.यो विभागाच्यावतीने रोखरहित व्यवहारावर कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास ढाइणे होते. त्यांनी रोखरहित व्यवहाराचे महत्व विषद केले. भ्रष्टाचाराला आळा बसावा, काळा पैसा बाहेर यावा, आतंकवाद व नक्षलवादाला कुठमाती मिळावी, नोटा छापण्याच्या खर्चाची बचत व्हावी, अशा अनेक उद्देशाने केंद्र सरकारने ५०० व १००० रुपयांचे जुन्या नोटा वापरातून बंद केल्या आहे. नागरिकांनी व तरुणांनी क्रेडीट कार्ड, चेक, डी.डी., नेट बँकींग, फोन बँकींग, ई-वॉलेट इत्यादींचा वापर करून आर्थिक व्यवहार केल्यास हा व्यवहार देशाच्या दृष्टीने हितकारक ठरेल. सरकारने गो इंडिया, गो महाराष्ट्र, डिजीटल इंडिया हे अभियान सुरू केले असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सी.एस.सी. जिल्हा व्यवस्थापक नंदकुमार कावळे यांनी महाविद्यालयातील रासेयोचे स्वयंसेवक व इतर विद्यार्थ्यांना रोखरहित व्यवहाराचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मेघा सवाने यांनी केले. संचालन प्रा. काशीनाथ तासे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गरजूंकरिता 'एक मुठ्ठी अनाज' अभियान

## कला व विज्ञान महाविद्यालयात ग्रीन व्हेव्ज नेचर क्लबचे उद्‌घाटन

सकाळ वृत्तसेवा

पुलगाव, ता. २० : एकीकडे भरमसाट धान्य गोदामांमध्ये सडते किंवा समुद्रात फेकले जाते. दुसरीकडे काही घटकांना अन्न मिळत नाही. या अनुषंगाने 'एक मुठ्ठी अनाज' या अभियानाचा प्रारंभ येथील कला व विज्ञान महाविद्यालयात करण्यात आला. याच कार्यक्रमात ग्रीन व्हेव्ज नेचर क्लबचेही उद्‌घाटन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी डॉ. विलास ढाइणे होते. क्लबचे उद्‌घाटन डॉ. सागर मेंढमकर यांच्या हस्ते झाले. डॉ. संदीप हरेकार उपस्थित होते. डॉ. ढाइणे म्हणाले, निसर्ग मानवाला अनेक गोष्टी बहाल करून त्याचे जीवन आनंदी केले. मात्र मानव निसर्गाचा नाश करायला निघालेला आहे. त्याने पर्यावरण व निसर्ग दूषित करून स्वतःचे व इतर जीवसृष्टीचे आरोग्य धोक्यात टाकले आहे, असे मत मांडले. डॉ. मेंढमकर यांनी पक्ष्यांच्या विविध जाती व त्यांच्या अधिवासाबद्दल मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. नंदकिशोर कापटे यांनी केले. यावेळी प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेली कृत्रिम घरटी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात लावण्यात आली.

तसेच 'एक मुठ्ठी अनाज' या अभियानाचे उद्‌घाटनही करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. अमोली घोसलकर, संचालन प्रा. काशिनाथ तासे यांनी केले. प्रा. सुनील राठोड यांनी आभार मानले.



पुलगाव : महाविद्यालय परिसरात कृत्रिम घरटी लावताना प्राध्यापक.

ई-सकाळ 21.01.2017

# माझ्या शेतकऱ्याचे मनोगत

अक्षय संजय कराळे
B.A.II

भारत देश हा कृषिप्रधान म्हणून ओळखला जातो. पण हे खरं आहे का? हे वाक्य प्रत्येक पुस्तकात पाहिला असेल. आपण परंतु या वाक्याचा काही फायदा होईल का फायदा आपण कसा घेता येईल हे आजच्या शेतक-यांना कळत नाही आहे. आजच्या शेतक-यांचे हाल आपण बघतच आहोत. आपल्या या देशात की, "आमचं सरकार तुमचं कर्ज माफ करणार" पण माफ काही होत नाही अनेक सरकार बदलतात. खूप काही शेतक-यांना खोटे दिलासे देतात. सरकार म्हणते की आम्ही तुमच्यासाठी हे योजना आणणार ते आणणार पण ती योजना काही त्या शेतक-यांना पोहचत नाही. आज शेतक-यांच्या आत्महत्येचे आहे कर्ज, दुष्काळ यामुळे शेतकरी आत्महत्या करतात. का करतात? हे सुद्धा सरकार जाणून घेण्याचा प्रयत्न करत नाही. आता का नाही करत हे आपल्याला ठाऊक आहे की शेतक-याचीच आत्महत्या आहे. आता बाकीचे राजकीय पक्ष काय करतील त्यातही आपल्या पक्षाचा फायदा कसा होईल हे बघतात. प्रत्येक पक्ष प्रयत्न करतो की हे सरकार पाडून आपलं सरकार कसा स्थापन करता येईल म्हणून हे पक्ष त्या शेतक-याच्या आत्महत्येवर राजकारण आणि एखाद्या पक्षाचा नेता म्हणतो की त्या शेतक-याने आत्महत्या का केली यामध्ये सरकार काय करत आहे असे अनेक प्रश्न त्या सरकारला तो नेता विचारतो कारण त्यात त्या पक्षाचा फायदा कुठे तरी लपलेला असतो. असे हे राजकीय पक्ष आहे. अरे शेतक-यांची हालअपेष्ठा जाणून घ्या त्यांना ती मदत करा शेतकरी हा आपल्या भारत देशाचा आधारस्तंभ आहे. तोच आधार स्तंभ हालला तरया देशाचं काय होईल याचा विचार सुद्धा करणा-याला भीती वाटेल शेतक-यांना कधी योग्य भाव मिळत दुष्काळग्रस्त शेतक-यांना कधी मदत पुरवली जात नाही योग्य बाजारभाव न मिळाल्याने शेतकरी कर्ज फेडू शकत नाही. सावकारी कर्ज हे त्यांना मरेपर्यंत सोडत नाही, आणि अशा कारणांना कंटाळून शेतकरी आत्महत्या करतो. मला नाही वाटत की शेतक-यांचे हे हालअपेष्ठा कधी सुधारणार आहे म्हणून जर शेतक-याने पिकवणं बदं जर केले तर देशाची अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल, आणि असे जर झाले तर तुम्हांला माहित आहे की महागाई वाढणार आणि त्याचा परिणाम गरिब जनतेवर होणार पण असं होवू द्यायचं नसेल तर सगळ्यांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. आपण शेतक-यांची मदत करून आपण देशाला विकसनशील वरून विकासाकडे नेता येईल. म्हणून शेतक-यांची आत्महत्या थांबवायची असेल तर मी पणा सोडावा लागेल नाहीतर या देशाचं काहीचं होवू शकत नाही. जसे देशाचं जवान सीमेवर राहून आपल्या सीमेचं रक्षण करतात तसे किसान आपल्या सोन्यासारख्या मातीत राबून पिक घेतात कारण त्यांना माहीत आहे की आपण उपाशी मरणार नाही म्हणून तो या देशाचा या जगाचा अन्नदाता आहे, मी पण एक शेतक-यांचा मुलगा आहे मला माहित आहे की शेतकरी काय करू शकतो. पण शेतकरी तसे काही करत नाही. कारण त्याला माहित असते की आपल्यावर विश्वास ठेवून गोरगरीब जगतात त्यांना दोन वेळंचं जेवण मिळते धान्य विकतं आणून आपल्या मुला-बाळांना जेवू घालतात. अरे अशा शेतक-यांना आज आपण स्वत: मारत आहे आजचे राजकीय पक्ष हे सरकार ही मीडिया काही कामाचे राहीले नाही सगळे आपला फायदा बघतात. मला जर कोणी विचारले तर तू मोठेपणी कोण होणार तर मी ताठ उभा राहून मोठ्या गर्वाने सांगेन की मी शेतकरी होणार. **"जय जवान, जय किसान"**

# चांगल्या लोकांना ओळखायला शिका

मयुरी ए. चिरडे
B.A.I

आयुष्यात आपण कशाचा तरी शोध घेत असतो. कुणाला समधानाची आस असते. पण आयुष्यात आनंद आणण्यासाठी चांगल्या लोकांची गरज असते. त्यामुळे चांगल्या लोकांना शोघ घेणं थांबवू नका. सध्याच्या कलियुगात चांगले लोक मिळणं खूप कठीण झालंय. सगळीकडे मतलबी दुनिया. दिसून येते. पण प्रत्यक्षात तसं नाही. चांगली माणसं आपल्या आयुष्यात येत असतात. ही माणसं कोणत्या रूपात येती यांच नेम नाही. तुम्ही कोणत्याही क्षेत्रा असतात तरी सहकार्य करणारे लोक भेटतातचं वाईट मानसांपासून सावध राहण्याबाबत आपल्याला कयाम सांगितलं जातं. यासोबतच चांगल्या लोकांना पारखता पारखता आलं पाहिजे. त्यांच्या अस्तित्वाचा योग्य तो लाभ घेता आला पाहिजे.

आपल्या आयुष्यात चांगली माणसं पाच मार्गांनी येतात. आपल्या चांगल्यासाठी मोलाचा रस्ता दिला जातो किंवा मत मांडल जातं हिंतचिंतक आपलं वाईट कधीही चिंतणार नाहीत. कामात मदत करायला येणारे लोक असतात. असे लोक आपल्याला सुरक्षा देतात. त्यामुळे त्यांच्यापासून कधीही दूर पळू नका. त्यांच्या जवळ राहा. त्यांच्यासोबत चांगले संबंध प्रस्थापीत करा. स्वभावाने चांगली असलेली माणसं फार कमी वेळा व्यक्त होतात. त्यामुळे आपल्यालाचं त्यांच्याकडे गेलं पाहिजे. आपल्या मनाला समजवा आणि चांगल्या माणसांकडे वळा. त्यांच्याशी बोला. चांगल्या माणसांकडे सोबत हृदय आणि बुद्धीने स्वत:ला जुळवून घ्या. नंतर मनाचा विचार करा. मनातल्या शंका दूर सारून लोकांना जवळ जा. चांगल्या लोकांशनी संगत जोडा. आयुष्यात आपण कशाचा तरी शोध घेत असतो. कुणाला समधानाची आस असते. पण आयुष्यात आनंद आणण्यासाठी चांगल्या लोकांची गरज असते. त्यामुळे चांगल्या लोकांना शोघ घेणं थांबवू नका. सध्याच्या कलियुगात चांगले लोक मिळणं खूप कठीण झालंय. सगळीकडे मतलबी दुनिया. दिसून येते. पण प्रत्यक्षात तसं नाही. चांगली माणसं आपल्या आयुष्यात येत असतात. ही माणसं कोणत्या रूपात येती यांच नेम नाही. तुम्ही कोणत्याही क्षेत्रा असतात तरी सहकार्य करणारे लोक भेटतातचं वाईट मानसांपासून सावध राहण्याबाबत आपल्याला कयाम सांगितलं जातं. यासोबतच चांगल्या लोकांना पारखता पारखता आलं पाहिजे. त्यांच्या अस्तित्वाचा योग्य तो लाभ घेता आला पाहिजे.

आपल्या आयुष्यात चांगली माणसं पाच मार्गांनी येतात. आपल्या चांगल्यासाठी मोलाचा रस्ता दिला जातो किंवा मत मांडल जातं हिंतचिंतक आपलं वाईट कधीही चिंतणार नाहीत. कामात मदत करायला येणारे लोक असतात. असे लोक आपल्याला सुरक्षा देतात. त्यामुळे त्यांच्यापासून कधीही दूर पळू नका. त्यांच्या जवळ राहा. त्यांच्यासोबत चांगले संबंध प्रस्थापीत करा. स्वभावाने चांगली असलेली माणसं फार कमी वेळा व्यक्त होतात. त्यामुळे आपल्यालाचं त्यांच्याकडे गेलं पाहिजे. आपल्या मनाला समजवा आणि चांगल्या माणसांकडे वळा. त्यांच्याशी बोला. चांगल्या माणसांकडे सोबत हृदय आणि बुद्धीने स्वत:ला जुळवून घ्या. नंतर मनाचा विचार करा. मनातल्या शंका दूर सारून लोकांना जवळ जा. चांगल्या लोकांशनी संगत जोडा.

# बालकवी व निसर्गयांचे नाते

सोनाली येसकर

एम. ए. १

मराठीतील कवितेत बालकवीचे स्थान अनन्यसाधारण आहे. मर्ढेकरांना अप्रूप होते ते केवळ बालकविचेच. कवितेचे एवढे सहजपणे जीवघेणे रूप त्यांच्या काव्यातून प्रत्यायाला येते की आपण चकित होऊन जातो. " नवकाव्याच्या जरीपटक्याचा तुलाच अधिकार" अशा गोविन्दाग्रजानी बालकवीचा गौरव केला आहे. बालकवी आपल्या समकालीन जीवनातील सामाजिक व राजकीय परिस्थितीविषयी अत्यंत उदासीन आहेत. राज्कीता आंदोलने व पहिले महायुद्ध इत्यादीसंबधीचे संदर्भ त्यांच्या काव्यात सापडत नाहीत. बालकवी केशवसुतांना मानत होते ते तुतारी मंडळाचे सदस्य होते. केशवसुत ओजस्वी होते तर बालकवी सुकुमार होते. केशवसुतांची रचना ओबडधोबड तर बालकवींची नादमधुर. केशवसुत प्रगल्भ तर बालकवी निरागस. निसर्गाप्रियता, स्वच्छन्दीपणा, स्वप्नाळू वृत्ती, कल्पनाविलास, दौर्बल्याची जाणीव यांसारखी रोम्यांटिक काव्याची वैशिष्टे त्यांच्या काव्यात आढळतात.

## <u>निसर्गाशी नाते किंवा निसर्गकवी</u> :-

सृष्टीचे सौंदर्य उकलून दाखविण्यासाठीच माझा जन्म झाला आहे. अशी बालकवीची श्रद्धा होती आणि निसर्गाकडे पाहण्याचा त्यांचा निरागस, ताज्या, उस्फुर्त व सहज परंतु प्रतिमांकितदृष्टीमुळे यांनी निसर्ग सौन्दर्याचे नुसते प्रतिबिंबन देता जो एक वेगळा व चेतन प्रत्यय दिलात्यामुळे बालकवी म्हणजे निसर्गकवी असे समीकरण दृढ झाले. हा निसर्ग खास बालकवींचाच असतो. निसर्गाशी तल्लीन होतो व त्यावर मानवी भावनांचा अध्यारोपकरणे एवढ्यामुळेच कोणी त्यांना निसर्गकवी म्हणून ओळखतातही; पण दिव्य सौंदर्यप्रेम, बालकवींच्या कवितेत एक अपूर्व रसायन होऊन गेलेले आहे की ज्यांचा स्वतंत्र विचार करणे अशक्य व्हावे. बालकवीना एका दिव्यतेचा ध्यास लागलेला होता. "दिव्य रसीविरणे जीव-जीवित हे याचे नाव" अशी जीवनासंबंधीची त्यांची स्वच्ं दतावादी कल्पना होती. ती कोणत्याही वादातून जन्मलेली नव्हती तर त्याच्या व्यक्तित्वातून स्फुरलेली होती. विश्वात्म्याचे मधुहास म्हणजे दिव्य अशी तर कल्पना हि नुसती कल्पना नव्हती तर "आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे" सारख्या विश्वम्भर आनंदाच्या आत्म्याची जी पुरोगती नावतिचे प्रीती अशा स्वर्भूच्या संगमतेच्या प्रेमाच्या मांगल्याच्या व शांतीच्या, निरागसतेच्या व लाडीवाळपणाच्या अनेक अंगानी चराचराच्या चित्ती भरलेले हे दिव्य होते. या दिव्यांचे बालकविना एवढे वेड होते की जे जे कवीला मोहवतेते ते दिव्य होऊन जाते. हि दिव्यता अनेकदा तेजोरूप होऊन प्रकटते. सर्वत्र तेजाची लयलूट होऊ लागते. धर्मविर सारख्या कवितेतही तेजाला वाट करून देण्याचे आवाहन आहे. धर्मवीर हि तेजाची बाले होऊन येतात. तेजाचे आम्ही दास असे म्हणतात. स्वप्नसृष्टी जळून जाण्या पूर्वीक विबाळेही स्वर्गाच्या तेजोगर्भी खेळत असतात. प्रीती आणि दिव्ययाचे अव्दैतच असतेते निसर्गातून खुणावत राहते. बालकवी नुसत्या निसर्गाचे कवि कधी नसतातच. ज्या सौंदर्य देवतेचा ते उदोउदो करतात तिचे रम्याकार निसर्गातच त्यांना गवसतात. कवितेचे स्फुरण निसर्गातून नव्हेतर निसर्गाच्या दिव्य अवलोकातून होते. निसर्ग दृश्याचे कविकल्पनेत संवेदक रुपांतर इतक्या सहज होऊन जाते की त्या प्रतिमा प्रक्रियेची जाणीवही राहत नाही. बालकवींच्या कवितेत एक प्रती निःसर्ग निर्माण होतो. बालकवी प्रजापती होतात आणि या

निसर्गाला कोणी 'मनकल्पित मायानगरी 'म्हणतो कोणी स्वैर कल्पना विलास म्हणतो तर कोणी 'स्वप्नसृष्टीचे इंद्रजाल 'म्हणतो. स्वतः बालकवी म्हणतात की निसर्ग दृश्ये पाहिल्यावर एक गोडवेड माझ्या डोक्यात उसळते. कल्पना साम्राज्यातील मधुर स्वप्नसृष्टीशी मनस लग्न होते. 'संध्यारजनी', 'अरुण', 'फुलराणी' या सारख्याक वितामधून हा 'कल्पनाकाल्पित सौदार्योत्सव अत्यंत तरल रूप धारण करतो. रा. श. वाळिंबे यांनी बालकवीच्या या कल्पनाविलासाचे स्वरूप वर्डस्वर्स्थच्या आधाराने स्पष्ट करतांना म्हटले आहे की तो फेन्सी याप्रकारचा आहे. गोविंदाग्रजांच्या' राजहंस'च्या जातीचा स्वैरकल्पनाविलास हा नव्हे. औदुंबरसारखी तथाकथित कल्पनाशून्य कविता हि वास्तववर्णनामुळे श्रेष्ठ कविता ठरत नाही तर ते संपूर्ण चित्रच एक प्रतिमाहो ऊनचित्तवृत्तीना विपुली स्फुरण देत राहते. त्यामुळे औदुम्बारासारखी सोपी कविता सामिक्षकाना कोडे होऊन बसते. पाऊस, मेघांचा कापूस, श्रावणमास या सारख्या कवितांमधू न केवळ निसर्गवर्ण नवनिरीक्षण येत नाही तर कवीचे व्यक्तित्वत्या तून व्यक्त होते. जगातील दु:ख निराशा त्यामुळे बालकवींनी निसर्गाकडे धाव घेतली नसून त्यांना मुळातच निसर्गाशिवाय आकर्षण होते. जगात अपूर्णता आहे, जडता आहे. स्वर्थाचा बाजार आहे, ज्ञान अज्ञानासारखे झाले आहे. व्दैताची अक्षयझोंबी चाललेली आहे. यातून बालकवी यांना मुक्त व्हायची ओढ अवश्य आहे पण त्याला पलायन म्हणता येणार नाही. रंजनप्रधान कादंबऱ्या, अदभूत कथा, दिवास्वप्ने व बालकवींची सृजनशील, निर्भरशील, भावोत्कट संवेदना समृद्ध प्रतिमारूप कविता यांची कुळे एकच म्हणता येणार नाही. बालकवींचे निसर्गाशी एक अतूट असेनाते आहे. तो पलायनवाद नाही.

## गं. बा. सरदार यांच्या साहित्याचा परिचय

आरती बमनोटे
एम. ए. १

महाराष्ट्रातील सामाजिक परीवर्तनाच्या लढयातील एक प्रखर विचारवंत म्हणुन व्यासंगी अभ्यासक व जेष्ठ साहित्यीक म्हणुन तसेच संत वाङमयीन अभ्यासक म्हणुन ओळखले जाणारे गंगाधर सरदार हे समाजाचे प्रबोधन भाष्यकार होते.प्रा. गंगाधर सरदार यांचा जन्म एका लहानशा संस्थानच्या आदीवासी राजाचे मुख्य ठिकाण असलेल्या उत्तर सहयाद्रीच्या डोंगर पठारावरील ठाणे जिल्यातील जव्हार या लहानशा संस्थानच्या गावात 2 ऑक्टोबर 1908 रोजी झाला. त्यांचे वडील बाळकृष्ण सरदार हे व्यापारी होते. कापड, किराणा मालाचा व्यापार करणारे त्यांचे वडील थोडीशी सावकारीही करीत होते. परंतु सावकार म्हटल्या आपल्याला सावकारांचे जे चित्र डोळयासमोर दिसते तसले सावकार सरदारांचे वडील नव्हते अडलेल्यांना ते नेहमी मदत करायचे. आपल्या दुकानातुन कापड वस्तुसाठी काही कर्जही दयायचे व त्यावर अतिशय माफक प्रमाणात बहुधा धांन्याच्या स्वरूपात व्याज देणे यापलीकडे त्यांच्या सावकारीची मजल कधी गेली नाही प्रा. सरदारांचै लहानपण आदिवसी भागात गेले त्यांच्या वडिलांचे सारे व्यवहार मुख्यतः आदिवासी लोकांशी चालायचे. या आदिवासी लोकांच्या अफाट दारीद्रयाचे दर्शन बालपणीच त्यांना घडले. त्यांनी या काळात बघीतले ते हाडाचे सापळे, अणतिकतेचे पुतळे, लाचार, आयुष्य, आयुष्याची स्मशाने, अब्रचे उघडेनागडे, बेवारस प्रदर्शन पोटाच्या भकास खापा या महा दारीद्रयाने त्यांच्या बालमनावर ओरखडे पडले. या परीस्थीतीचा फार मोठा खोल ठसा सरदारांच्या मनावर झाला. त्यांच्या भोवती उघडया–नागडया वावरणा–या आदिवासी जमातींच्या जठरात पेटलेल्या भुकेची आग किंवा मलेरीयामुळे पोटात वाढलेल्या पालीहेचा बोगा यामुळे त्यांच्या चेह–यांवर उमटलेली वेदना आणि निराश जीवनातील उदासीनता त्यांच्या मनाला व्यथीत करीत होती.

प्रा. सरदार इंग्रजी शिक्षणासाठी 1920 मध्ये मुंबईस गेले .तेथे गेल्यामुळे मुंबईतल्या सुधारलेल्या जीवनाचे व आदिवासी जीवनाचे वातारण याची तुलना करण्याचा त्यांना मिळाला व त्यांचे मन अधिक विचार प्रवन बनु लागले. प्रा. सरदार मॅट्रीकची परीक्षा 1924 साली चांगल्या तऱ्हेने उत्तीर्ण झाले. त्यानंतर उच्च शिक्षण घेण्याकरिता ते पुण्याला गेले. हा काळ त्यांच्या जीवनात अतिशय महत्वाचा ठरला. महा – विदयालयात मिळणारे पाश्चिमात्य वाङःमयाचे शिक्षण त्याचबरोबर त्यांना करावा लागणारा प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङःमयाचा अभ्यास यामुळे त्यांच्या बुध्दीला प्रगल्भता व सुक्ष्मता येत होती. 1920 च्या सुमारास गांधीजीची असहकाराची चळवळ वेगाने वाढत गेली. सामान्य माणसाबद्दल अथांग सहानुभूती, दारिद्र नारायणाची सेवा हीच ईश्वरोपासना अशी दृढ अंधश्रध्दा, अन्यायाचा प्रतीकार करण्याची शिकवण व मानवतावादी विचारधारा यामुळे सरदारांच्या मनः पिंडावर गांधीजींचे खोल संस्कार झाले.

कॉलेजच्या जीवनात सरदारांनी गांधी – वादाच्या स्वीकार विचारांच्या नुसत्या अमुर्त पातळीवर केला असे नसून तो आचरणात सुध्दा आणावयाला सूरूवात केली होती बी. ए. ची परीक्षा अगदी तोंडावर आली असता त्यांनी 1930 साली महात्मा गांधी दिलेल्या आदेशानुसार मिठाच्या सत्याग्रहाच्या स्वरूपात चाललेल्या राष्ट्रीय आंदोलनात उडी घेतली. गांधीवादाच्या तत्वानुसार सत्याग्रहीला आवश्यक असलेले चरित्र्य, ध्येयनिष्ठा, सत्य, आहिंसेचे श्रध्दायुक्त, पालन व उदार मानवतावादी दृष्टीकोन इ. गुण सरदारांच्या ठिकाणी प्रकर्षाने होते. प्रा. सरदारांनी वडीलाच्या विरोधाला न जुमानता 1930 साली सत्याग्रहात उडी घेतली खर्रा पण यामुळे त्यांच्या कुंटुबियांची मते गडबडली. त्यांच्या वडीलांचे ते एकुलते एक चिरंजीव होते. सरदारांच्या बेळगावच्या तुरुंगात टाकले ही बातमी त्यांच्या वडिलांना कळताच त्यांची गडबड उडयाली. सर्व सत्याग्रहींच्या बरोबर सुटका झाल्यावर सरदार जव्हारला परत आले. यानंतर एक–दोन वर्ष सरदारांना मात्र फार मानसिक त्रासातून जावे लागले. चळवळीत पुढे भाग घेता न आल्याबद्दल एक प्रकारचे वैकल्यही त्यांच्या मनात टोचत राहीले. तर दुसरीकडे बी. ए. ची परीक्षा बुडाल्यामुळे त्यांच्या मनस्तापात भर पडली.

प्रा. सरदारांच्या मनावर सावकारांचाही परिणाम झाला. आहे लहानपणा पासून जव्हारला सावकारां विषयीच्या रोमांचकारी आख्यायिका त्यांना ऐकायला मिळाल्या. सावरकरांच्या साहसी राष्ट्रवादी प्रवृत्तीचा सरदारांवर लहान वयात बराच परीणाम झाला होता. सरदार बी. ए. च्या वर्गात असताना डॉ. सावरकारांना 'श्रध्दानंद या हिंदूनिष्ठा पत्रात त्यांची 'मी हिंदू म्हणून जगणार' ही कविता प्रसिध्द झाली होती. गांधी की सावरकर असाही झगडा त्यावेळी त्यांच्या मनात चालू होता. एकीकडे लोकाभिमूख संघर्षप्रवण गांधीवादाचेही आकर्षण वाटत होते. शाळेत असताना रामकृष्ण परमहंस, विवेकानंदा, रामतीर्थ, यांचाही परीणाम त्यांच्या मनावर झालेला होता. पण गांधीजींनी आणि त्यांच्या सत्याग्रहाच्या चळवळीने सरदारांच्या मनाचा जेवढा ताबा घेतला तेवढा यापूर्वी कुणीच कधी घेतला नव्हता. गांधीप्रणित सत्याग्रह दर्शनाचा सरदारावर पुष्कळ परीणाम झालेला आहे सरदारांनी जव्हारला अति जवळून आदिवासी लोकांचे दारीद्रय पाहिले. या रंजल्यागांजल्या लोकांसाठी आपण शक्य तितके झटले पाहिजे असे त्यांना सातत्याने वाटत राहीले. मात्र या लोकांचे प्रश्न नुसत्या सद्भावनेने किंवा सह पदेशाने सुटणार नाहीत. त्यासाठी प्रबोधनाइतकेच संघर्षाची गरज आहे याची जाणीव सरदारांना मार्क्स प्रणीत सामाजिक तत्वविचारातून तीव्रतेने झाली.

निर्वाहासाठी कोठेतरी अध्यापनाचे कार्य स्वीकारुन आपल्याला ही वैचारीक बैठक पुरविण्याचे कार्य सहजपणे करता येईल असा सरदारांना आत्मविश्वास होता. त्यांनी तसे मनात ठरवले व लवकरच त्यांना तशी संधी मिळाली आणि त्यांनी पुण्याच्या एस. एन. डी. टी. कॉलेजमध्ये मराठीच्या अध्यापनाला सुरुवात केली. प्राचार्य वामन मल्हार जोशी यांच्या मुळे या कॉलेजमध्ये अध्यापन करण्याची संधी मिळाली सुरुवातीला तीन महीन्यांसाठी या संस्थेत ते आले पण पुढे येथेच कायम राहिले. अध्यापनाची त्यांना अतिशय आवड होती.

1920 पासून देशाच्या स्वातंत्र्य चळवळीला आणि समाजपरी वर्तनासाठी झालेल्या विविधरुपी आंदोलनाचा अभ्यास सरदारांनी चौफेर केला होता, सामाजिक जीवनातील बदलणारी रुपे त्यांनी आपल्या संवेदनशील मनाने डोळसपण अनुभवली सरदारांच्या डोळयासमोर लोकहितवादी, रानडे, टिळक, आगरकर, केतकर, जावडेकर 'जोतीराव फूले' आंबेडकर प्रभूतीच्या कार्याचा व कार्याचा व कार्यपध्दतीचा आदर्श होता. त्याचबरोबर ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास,

तुकाराम प्रभूती संतांचा आदर्शही त्यांनी भक्ती भावाने अंगीकारला, होता. सरदारांनी डिसेंबर 1942 मध्ये स्वतःचे एक अभ्यासमंडळ चालू केले. त्यात राष्ट्रवाद, मार्क्सवाद इ. प्रणालीची माहिती देण्यास आरंभ केला. 1947 मध्ये निघालेल्याा 'नवभारत या मासिकांच्या संपादकार्य संयोजनाच्या बैठकीमध्ये नऊ वर्षे सरदार नियमितपणे हजर असत. सरदारांचे व्यासपीठ 'मुक्ते विदयापीठ' हे आहे सरदार आपल्या आशयाशी पूर्ण इमान राखतात हेही एक त्यांच्या व्यक्तीमत्वाचे वैशिष्ट आहे.

सरदारांनी निवृत्ती आल्यानंतर त्यांच्या लेखन आणि प्रबोधन कार्याला वेग आला. 1971 मध्ये कौशीक व्याख्यानमाला, 1973 मध्ये सेनापती बापट स्मारक व्याख्यानमाला, 1977 साली धर्मानंद कोसंबी व्याख्यानमाला 1979 मध्ये आणि तसेच 1975 मध्ये मुंबई उपनगर मराठी साहित्य संमेलनाचे अध्यापद तर दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद 1978 साली त्यांना लाभले.

## मराठी निबंध वाङःमयाचे प्रकार व त्याची जडणघडण

प्रफुल्ल नागोसे
एम. ए. १

केवळ गेल्या पाऊणशे वर्षातील उपरोक्त कल्पना पाहिल्या कि आपणास 'जुने निबंध' आाणि 'नवे निबंध' असे दोन प्रकार करूनच व्याख्या अथवा स्वरूप ठरविले पाहिजे. मराठी निबंधातील प्रकार मुख्यःता हे दोनच वाटले तरी आणखीही पाडता येतील व त्याच्या विषयी विचार करता येईल.साधारणतः उपदेशपर निबंध, ज्ञानप्रसारात्मक निबंध, मत प्रचारात्मक निबंध, वृत्तपत्री, पत्ररूप निबंध, व्यक्तीचित्र अथवा शब्दचित्र असलेला निबंध आणि लघुनिबंध---इ. संज्ञा त्या त्या निबंधाच्या प्रकारास विषय, मांडणी व व्यक्तीनिष्ठ यांच्यावरून देता येतील. त्यांच्या विषयाची अधिक माहिती येथे करून देता येतील. मराठी वाङःमयाचे निबंध पुढे दिल्याप्रमाणे निरनिराळया प्रकाराचे आढळतील.

**प्रकार :—**

**1) <u>उपदेशपर निबंध</u> :—**

मराठी निबंध प्रकाराला सुरूवात उपदेशपर निबंधाने झाली आहे. मिसेस फरार, र. वुइलसन या मिशनरी लोकांनी आणि प्रारंभीच्या स.का.छत्रे, महाजन, बाळशास्त्री जांभेकर, गोंविद नारायण मांडगावकर वगैरे, लोकहितवादीच्या निबंधकारानी समाजात अधोगतीतील नेणा—या व्यसनावर निबंध लिहुन उपदेश केला आहे. 'बाळमित्र' यामधील छत्रे याचे लेख.'मध्यपान निषेधक बोध', 'सदाचार' इत्यादी विविध प्रकाराच्या मथळयाखाली उपदेश पर निबंध आलेला आहेत.

**2) <u>ज्ञानप्रसारात्मक निबंध</u> :—**

यांनाच विचारपुर्ण गंभीर थाटाचे निबंध असे दुसरे नाव देता येतील ज्ञानप्रसारात्मक स्वरूप असल्यामुळे लालित्य हा भाग अर्थातच फारसा नाही. ज्ञान प्रसारकांतील 'रसायनशास्त्र', 'उद्भिज्ज पदार्थ', 'पदार्थ विज्ञान', व्यापार व राज्यविषयक निबंध इ. सर्वच याच सदरात येतील. किंबहुना जुने निबंध हेतुत पांडित्य प्रदर्शनाचे असल्यामुळे आरंभापासुन केळकरापर्यतचे निबंधकार अशाच प्रकाराचे थाटाचे निबंध लिहित.

**3) <u>मतप्रचारात्मक निबंध</u> :—**

यांनाच 'वृत्तपत्री निबंध' म्हणावयास हरकत नाही. कारण हे निबंध मुखतः वर्तमानपत्रे व मासिके यांतुनच आलेला आहे. खिस्तिीधर्माचा प्रसार करण्यासाठी 'ज्ञानोदय' (1852), 'सत्यनिरूपण' (1855), 'दंभहारक' (1870) ही नियतकालिके सुरू होवुन आदेश मुक्त, स्वमतप्रचार व दुस—याच्या मताचे खंडन सुरू झाले. परंतु या प्रकारास प्रगल्भ स्वरूप आणले. निबंध मालेनेच आमच्या देशाची स्थिती हा एकच निबंध पहा. यात इंग्रजाची केलेली चेष्टा व स्वतांच्या गुणची केलेली तरफदारी आढळेल.

**4) <u>पत्ररूप निबंध</u> :—**

हा प्रकार उपदेशपर अथवा ज्ञानपर असु शकेल. निबंधकार आपला विचार वाचकांना पत्ररूपाने कळवित असतो. ही केवळ एक रचनेची बाब आहे. इतकेच 'प्रभाकारांत'

लोककहितवादी (1848) शतपत्रे लिहिली. नंतर आगरकरांनी सुधाराकांतुन महाराष्ट्रीयांना 'अनावृत्त पत्रे' पाठविली. अच्युतराव कोल्हटकरांनी 'वत्सल्यावहिनीची पत्रे' प्रसिद्‌ध आहेत. पत्ररचनेत महत्वाची गोष्ट म्हणजे लेखक व्यक्तीने निःसंकोचपणे व्यक्तीगत जिव्हाळा दाखवुन वाचकांशी सोप्या भाषेत गप्पा मारल्या पाहिजेत.

5) **<u>व्यक्तीचित्र निबंध</u>** :—

इंग्रजीत यास (Characters Essay) अशी संज्ञा आहे. निबंधकार वाचकांना आकर्षक वाटावे, म्हणुन काल्पनिक व्यक्ती रंगवुन त्याद्धारे विषय रंगवितो. इंग्रजीत ऑडिसनने सर रॉजर कार्वेल ही व्यक्ती अशीच रंगवली आहे. परंतु नंतर काल्पनिक व्यक्ती रंगविण्यापेक्षा प्रत्यक्ष सृष्टीतील व्यक्तीचे चित्र निबंध रूपाने रंगविण्याचे कार्य सुरू झाले. इंग्रजीतील या प्रकाराच्या उत्तम नमुना ए.जी गार्डिनर याने 'ॲरिक्कथ चर्चिल', 'रूझवेल्ट', 'जामनगरचा राजपुत्र' इत्यादी थोर लोकांचा स्वभावचित्रातुन प्रकट केला आहे.

6) **<u>विनोदी—निबंध</u>** :—

विनोदी लेखांविषयी अनेक लोकांचे मत असे कि 'विनोदी वाङःमय' हे स्वतंत्र दालन करावे व त्यात विनोदी निबंध बसवावे पण हे कितपत उचित ठरेल ? विनोदी नाटक , नाटक या सदरात न घालता विनोदी वाङःमयात घालणे कितपत योग्य होईल ? वास्तविक गंमत ही कि विनोद हा एक लेखनाचा गुण मानला पाहिजे व तो भाषा शैलीच्या कक्षेत जमा करावयास पाहिजे. मराठी विनोदी निबंध फारसे नाहीत. 'सुदाम्याचे पोहे' यांना लघुकथाच्या कक्षेत ठेवण्यापेक्षा तंत्रदृष्टया निबंधातच ठेवणे युक्त आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हाटकर, गडकरी, जोशी, अत्रे हेच प्रमुख विनोदी निबंधकार आहेत. विनोदी निबंध रचनेच्या दृष्टीने आटोपशीर असावा लागतो. एखादी व्यक्ती किंवा प्रसंग यांचा आधार घेवुन अतिशयोक्ती व विसंगती यांच्याद्धारे विनोद व उपहास निर्माण केला जातो. श्रेष्ठ विनोदी निबंधकार केवळ आनंद अथवा मनोरंजन निर्माण करून थांबत नाही. समाजातील दोष हसत खेळत दाखवुन समाज सुधारण्याचे साधन म्हणुन तो विनोदांचा आश्रय धरीत असतो. उपदेशपर निबंधाने जे कार्य होणार नाही ते विनोदी निबंधातुन सहज होवु शकते.

7) **<u>टिकात्मक निबंध</u>** :—

ग्रंथ समीक्षणपर किंवा वाङःमयीन तत्वविषयक लिहिलेले स्फुट 'लेख निबंध' मानण्याची पूर्वीपासुन पद्‌धत आहे. का.वा. मराठे याचा 'नावल' व नाटक हयाविषयी निबंध (1872) दादोबा पांडुरंग यांचा केकावली वरील व हंस यांचा मोरोपंतावरील निबंध विष्णुशास्त्री चिपळुणकरांचे 'जयपाल' व वाङःमय विषयक निबंध याशिवाय कोल्हाटकर, केळकर, फडके, खांडेकर, माडखोलकर, वा.ना.देशपांडे इ. टिकाकारांचे विविध निबंध या सदरात असु शकतील. पहिल्या महायुद्‌धापर्यतच्या वाङःमयीन किंवा परिक्षणात्मक निबंधात विषयालाच महत्त्व असे. लेखकाचे अस्तित्व फारसे जाणवत नसे. परंतु गेल्या पंचवीस वर्षात हया निबंधकारावरही कलेच्या व आत्मनिष्ठेचा संस्कार झालेला दिसुन येईल.

8) **<u>लघुनिबंध</u>** :—

यालाच 'गुंजगोष्टी' 'ललित निबंध' अशी नावे प्रो.फडके देतात. 'नवा निबंध' तो हाच विषयापेक्षा निबंधकाराला व त्यांच्या आत्मनिवेदन भरपुर वाव, अनिर्बंध वाटणारी पण काळजीपुर्वक केलेली रचना क्षुल्लक विषयांतुन सौंदर्यनिर्मिती करण्याकडे कल, मित्राच्या भुमिकेवरून गप्पा मारीत विचारांचा धागा उलगडत जाण्याची हातोटी, साधी, खेळकर व विनोदी भाषा ही सामान्ये लक्षणे आहेत. फडके, खांडेकर, काणेकर, दांडेकर, संत.य.गो.जोशी, साळगावंकर, दौडकर इ. लेखकांनी हयाच धर्तीचे निबंध रचले आहेत

**<u>मराठी निबंध वाङःमयाचे जडणघडण</u>** :—

गत दोन शतकांच्या प्रदीर्घ कालावधीत मराठी गद्‌याचा विकास ज्या टप्पांमधुन झाला. ते टप्पे म्हणजे समकालीन, सामाजिक, राजकिय जीवनातील विशिष्ट वळणे आहेत. महाराष्ट्रात इंग्रजी राज्य झाल्यावर नवशिक्षित भारतीयांनी येथील समाजात विचार जागृतीचे चैतन्य

जागवण्याची केलेल्या गद्य लेखनातुन नव्या राजवटीच्या प्रभावाखाली आमचा समाज ज्या स्थितीगतीतुन गेला त्याची चुनुक अचुक मिळते. दुसरे असे की इंग्रजीतुन त्यांच्यापर्यत पोचलेला ललित लेखनापेक्षा वैचारिक गद्यानेच त्यांच्या चिंतनाला व कार्याला अधिक प्रभावित केले आहे. 'शुन्यातुन गरूडभरारी' असे जिचे वर्णन सार्थपणे करता येईल. अशी वाटचाल या शतकामध्ये मराठी गद्याची झाली आहे. 1818 साली पेशवाई संपुर्ण महाराष्ट्रारात ईस्ट इंडिया कंपनीची राजवट सुरू झाली. तेव्हापासुन पुढे सत्तराऐंशी वर्षाचा इतिहास म्हणजे ब्रिटिश राजवटीची स्थानिक समाजाच्या झालेल्या क्रियाप्रतिक्रियांच्या इतिहास म्हणता येईल ब्रिटिश राजवटीमुळे भारतीय समाजाचा बौद्धिक विकास संपुर्णपणे नव्या दिशेने घडुन आला. आणि त्या अनुषंगाने त्याचा राजकिय, धार्मिक आाणि आर्थिक दृष्टीकोनात बदल झाला. एका शतकाच्या आतच भारताचा जणु मध्ययुगात शतक न ठरता ज्ञानविस्ताराचे जीवनविषयक नव जाणिवाचे विचार, प्रवाहामधील अंतःकलहाचे आत्मपरिक्षणाचे आणि मुलभुत प्रश्नांना भिडण्याचे शतक ठरले होते. या समातात तत्पुर्वीच्या हजार वर्षात जे घडले नव्हते ते विविधांगी बदल या शतकाने घडवुन आणले.

अशा प्रकारे मराठी निबंध वाङःमयाचे प्रकार व त्याची जडणघडण त्यांनी सविस्तरपणे मांडली गेली आहे.

# भालचंद्र नेमाडे यांच्या कविता

वैशाली चवरे
एम. ए. २

नेमाडेंच्या बहुतेक कविता स्त्रीविषयक जाणिवांनी व्यापलेल्या असुन. आपल्या कवितेत तसेच कथा कादंबऱ्यांत त्यांनी स्त्रीला आदराचे आणि पूज्येतेचे स्थान दिले आहे. त्यांच्या प्रेमकविताही मांगल्यावर उधळण करणाऱ्या आहेत. प्रेमात विफलता वाटयाला येऊनहि तयांनी स्त्रीला दूषणे दिलेली नाहीत. त्यामूळे त्यांच्या प्रेमानुभवात कोठेही आक्रमता. क्रौर्य किंवा स्फोटकता जाणवत नाही. कुठे त्रागा किंवा उद्रेग दिसत नाही. यात शृंगाराच्या  टाही फारशा जाणवत नाही. तसा वासनेचा र्स्पशही जाणवत नाही. प्रेम जपायचे असत हाच भाव सर्वत्र दिसून येतो.

नेमांडेच्या काव्ययात्रेची सुरूवात ही प्रेयसीच्या प्रेमविषयक कवितांनी झाली असली तरी या प्रेमकविता विग्धप्रेमाच्या रंगात रंगलेल्या नाहीत किंवा प्रेयसीची मनोहारी चित्रेही मांडली नाहीत. उलट ऐन यौवन काळात त्यांनी विफल प्रेमाच्या चटक्यांनी सावध होण्याचे क्षण टिपणाऱ्या कविता लिहिल्या आहेत. "पिंगट रानाला राघू सोडून चालल" आणि झाड खुणेचे हरवुन बसलो' या दोन्ही कविता कवीच्या तरुण काळातील आहेत. हया दोन्ही कवितांमधील प्रेयसी प्रियकराला एकाकी सोडून दु:खाचा भोगवटा देऊन गेली आहे. तो तिच्या जाण्याने दु:खी होतो पण क्रोधित होत नाही. उलट 'झाड खुणेचे हरवुन बसलो' अशी विराणीच तो गातो. आपलेच चुकले' ही जाणिव या कवितातुन सातत्याने जाणवतो. तो स्त्रीला........ आपल्या प्रयेसीला त्याचा बोल लावत नाही. ' चुकली बोटे पोरी, आता माझो डोळे सोड' असे म्हणुन स्वत:ला अलिप्त ठेवण्याचा तो प्रयत्न करतो.

'झाडे खुणेचे हरवुन बसलो' या कवितेत, प्रयेसी विवाहानंतर सासरी जात आहे आणि प्रियकर आपल्या प्रेमाचया खुणा शोधत भटकत आहे. तयाला आता नेहमीचे खुणेचे झाडही

दिसत नाही. रानात फिरतानाच्या प्रेमाच्या खुणा आता सावल्यांच्या खेळासारख्या भासु लागतात. नेमाडेंनी प्रेमभंगाचे दु:ख स्वत:कडे घेऊन जाणाऱ्या प्रेयसीला डोळयातील अश्रु लपवत निरोप देणाऱ्या प्रियकराचे चित्र रेखाटले आहे. ' कशा रांगोळया घातल्या तूम्ही' या कवितेत दु:खातही आनंदाने संसाराचा भार वाहणाऱ्या स्त्रीचे चित्रण केले आहे. घराती स्त्री कितीही दु:खी असो, ती आपला दैनंदिन जीवनक्रम चुकवत नाही. दु:खाचे कढ आतल्याआत पचवुन ती घराचे 'घरपण' टिकवण्याचा प्रयत्न करते. पुरुष मात्र तिच्या या त्यागाची आणि कष्टाची जराही नोंद घेत नाही उलट तिचा □ळच करतो.

**डोळयाचा भार नको पदराला, बाई**

**तुझ्या पदराचे पोत टिको**

तिचे सांत्वन करताना चिमणीचे अन□खोप्याचे चित्र तिच्यासमोर उभे करुन चिमणीला तसे सृजनाचे सुख मिळणार आहे तसेच तुलाही मिळेल. तुझी कुस पुन्हा भरेल..... तुझ्या मातृत्वाला पुन्हा अंकुर फुटेल.... तेव्हा तू अश्रु ढाळु नकोस अशी तिची समजुत काढतो. नेमाडेंची ही कविता वाचताना गोविंदाग्रजंची 'राजहंस माझा निजला' या ककितेची आठवण येते. झिमझिम उन्हे तिच्या दारी' या कवितेत आईच्या उलवलेल्या कुसेचे स्वागत आहे. आता काळोख संपुन उन्हे अंगणात आली आहेत. त्या कोवळया उन्हाचे स्वागत करायला तु सज्ज हो असे तो सुचित करतो. 'रंग पाहिले पोटातल 'श्स कवितेतुनही मातृत्वाचाच विषय हाताळला आहे. गर्भातिल मुलासाठी घागरीतल्या पाण्यावर पडलेल्या चंद्राची प्रतिमा येते. नेमाडेंनी नेहमीच पितृत्वापेक्षा मातृत्वाला जास्त महत्व दिले आहे. पण जसे हे मातृत्व परावलंबी आहे हि जाणीव आपल्या वाटेने जाणारे दिवस' या कवितेतुन होत. कवी म्हणतो.

**बापाशिवाय आई नाही, आईशिवाय आपण् नाही**

**आपल्याशिवाय काही नाही, आहे शिवाय नाही नाही.**

स्त्रीच्या मातृत्वाचेहे परकेपण अस्वस्थ करते. आपल्या जन्मानंतर आईने असे परभृत मातृत्व स्वीकारु नये असे त्याला वाटते.

**चुबुक् चुबुक् नको गर्दी माझ्याशिवाय,**

**तुझे स्तन माझे फक्त पिण्याचे**

कची इथे 'फक्त' या एका शब्दानेच वडिंलाचे आपल्या आईशी असलेले नाते नाकरातो. कवी आईवर आपल्या एकटयाचाच हक्क सांगुन पितृसत्ताक व्यवस्थेलाच नाकरताना दिसतो. कवी आपल्याच आईकडे एक स्त्री म्हणुन पाहतो. तिने पुरूषाच्या मर्जिला सांभाळत बसु नये असेही सुचित करतो.

**आईत आई एकटयाची एकटयाची**

**एकापेक्षा जास्त अंडी घालु नको मादीबाई**

आईला मादिबाई म्हणणारे नेमाडे एक एकमेव कवी असावेत पण इथे संपुर्ण स्त्रीच्या अस्तित्वाचात त्यांनी विचार केला आहे. केवळ पुरुषाच्या इच□खातर मुलांना जन्म देणाऱ्या आईचे श्रम त्याला अस्वस्थ करतात हेच त्यामागचे कारण आहे. एकुणच नेमाडेंच्या साहित्यामध्ये बापाला फारसे स्थान दिले नाही. उलट बापाची करडी बाजुच चित्रित केली आहे. 'फुटले नव्हते कुशीत 'या कवितेत कवीने यौन अवस्थेतील आपली संयमित अवस्था व्यक्त केली आहे. स्त्रीबद्दलचे गुढ आकर्षण तर इथे आहेच पण वाब□पाहण्याची व्याकुळताही आहे.

**मी गळत–ब्रह्मचार्याचा प्यासा-अजुन**

**तिसेक वर्षे पुरले ताठा**

असे कवी म्हणतो. वासनांना कोणत्याही मार्गाने वाट करून देण्यापेक्षा वासना थोपविण्याचा मार्ग तो पसंत करता. त्याला स्त्रियांचा शारीरिक संबंध हवाहवासा वाटला तरी तो नैतिकतेची सीमा ओलांडु शकत नाही. स्त्रीला जवळ करण्यापेक्षा तिला दुर ठेवण्याचाच प्रयत्न कवी करतो. शेवटी लग्न होऊन पत्नी हची खरी हक्काची स्त्री असते. नेमका हाच विचार 'स्त्रिमुक्त या कवितेतुन व्यक्त झाला आहे.

नेमाडेंच्या अनेक कवितांतुन स्त्रीमुक्तीच्या आधुनिक कल्पनेला विरोध असल्याचे जाणवते. उत्पत्तीचे तत्त्व हेच संसारातल एकमेव सत्य आहे असे सांगुन प्रेमविवाहासारख्या नव्या कल्पनांचा उपहास केला आहे. 'सांस्कृतिक स्वप्न खाटेबाहेर बरी 'असे म्हनुन स्त्रीसाठी करावा लागणारा खटाटोप त्यांना मान्य नाही. तीन मिनिटांच्या झिंगेसाठी जीवनातला कितीतरी मोठा काळ माणुस खर्च करतो. शेवटी काय होत? लग्न आणि मुले. अर्थात मुलांची निवड आपल्या हाती नसते उलट तीच आपणाला निवडतात.

## प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्याची राजकीय, सामजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी

योगेश ठाकरे

एम. ए. १

ज्ञानेश्वरांच्या काळात म्हणजे यादव राजवटीच्या उत्तरार्धात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. सर्वत्र अधर्माचे साम्राज्य पसरलेले होते. सुखसीनतेच्या आहारी गेलेले ब्राम्हण—क्षत्रियादी उच्चवर्णी लोक कर्तव्यापासुन बाजुला झाले होते. त्यामूळे एकुणच वैदिक धर्माची निष्प्रभ झाली होती. वैदिक परंपरेतील यज्ञीय हिंसा वर्णाधिष्ठता, विषमता व कर्मठपणा यांनी उच्छाद मांडला त्याचवेळी उत्तरेकडील राजकीय आक्रमणाचे परिणाम दक्षिणेतही जाणवु लागले होते. वैदिक परंपरेली शब्दपंडित्याला व कर्मकांडाला कटांळलेल्या जणतेत मोठाच गोंधळ निर्माण होऊ लागला. अशा गोंधळलेल्या अवस्थेतुन मराठील बहुजन समाजाची बुध्दी व अंत:करण सावरून धरण्याचे ऐतिहासीक कार्य ज्ञानदेवांनी व एकुणच वारकरी संप्रदायाने केले. त्यानी आपल्या प्रभावी लेखणीतुन आणि वाणीतुन वर्णाश्रमाची व जातीभेदाची तीव्र धार बोथट केली. सर्वाच्याच उध्दारासाठी नामस्मरणप्रधान भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. महानुभव पंथप्रामाणे संन्यास वृत्तीला अवास्तव महत्व न देता प्रपंचात राहुन, कर्तव्यकर्मांना सामोरे जाऊन परमार्थसाधनेची दिशा दाखविली. वैदिक परंपरा न सोडताही कवेळ नामस्मरणाने परमार्थ साधण्याची प्रेरणा मिळाल्याने बहुजन समाजाच्या मनातील गोंधळ कमी होऊन संपुर्ण समाज वारकरी संप्रदायाकडे आकर्षित झाला.

वारकरी पंथ पुर्वीपासुन चालत आला असला तरी युगानुरूप त्याला व्यापक व व्यवहारिक स्वरूप देण्याचे महान कार्य ज्ञानदेवांनी केले म्हणुनच मोठया श्रध्देने 'ज्ञानदेवे रचिला पाया' असे म्हटले जाते. याच भागवत धर्माचा कळस होण्याचे भाग्य तुकारामांसारख्या अपेक्षित जातीतील संताच्या वाटयाला आले. या घटनेतच वारकरी संप्रदायाच्या सार्वत्रिक यशाची ग्वाही मिळते. या वारकरी पंथाने जातीभेदावर कठोर प्रहार करून अठर पगड जातीना एकत्र आणले. भेदाभेद संपुष्टात आणले. ज्ञानेशवर, एकनाथ, तुकाराम, गोरा कुंभार, सावता माळी, सेना न्हावी ही नावे जरी पाहिली तर वारकरी पंथाने केलेल्या ऐक्याची कामगिरी लक्षात येते. समता  समानता, ऐक्य, बंधुभाव ही या पंथाची तत्वे खुपच परिणामकारक ठरली. या पंथानेच महाराष्ट्राला पुरोगामित्व बहाल केले. आजही या पंथाच्या तत्वज्ञानावर महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे.

## वारकरी पंथाचे साहित्य व कार्य

वारकरी पंथाचे आद्य प्रवर्तक म्हणुन ज्ञानदेवांना ओळखले जाते. त्यांनी अत्यंत अल्पवयात ‘भावार्थ दिपीका’ म्हणजेच ज्ञानेश्वरी ‘अमृतानुभव’ चांगदेव पासष्टी’ व हरिपाठ’ हे चार ग्रथं लिहले. यातील भावार्थ दीपिका अर्थात ज्ञानेश्वरी हा गीतेचा रसाळ अनुवाद आहे. मूळ संस्कृतमधील गीतेचा अर्थ सोपा  करून सर्वसामान्य व्यक्तीसाठी त्यातील तत्वज्ञान खुले केले आहे. वर्ण व्यवस्था, कर्मसिध्दांत, पुनर्जन्म, अवतारवाद, यज्ञसंस्था, दैवी गुण संपत्ती इ. वैदिक पपरंपरेतील तत्वांना धक्का न लावता गीतेच्या आधारे त्यांनी तारतम्य बुध्दीने त्यांचे व्यापक अर्थ लावले. सर्वांना सुलभ ठरेल असा नामस्मरणाचा उपाय भक्तीसाठी सुचविला. कर्मालाच धर्म मानून सेवेला त्याने महत्वाचे स्थान दिले. भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग यातील कोणत्याही मार्गाने परमेश्वराची आराधना करावी. परमेश्वराच्या उपासनेसाठी कर्म सोडून संन्यास घेण्याची आवश्यकता नाही, उलट नियतीने नेमून दिलेले कर्म करणे हीच एक पूजा आहे. असा गीतेतील सिध्दांत सविस्तरपणे मांडला. नामस्मरणाच्या बळावर सामान्य माणूसही श्रेष्ठ पदवीला पोहोचू शकतो हे त्यांनी अत्यंत रसाळ भाषेत विशद केले. म्हणूनच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत श्री ज्ञानेश्वरांचा व त्यांच्या ज्ञानेश्वरीचा खूप महत्वाचा वाटा आहे.

भक्तियोगाच्या माध्यमातून वारकरी संतांनी आपल्या साहित्य निर्मितीसाठी सामाजिक समता हाच धागा प्रमाण मानला परमेश्वराच्या दारात कोणी उच्चनीच नाही. गरीब श्रीमंत नाही हा विचार मग त्यांनी रूजविला. ज्ञानदेवांच्या प्रभावळीतील नामदेवांपासून तुकाराम जनाबाईपर्यंत सर्वांनीच ओव्या, अभंग, भारूड, कीर्तन याव्दारे प्रबोधनाचे कार्य केले. नामदेवानी तर पंजाबपर्यंत मजल मारली. पंजाबात दीर्घकाळ वास्तव्य करून त्यांनी भक्तिमार्गाचा प्रचार अन् प्रसार केला म्हणूनच त्यांच्या हिंदी पदाना शिखांच्या ‘गुरूग्रंथसाहेब’ या ग्रंथातही स्थान मिळाले आहे.

तुकारामची अभंग गाथा.... जनाबाईच्या ओव्या..... एकनाथांची भारूडे...... यांनी समाजाची मने जिंकली, बंदिस्त असलेले ज्ञान लोकापर्यंत सहजतेने पोहाचविण्याचे कार्य या संतांनी केले. सावता माळीने तर कांदा मुळा भाजी ।अवधी विठाई माझी।। एवढी सहजता आणली. त्याही पुढे जाऊन ‘तुझे आहे तुजपाशी’ हा सिध्दांत मांडला. देव दुसरीकडे कुठे नसून प्रत्येकांच्या देहात वसत आहे हे पटवून दिले. ‘देहीच भेटला देव आम्हा’ या चोखामेळयाच्या अभंगामुळे मोक्षप्राप्ती सहज शक्य झाली दृ एकूणच संपूर्ण भारताला.... इतकेच नव्हे तर संपूर्ण जगा शाश्वत सुखचा मार्ग दाखविण्याचे कार्य या संप्रदायाने केले. महाराष्ट्राला एक भक्कम अशी अध्यात्मिक बैठक मिळवून दिली. कर्मकांडाविरूध्द बंड करणाऱ्या ज्ञानेश्वरांनी त्याचा पाया घातला.... तुकारामांनी त्यावर कळस चढविला. ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम, चोखामुळा, सावता माळी, नरहरी सोनार, विसोबा खेचर गोरा कुंभार, जनाबाई.... या सर्वांनीच भागवत ध्र्माचा ध्वज खांद्यावर घेवून जनजागरण केले. काळाची गरज ओळखून प्रबोधन केले. अंध:कारात चाचपडत असलेल्या समाजाला प्रकाश दाखविला. निद्रिस्त असलेल्या समाजाला जागे केले. एकतेचा, समतेचा, प्रेमाचा संदेश दिला. प्रपंच सांभाळून परमार्थ कसा साधावा याचे मर्म विशद केले. लोकांना पचेल, रूचेल असा भक्तीधर्म सांगितला. ‘भेदाभेद अमंगळ’ असा उपदेश करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ‘सुखे असा संसारी... मग जवळच आपल्या हरी’ अश सोप्या शब्दात सुखाचा  मार्ग दाखविला. वारकरी संप्रदायाच्या या कार्यामुळेच महाराष्ट्र आणि महाराष्ट्राची संस्कृती इतरांना प्रेरक व मार्गदर्शक ठरली.

## मराठीच्या वऱ्हाडी,अहिराणी,डांगी आणि कोकणी या चार बोलींचा स्वनिम प्रक्रिया, व्याकरण, प्रक्रिया आख्यान प्रक्रिया, शब्दसंग्रह

शाम दरणे

एम. ए. २

**वऱ्हाडी बोली** :–वऱ्हाडीचे क्षेत्र बरेच विस्तीर्ण आहे. बुलढाण्याच्या पश्चिम घाटाच्या पुढेपासून, म्हणजे बुलढाण्याच्या पूर्वेकडून वऱ्हाडीचे क्षेत्र सुरू होते. हे क्षेत्र मध्यप्रदेशाच्या दक्षिण भागापर्यंत पसरलेले आहे. वऱ्हाडी बोलीच्या क्षेत्रमर्यादेत बुलढाण्याचा पूर्व भाग, एलिचपूर, बैतून, शिवनी, बालाघाट या प्रदेशांचा दक्षिण भाग आणि नागपूर, वर्धा,चंद्रपूर, भंडारा, वणी, यवतमाळा, अमरावती, वाशिम, अकोला या प्रदेशांचा भाग समाविष्ट होतो. थेडक्यात म्हणजे परंपरेने वऱ्हाड या नावाने ओळखल्या  जाणाऱ्या प्रदेशात ही बोली बोलली जात असल्यानेच तिला 'वऱ्हाडी' हे नाव प्राप्त झालेले आहे. जॉर्ज ग्रिअर्सनने केलेल्या बोलींच्या वर्गवारीत या बोलीला महत्त्पूर्ण स्थान दिले गेलेले आहे.

वऱ्हाडी बोलजी विस्तीर्ण अशा प्रदेशावर बोलली जात असल्याने तिची पुन: (१) घाटावरची वऱ्हाडी बोली आणि (२) घाटाखालची वऱ्हाडी बोली अशी दोन रूपे दिसतात. याशिवाय वऱ्हाडीचे स्थानिक वैशिष्टयांनुसार नागपुरी, हळबी, बालाघाटी इ. भेद दिसतात, तर धंदा, जात व जमात यांच्या वैशिष्टयांनुसार कोष्टी, धनगरी, झारपी, कुणबी, पोवारी असे भेद दिसतात.

**स्वनिमप्रक्रिया : वऱ्हाडी बोलीची स्वनिम–प्रक्रिया प्रमाण मराठीच्या स्वनिम–प्रक्रियेपेक्षा काही बाबतीत वेगळेपण दाखविते.**

१) प्रमाण मराठीतला अन्त्य दीर्घ इकार बोलीत ऱ्हस्व होतांना दिसतो. उदा.मि.माहि.

२) प्रमाण मराठीतील नपु. रूपातील अन्त्य 'ए' च्या जागी वऱ्हाडीत 'अ' हा स्वर येताना दिसतो. उदा. 'सांगितले' ऐवजी 'सांगितलं', 'याने' ऐवजी 'त्यानं'.

३) वऱ्हाडीच्या काही रूपांत प्रमाण मराठीच्या 'इ' ऐवजी 'ए' आणि 'व' ऐवजी 'य' हे स्वनिम येतात. उदा. दिले> देल्ल, वेळ> येळ(=येर).

४) प्रमाण मराठीत 'ळ' या स्वानिमाच्या जागी वऱ्हाडीत 'य' येतांना दिसता. उदा. डोळा>डोया.

५) प्रमाण भाषेत जेथे स्वरानंतर 'ड्' येतो, तेथे या बोलीत 'र्' येतो.

६) अनेकदा प्रमाण मराठतील 'व' हया स्वनिमाचे उच्चारण 'ओ' कडे झुकतांना दिसते. जवळ> जोय, घडवला >घडोला.

७) प्रमाण मराठीतील शब्दांतर्गत 'ण' च्या जागी 'न' (उदा.पाणी>पानि) आणि शब्दारंभीच्या '' च्या जागी 'ण' (उदा.नाणे >णान, नाथ >नाथ) येताना दिसतो.

८) प्रमाण मराठीतले नपुंसकलिंगी एकारान्त रूप वऱ्हाडीत अकारान्त होते. उदा. पोरगे >पोरंग. ही प्रक्रिया अनेकवचनी नपुंसकलिंगी रूपातही घडताना दिसे. उदा. माणसे >माणसं.

**व्याकरणप्रक्रिया**: वऱ्हाडी बोलीची व्याकरण प्रक्रिया स्थूलमानाने प्रमाण मराठी सारखीच आहे. त्यामुळे आपल्याला वऱ्हाडी कळण्यास फार अडचण पडत नाही. तथापि काही बाबतीत व्याकरणातही वऱ्हाडी बोली प्रमाण मराठीपेक्षा निराळेपण स्वीकारते. त्याची येथे माहिती करून घ्यायची आहे.

**विभक्ती**: वऱ्हाडीची विभक्ति व्यवस्था प्रमाण मराठीप्रमाणेच आहे. फक्त पुढील काही भेद लक्षणीय आहे.

१) चतुर्थीच्या प्रमाण मराठीतल्या 'ला' प्रत्ययाऐवजी वऱ्हाडीत 'ले' चा वापर होतो. उदा. मला>मले, तुला >तुले, पोराला >पोराले, रामाला>रामाले इ. चतुर्थीच्या अनेकवचनात हाच प्रत्यय 'ईस' किंवा 'इले' याप्रमाणे येतो. उदा. बाबाईस, माणसाईले.

२) सर्वनामांची विभक्ति प्रक्रिया वऱ्हाडीत खालीलप्रमाणे होते.

३) प्रथम पुरूषी एकवचनी व्दितीया – मज, मजले, मले.

ब) व्दितीय पुरूषी एकवचनी व्दितीया – तुवा,त्वा, त्या.

क) षष्टी – प्रथम व्दितीय पुरूशांची षष्टीची रूपे होताना 'झा'प्रत्ययाऐवजी 'हा' प्रत्यय लागतो. उदा.: माझा>माहा, तुझी>तुही.

ड) दर्शक व संबंधी सर्वनामांची प्रक्रिया प्रमाण मराठीसारखीच आहे. तथापि त्यांची स्त्रीलिंगी रूपे हे, जे, ते अशी होतात (प्रमाण मराठीत ही, जी, ती अशी होतात)उदा. हे राई (ही मोहरी), ते डोळयी (ती बादली).

**इ) काय या प्रश्नार्थक सर्वनामाची पंचमीची रूपे काहून, काव्हून, काम्हून अशी करण्याची वऱ्हाडीची विशेष लकब दिसे.**

**शब्दसंग्रहः** वऱ्हाडीत प्रमाण मराठीतले काही शब्द जसेच्या तसे सापडतील. (उदा..)झोप, उंदीर, जीव, लाल, दोन इ.) तर काहींच्या उच्चारणात थोडाफार फरक झालेला दिसे. (उदा. डोया, दीस, गावकऱ्डी, कुरतूड (णे), णाने इ.)परंतु याखेरीज वऱ्हाडीचा स्वतःचा असा स्वतंत्र शब्दसंग्रह आहे.

**नागपूरी बोली** : जॉर्ज ग्रिअर्सनने आपल्या बोलीविषयक सर्वेक्षणात नागपुरी बोलीचा निर्देश केलेला आहे. नागपूर, वर्धा, चांदा (चंद्रपूर) व भंडारा हे आजच्या महाराष्ट्र राऱ्यातील चार आणि शिवनी, छिंदवाडा, बालाघाट व रायपूर हे आजच्या मध्यप्रदेशातील चार, अशा एकुण आठ जिज्यांचे क्षेत्र हे नागपुरी बोलीचे क्षेत्र म्हणून नमुद केलेले आहे. कादरंबरीकार ग. त्र्यं. माडखोलकर यांनी आकाशवाणीवर केलेल्या 'नागपूरी बोली' या आपल्या भाषणात नागपुरी बोलीची क्षेत्रमर्यादा नागपूर, वर्धा, चांदा (चंद्रपूर) आणि भंडारा हे चार जिल्हे आणि छिंदवाडा व बालाघाट यांच्या सरहद्दीच्या प्रदेश अशी सांगितली होती. प्रा.सुरेश डोळके यांच्या मते, नागपुरी बोलीच्या क्षेत्रात नागपूर व वर्धा हे संपुर्ण जिल्हे चंद्रपूर व भंडारा या जिल्हयाचा पश्चिम भाग, छिंदवाडा जिल्हयातील सौंसर ही तहसील आणि बालाघाट जिल्हयाचा नैऋत्येकडील भाग हया प्रदेशांचा समावेश होतो.

**नागपुरीचा शब्दसंग्रह**: नागपुरी बोलीत प्रमाण मराठीतील शब्दांऐवजी फारसी, अरबी व हिंदी भाषांतील विपुल शब्द आढळतात. उदा. अजब्, कज्जा, खबर, गवार्, जमाना, पागल्, बिमारी, रईस्, शिकयत्, सफेदी, हय्रान् इ.

**अहिराणी (खानदेशी) बोली** : अहिराणी किंवा खानदेशी या नावाने ओळखली जाणारी बोली ही मराठीच्या बोलीसमूहातील एक वैशिष्टयपुर्ण बोली आहे. बऱ्हाणपूर, धुळे जिल्हा, जळगाव जिल्हा, नाशिक जिल्हयाचा उत्तरेचा भाग अशा विस्तृत प्रदेशवर ही बोली बोलली जाते. खानदेश या प्रदेशवाचक नावानुसार ती **खानदेशी** या नावाने ओळखली जाते, तर खानदेशातील आभीर (म्हणजे आजचे अहीर) लोकांची बोली म्हणून तिला **अहिराणी** हे नाव पडलेले आहे. धुळे हा अहिराणीचा केंद्रप्रदेश मानला जातो अहिराणीचे 'बागलाणी' आणि नंदुरबारी' असे सूक्ष्मण प्रादेशिक भेद दिसून येतात. 'बागलाणी' बोली नाशिक जिल्हयातील बागलाणए, वळवण, मालेगाव या तालुक्यांत बोलली जाते. 'नंदुरबारी' नंदुरबार,तळोद या भागांत बोलली जो. जातीजमातींनुसार अरिहाणीचे पावरी, भिल्ली,लाडशिक्की, असेही उपभेद होतात.

**अहिराणी (खानदेशी) बोली** : अहिराणी किंवा खानदेशी या नावाने ओळखली जाणारी बोली ही मराठीच्या बोलीसमूहातील एक वैशिष्ट

**कोकणी बोली** : कोकाणी ही मराठच्या संदर्भातील वादग्रस्त बोली होय, कोकणी मराठीची बोली आहे की ती स्वतंत्र भाषा आहे. याबाबतचा वाद सतत खेळला गेला. या वादास राजकारणाची जशी पार्श्वभूमी होती, तशीच स्थानिक अस्मितेचीही पार्श्वभूमी होती. इतर कोणत्याही आर्यभाषेत न आढळणारी अशी स्वतःची काही वैशिष्ट्य कोकणीने जपलेली आहेत. त्यामुळे मराठीशी अनेक बाबतीत साधर्म्य असूनही मराठी भाषिकांना पूर्वाभ्यासाशिवाय तिचे नीट आकलन होऊ शकत नाही. ग्रिअर्सनने आपल्या वगर्भ्करणात कोकणीला मराठीची बोली ठरविलेले आहे. पश्चिमघाट आणि अरबी समुद्र यांच्यमधील अरूंद डोंगराळकिनारपट्टीचा भूप्रदेश कोकण या नावाने ओळखला जातो. दमण ही या प्रदेशाची उत्तरसीमा होय. गोव्याच्या तेरेखेलचा भाग किंवा म्हैसूर राज्याचा भाग जेथे समद्राला स्पर्श करतो तेथपर्यंतचा भाग ही या प्रदेशाची दक्षिणसीमा होय. या प्रदेशात ठाणे, कुलाबा—रायग डहे जिल्हे, मुंबई व तिची उपनगरे, रत्नागिरी जिल्हा, गोवे आणि गोव्याच्या दक्षिणेकडील थोडा भाग समाविष्ट होतो.

**स्वनिम :**व्यवस्था आणि शब्दसंग्रह या दोन दृष्टींनी कोकणी ही इतर कोणत्याही आर्यभाषेपेक्षा मराठीस जवळची असल्याचे कालेलकर सांगतात. परंतु त्याचबरोबर, 'मराठी आणि कोकणी' या संस्कृतापासून निघून दीर्घकाळपर्यंत एकाच दिशेने उत्क्रांत होत गेल्या असल्या पाहिजे, 'किंवा' प्रतयांची निवड ही मूलतः शब्दसंग्रहाशी संबंधित अशी बाब आहे आणि शब्दसंग्रहाची तुलना ही दोन भाषांचे संबंध निश्चित करण्याला मार्गदर्शक असा पुरावा होऊ शकत नाही,' असेही ते सांगतात. त्यामुळे उपलब्ध भाषाशास्त्रीय पुराव्यांच्या आधारे कोकणी—मराठीबाबत निश्चयाने काही एक सांगता येत नाही.

डॉ. कालेलकरांनी भाषिक वर्गीकरणाच्या दोन महत्वाच्या कसोटया सांगितल्या आहेत, त्या म्हणजे भाषाशास्त्रीय कसोटी आणि सांस्कृतिक कसोटी. भाषाशास्त्रीय कसोटीत परस्पर आकलनाचे तत्व समाविष्ट आहे. कोकणी बोलीपैकी दक्षिण कोकणी कसोटीनुसार डॉ. कत्र यांच्या प्रबंधात वर्गण केलेल्या कोकणी बोलींना मराठी भाषकांच्या दृष्टीने एक वेगळी भाषा मानणे भाग ओ. असे कालेलेकर म्हणजतात. आता मराठी—कोकणी हा जटिल वाद काळाच्या ओघात सुटलेला असून कोकणी स्वतंत्र भाषा म्हणून मान्यता मिळालेली आहे.

# दलित कथा

प्रतीक भोयर

एम. ए. २

दलित साहित्यात कविता ज्या प्रभावाने पुढे आली, त्या प्रीाावाने कथा पुढे आली नसली तरी संख्यात्मक दृष्टिकोनातून विचार केलयास कवितेच्या खालोखाल कथेचा क्रमांक लागतो. दलित कवितेने ज्याप्रमाणे मराठी काव्यप्रांतात आपला वेगळा ठसा उमटविला तसा दलित कथेने जरी आपला ठसा उमटविला नसला तरी मराठी साहित्यात दलित कथेन आपले लक्षणीय स्थान प्राप्त केले आहे अनेक तरूण दलित लेखकांनी कथा वाङ्मयाचा स्वीकार केला. तरूण दलित कथा लेखकांच्या ठिकाणी निर्मितीचा उत्साह आहे. वेगळया जीवनदर्शनाची जाण आहे.

**दलित कथेचे शिल्पकार** : बाबुराव बागुल यांना दलित कथेचे शिल्पकार मानण्यात येते. 'जेव्हा मी जात चोरली होती' हा बागुलांचा कथासंग्रह म्हणजे इलित कथेचा संग्रह मानला जातो. अर्थात बागुलांच्या आधीही अण्णाभाऊ साठे व शंकरराव खरात या दलित लेखकांनीही कथा वाङ्:मय प्रकार हाताळला आहे. त्यांचे महत्तवपूर्ण योगदान अमान्य करता येत नाही. त्यांच्या कथेत दलित जीवनाच्या सुखदु:खात्मक स्वरूपाचे चित्रण आहे. दलित जीवनातील दारिद्रय, दैन्य, अगतिकता, दु:खग्रस्तता यांची चित्रे अण्णाभाऊ साठे व शंकरराव खरात यांच्या कथेमध्ये आलेली आहेत. परंतु प्रा.कवठेकर, साठे व खरातांना दलित कथेचे शिल्पकार मानत नाहीत. ते बाबुराव बागुल यांना दलित कथेचे शिल्पकार मानतात कारण त्यांच्या कथेत दलित साहित्याचे वेगळेपण सिध्द करणारे सामर्थ्य आहे. बुलांच्या कथेत आत्मभान आहे. साठे, खरात यांच्या कथा खांडेकरी वळणाच्या होत्या. कारूण्याचे चित्रण त्यांनी अधिक प्रमाणात रंगविले आहे.

**दलित कथेच प्रारंभबिंदू** : बाबुराव बागुलांची कथा ही दलित कथेचा प्रारंभबिंदू असे प्रा. कवठेकर मानतात अण्णाभाऊ साठे  व शंकरराव खरात यांच्या कथांत दलितांचे दु:ख आहे. त्यांच्या कथा वाचकांच्या कर्तव्युबुध्दीला सादर घालतात. कधी भावनांना हेलावून टाकतात. प्रा. कवठेकर म्हणतात त्याप्रमाणे साठे, खरातांच्या कथांतून आंबेडकरी प्रेरणेने जाग्या झालेला दलित मनाचा प्रत्यय या लेखनातून येत नाही. बागुलांच्या कथेत जी सामाजिक जाणीव कथालेखनातून प्रकट होते ती जाणीव आधीच्या कथाकारात क्वचितच दिसते. बागुलांच्या आधीच्या कथाकारात दलित जवीन असले तरी स्वप्नाळू आदर्शवाद व रंजनवाद आढळून येतो. त्यांच्यासमोर फडके–खांडेकरांचा आदर्श असावा असे प्रा. कवठेकरांना वाटते. तरीही जीवनदर्शनाच्या बाबतीत वेगळेपणा आहे. मात्र प्रकृती फारशी निराळी नाही. प्रकृतीभिन्नतेच्या आणि रूपभिन्नतेच्या दृष्टीने विचारकरता आधीच्या दलितकथाकारात आणि बागुलांच्या कथेत निश्‍चितपणे वेगळेपणा आहे. प्रा. कवठेकर म्हणतात,' नवजागृत दलित आत्मभानातून निर्माण झालेली, प्रगल्भ सामाजिक जाणिवेने युक्त असलेली बागुलांची कथा हाच दलित कथेचा प्रारंभबिंदू मानावा लागतो. जाणीव संवेदनशीलता, जीवनचित्रण या साऱ्याच बाबतीत बागुलांची कथा त्यांच्या पूर्वीच्या कथालेखनापेक्षा वेगळी असल्याचे जाणवते.

**दलित कथेचे बलस्थान** :  बाबुराव बागुलांची कथा ही दलित कथेचा प्रारंभबिंदू तर आहेच पण एकंदर दलित कथेचा श्रेष्ठतम, सर्वोच्च बिंदू ठरलेला आहे. बागुलांच्या नंतरच्या दलित कथाकारांच्या कथेमध्ये दलितांचे जीवनदर्शन आहे. जीवनदर्शन हे दलित कथेचे बलस्थान होय. या जीवनदर्शनात दलितांचे दारिद्रय, अस्पृश्यतेचे चटके वास्तवपूर्ण आहे. '' दलित जवीनाचे अन्य समाजसापेक्ष महत्वाचा आहे.'' असे प्रा. कवठेकरांना वाटते. दलित समाजातील अंतर्विरोधाचे दर्शन दलित कथेत आहे. '' दलित कुटूंबजीवन, त्यातील विविध ताण, जुनी पिढी व नीवन पिढी यांच्यातील संघर्ष, सुशिक्षित दलित तरूणांचे स्वकीयांपासून तुटत जाणे हे सारे कथा समजदारीने साकार करू पाहत आहे.''

नव्या दलित कथेबद्दल प्रा. कवठेकरांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. कथेच्या विवध अंगांबद्दल दलित कथेन नाविन्यपूर्ण वैशिष्टपूर्ण विश्लेषण केले आहे. दलितांच्या मानसिक आंदोलनाचे हळूवार चित्रण दलित कथेमध्ये आहे.

दलित कथाकारंची सामलिक बांधिलकी दलित कवीप्रमाणे दलित कथकारही सामालिजक बांधिलकी मानणारे आहेत दलत कथाकारांनी समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या  विषमतेची चित्रे रेखाटली आहेत. स्वममाजांतर्गत विषमतेची जाणीवही त्यांच्या कथेत आढळते  दलित सामाजिक बांधिलकीमुळे  त्यांच्यात आत्मविश्लेषक त्यांच्यात आत्मविश्लेषक सामाजिक भान असल्याचे दिसुन येते. दलित चळवळीची स्पंदने दलित कथेत आढळतात सामाजिक बांधिलकीमुळे दलित कथा

वास्तवाच्या पातळीवर यशस्वी झाली आहे. काही कथांत छुपा बोधवाद, स्वप्नाळु आदर्शवाद, ढोबळ समाजदर्शन इत्यादी दोष आढळतात. परंतु दलित कथेचे महत्व या दोषांमुळे कमी होते असे नाही. दलित कथा दलित संवेदनेच्याा वाटचालीशी समांतर राहण्याचा प्रयत्य आहे. तो योग्य आह असे प्रा. कवठेकरांना वाटते.

प्रमुख दलित कथाकारांच्या कथालेखनाचा विचार पाहु या.

## बाबुराव बागुल

दलित कथाकारंमध्ये बाबुराव बागुल यांचे नाव मोठे आहे. त्यांच्या कथेने एंकदर मराठी कथेलाच दलित आत्मभानांची देणगी दिली आहे. जेव्हा मी जात चोरली होती  मरण स्वस्त होत आहे हे बागुलांचे दोन कथासंग्रह प्रसिध्द आहेत. सुड ही दीर्घकथा आहे. बागुलांच्या हया तिन्ही कथासंग्रहांनी इतिहासात अपुर्व अशी गुणात्मक उंची बाबुरावांच्या कथेमुळे दलित साहित्याला प्राप्त झाली आहे. मराठी साहित्याच्या वाटचालीतील एक श्रेष्ठ मानदंड असे बागुलांच्या कथेचे सार्थपणे वर्णन करता येईल

**बागुलांच्या कर्थेचे सामर्थ्य** – बाबुराव बागुलांच्या कथेचे सामर्थ्य हे त्यांच्या कथेच्या कथानकामध्ये आहे. त्यांच्याक कथांतुन प्रकट होणारे उग्र दाहक, भव्य, भयानक, रम्य, किळसवाणे आणि उत्तुंग अनुभवविश्व याचं चित्रण झाले आहे. पारंपारिक कथेतल्या अनुभवविश्वाच्या अंतिम सीमारेषे पासुन बागुलांचे अनुभव विश्व सुरू होते. बागुलांचे अनुभवविश्व हेच त्यांच्या कथेचे सामर्थ्य आहे.

**बागुलांच्या कथेतील जग–** बागुलांच्या कथेतील जग अतिशय भीषण आणि भकास आहहे दारिद्रयाच्या भयाण चटक्यांनी भाजुन निघालेले जग त्यांच्या कथेमध्ये आहे त्यांच्या कथेत भुकेची समस्या चित्रित केली आहे. चरित्र्य आणि पवित्र्य याचा काही एक गंध या जगाला नाही. स्त्री–पुरूष भावनात्मक पातळीवरचे पातळीवरचे दर्शन नाही. नर मादी हेच त्यांचे नाते आहे. वेश्याव्यवसाय गुन्हेगारी, खुन, हाणामाऱ्या, जाळपोळ, लुटालुट या या जगातल्या नित्याच्या बाबी असुन मरण स्वस्त होत आहे पोटाची व शरीराची भुक या अर्थाने स्वार्थ हा या जगाचा स्थायीभाव आहे रोगराई, केरकचरा यात वावरणारे हे जग आहे. प्रा. कवठेकर लिहितात, पशुपातळीवर जगत्या जाणाऱ्या या  जीवनातही कचित कोमल भावना असल्या तरी इतरांना चिरडुन टाकण्यात उध्वस्त करण्यात त्यांना काहीच गैर वाटत नाही. अंगावर शहारे आणणारे, जीव गुदमरून टाकणारे, हे अनुभवविश्व बागुलांच्या कथेचे मुख्य सामर्थ्य आहे. बाबुराव बागुलांनी वर्णिलेले हे अनोखे जग पाहुन वाचक हादरून जातो.

**बागुलांच्या कथेतील व्यक्तिजीवन –** बागुलांच्या कथेतील जग आणि त्या जगातील जगायसाठी जगणारे लोक आहेत. त्यांचे जीवन बागुलांनी  अतिशय वाास्तवतेने रेखाटलेले या जगातील लोक संस्कृतीपासुन दुर गेलेले आहेत. बेदरकार तशीच दुबळी, लाचार, अगतिक, केविलवाणी  माणसेही बागुलांच्या कथेत येतात. या व्यक्ती जीवनामुळेच बागुलांच्या कथेला धडक मारणारे सामर्थ्य प्राप्त झाले आहे भांडवल मधील नटाबाई पांगळा होऊन पडलेला बाप मवाली मधील  कोलंबस आणि त्याचे साथीदार तहान मधील चिंध्या धोंडीबुवा पुंजा महाराज ही मानवी प्रकृतीच्या पातळीवर जगणारी माण्से व ती बागुलांनी चितारली आहेत.

# लोकसाहित्याचे संकलन व संशोधन.

स्नेहा ठाकरे
एम. ए. २

भारतामध्ये लोकसाहित्याची परंपरा फार प्राचीन आहे. फार प्राचीन काळापासून भारतात समाजामध्ये प्रचलित असलेल्या गीतांचे आणि कथांचे संकलन करून त्यांना ग्रंथनिविष्ट करण्याचे प्रयत्न झाले आहेत. म्हणूनच लोकसाहित्याच्या अभ्यासात ग्रंथनिविष्ट कथासाहित्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. वेद–कालापासूनच संकलनाचे हे प्रयत्न झालेले आहेत. त्यामुळे लोकगीतांची बीजे प्राचीन आणि भारतात पवित्र समजल्या जाणा–या ऋग्वेदात सापडतात. ऋग्वेदात 'गाथा' हा शब्द अनेक मंत्रांत आढळतो. गाणारा या अर्थाने 'गाथिन्' शब्दाचा प्रयोग केला आहे असे दिसते. त्यानंतर ब्राम्हण ग्रंथांत अनेक उल्लेख येतात. कथांची आणि कथागीतांची भारतातील परंपरा यासंबंधी आपण पुढील एका प्रकरणात विस्ताराने चर्चा करू. येथे केवळ एवढेच पाहावयाचे आहे की, फार प्राचीन काळापासून भारतीयांनी समाजात रूढ असलेली गीते, कथा, यांना अभिजात चिरंतन वाङ्.मयाचे स्वरूप देऊन ग्रंथबध्द करून ठेवले आहे. एवढेच नाही तर भारतामध्ये निर्माण झालेल्या संस्कृत ललित वाङ्.मयाच्या निर्मात्यांनी यांपासून ग्रंथनिर्मितीच्या प्रेरणा घेतल्या आहेत. अनेक ग्रंथकारांनी परंपरेने चालत आलेल्या व ग्रंथनिविष्ट झालेल्या लोकसाहित्यातून कथाबीजे घेऊन ग्रंथनिर्मिती केली आहे. मौखिक परंपरेने समाजजीवनात चालत आलेले हे लोकसाहित्य स्वाभाविकपणेच त्यांच्या बोलभाषेत–लोकभाषेत–असणार. मात्र ते संस्कृत भाषेच्या रूपाने अभिजात वाङ्.मयात आले. पुढे हेच साहित्य लोकभाषेत रचना करणा–या कवींनी आदर्श मानले आणि ग्रंथरचना केली. पारंपारिक कथासाहित्य अभिजात ग्रांथिक भाषेत आणण्याची ही परंपरा भारतामध्ये कित्येक शतके चालू होती. त्यामुळेच शब्द लोकसाहिल्याच्या भारतीय परंपरेचा मागोवा घेण्यासाठी वेदकालापासूनच्या भारतातील अनेक ग्रंथांचा मागोवा घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे १८८५ मध्ये 'The Song of Alha's marriage' या नावाचा लेख 'Indian Antiquary'च्या पत्रिकेत लिहिला. 'Two versions of the song of Gopichand'हे संकलन प्रसिध्द केले या लेखात एकाच कथेने भोजपुरी आणि मगधी असे दोन पर्याय दिले आहेत १८८६ साली जर्मनी मधील एका प्रसिध्द पत्रिकेत एक भोजपुरी लोककथागीत (Ballad) प्रसिध्द केले, लोकगीतांचा मूळ पाठ देऊन त्याचा अनुवाद केल्यामूळे गीतांचा भाषाशास्त्रीय अंगाने अभ्यास करणे शक्य झाले. ग्रियर्सन यांनी लोकगीतांच्या शेवटी भाषा शास्त्रीय टीपा दिल्यामुळे हे सगळेच संकलन मोलाचे झाले आहे. पुढील काही प्रकरणांवरून याचा प्रत्यय येईलच भारतामध्ये पारंपरिक शब्द लोकसाहित्याच्या किंवा लोकवाङ्.मयाच्या संकलनाची आणि संस्करणाची परंपरा प्राचीन असली तरी हे संग्रह लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी करण्यात आले नव्हते. संकलनाची भूमिका अभ्यासकांची नव्हती. अभ्यासकांच्या भूमिकेतून लोकसाहित्याच्या संकलनाचे प्रयत्न भारतात गेल्या शतकापासून सुरू झाले.

१९ व्या शतकाच्या प्रारंभी या देशात इंग्रजांचे शासन स्थिर झाल्यानंतर एक नवी प्रशासकीय व्यवस्था निर्माण झाली. अनेक प्रशासक इंग्लंडमधून इकडे आले. या प्रशासकांच्या मनांमध्ये येथील लोक, त्यांचे जीवन, त्यांच्यात प्रचलित असलेल्या रूढी, समजुती इत्यादींसंबंधी कुतूहल निर्माण झाले. या देशात आपल्या साम्राज्याची मुळे खोलवर रुजविण्यासाठी येथील लोकजीवन जाणणे आवश्यक होते. येथील समाजाची सामर्थ्यस्थाने आणि मर्यादा समजून घेणे महत्त्वाचे होते काही इंग्रज अधिकारी संशोधक–वृत्तीचेही होते. या सर्वांचा परिणाम असा झाला की, इंग्रज अधिका–यांनी स्वतंत्रपणे व्यक्तिशः आणि संस्था स्थापन करून लोकसाहित्याच्या संकलनाचे पध्दतशीर प्रयत्न केले. ग्रॅशिटियरच्या निर्मितीमुळेही या कार्याला गती मिळण्यास साहाय्य झाले. भारतीय संस्कृती आणि भारतीय लोकजीवन यांच्या अभ्यासाला इंग्रजांनी या रीतीने प्रारंभ

केला. त्या आधीच अठराव्या शतकाच्या अत्तरार्धात सन १७८४ मध्ये सर विलियम जोन्स यांच्या प्रयत्नाने कलकत्याला 'Asitaic Society of Bengal' या नावाच्या शोधसंस्थेची स्थापना झाली होती. नंतर आलेल्या इंग्रज अधिका—यांनी भारताच्या प्राचीन इतिहासाचा सर्व अंगांनी शोध घेण्यासाठी प्रचंड कार्य केले.

पश्चात्य विव्दानांपैकी ज्यांनी लोकसाहित्याचे संकलन करण्याचा प्रयत्न केला त्यांचे दोन वर्ग करता येतील. पहिला इंग्रज प्रशासकांचा वर्ग आणि दुसरा खिस्ती मिशन—यांचा वर्ग. या दोन्ही वर्गातील काही संशोधकांचा हेतू ज्ञानप्राप्ती, जिज्ञासातृप्ती आणि अभ्यास असे असले तरी सगळेच या हेतूंनी प्रेरित झाले होते असे नाही. कांही प्रशासकीय आणि धर्मप्रचाराच्या हेतूनीही कार्य करीत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारतामध्ये ज्या पाश्चात्य विव्दानांनी लोकसाहित्याच्या क्षेत्रात महत्वपूर्ण कार्याचा प्रारंभ केला त्यांत कर्नल जेम्स टॉड हे प्रमुख आहेत. कर्नल टॉड यांनी राजस्थानामधील अनेक राज्यांमध्ये रेसिडेंट म्हणून काम केले. रेसिडेंट म्हणून काम करीत असतानाच त्यांनी तेथील इतिहास, रूढी, परंपरा, वेषभूशा इत्यादींचे अध्ययन केले. या क्षेत्रात त्यांनी अनेक वर्षे परिश्रम केले. १८२९ मध्ये 'Annals and Antiquities of Rajasthan'या नावाचा ग्रंथ प्रसिध्द केला. या ग्रंथात त्यांनी निरनिराळ्या राज्यांचा इतिहास प्रथमच संकलित केला. त्याच वेळी तेथील समाजस्थितीवरही प्रकाश टाकला. त्यांनी राज्यस्थानमध्ये प्रचलित असलेल्या कथांचा आणि गीतांचा संग्रह केला नसला तरी ग्रंथलेखनात प्रचलित कथागीतांचा आणि पोवाड्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेतला आहे. १८५४ साली जे. एबट यांनी पंजाबी लोकगीतांवर एक लेख लिहून प्रसिध्द केला. रेव्हरंड हिस्लॉप या खिस्ती मिशन—याने मध्यप्रदेशातील वन्य जमातींचा अभ्यास करून लेख लिहिले. हे लेख सर रिचर्ड टेंपल यांनी संपादित करून १८६६ मध्ये प्रसिध्द केले. मिस मेरी फियर नावाच्या इंग्रज महिलेने दक्षिण भारतातील लोककथांचे संकलन करून 'Old Deccan Days'नावाचा लोककथांचा संग्रह १८५८ साली प्रसिध्द केला. भारतातील लोकगीतांच्या संग्रहाचा आधुनिक काळातील पहिला प्रयत्न चार्ल्स ई. गोवर यांनी केला. या अभ्यासकाने कानडी, तामिळ, मल्याळी, तेलगू या भाषांतील गीतांचा इंग्रजी अनुवाद करून १८७१ मध्ये 'Folk songs of Southern India' या ग्रंथात प्रसिध्द केला. १८७२ मध्ये डाल्टन यांनी 'Discriptive ethnology of Bengal' हा ग्रंथ प्रसिध्द केला, त्यात त्यांनी बंगालमधील निरनिराळ्या जमातींसंबंधी मोलाची माहिती संकलित केली. याच वर्षी आर. सी. कॉलवेल यांनी 'Tamil Popular Poetry'या नावाचा लेख प्रसिध्द करून तामिळ भाषेतील लोकगीतांचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. राजमहलमध्ये राहणा—या वन्य जमातींच्या लोकगीतासंबंधी एफ्. टी. कोल यांनी लेख लिहून तो १९७६ साली प्रसिध्द केला.

याच काळात बंगालमध्ये अनेक पाश्चातय आणि भारतीय संशांधक 'Indian Antiquary' या नियतकालिकात सातत्याने लेखन करीत होते. यांत जी. एच्. डेमेंट, प्रसिध्द कवियित्री तोरू दत्त लालविहारी डे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. डेमेंट यांनी 'Bengali Folklore From Dianjpur' यां ग्रंथात बंगाली लोक कथांचा संग्रह प्रसिध्द केला. १८७९ पर्यंत डेमेंट अव्याहतपणे लोकसाहित्यविषयक शोधनिबंध लिहून प्रसिध्द करीत होते. तोरू दत्त यांनी १८८२ साली 'Ancient Ballads and Legends of Hindusthan' हा लोककथागीतांचा संग्रह प्रकाशात आणला. बंगाली लोककथांचा सुंदर संग्रह १८८३ मध्ये 'Folklore of Bengal' या नावाने लालबिहारी डे यांनी प्रकाशित केला. इंग्रजी अनुवादामुळे मूळ बंगालीतील रोचकता कमी झाली असली तरी त्यांचे हे कार्य संकलनाच्या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कार्य ठरते. त्यांनी 'Bengal Peasant Life'हे दुसरे पुस्तक लिहिले ज्यात बंगालमधील ग्रामीण जीवनाचे सुंदर चित्र रेखाटले आहे.

पंजाबमधील लोककथागीतांचा संग्रह 'Legends of the Punjab' १८८४ मध्ये रिचर्ड टेंपले यांनी प्रसिध्द केला. पंजाबमधील लोककथागीतांच्या संग्रहाचा हा पहिला प्रयत्न आहे. पुढच्याच वर्षी म्हणजे १८८५ साली श्रीमती स्टील यांनी टेंपल यांच्या साह्याने 'Wild Awake Srories'हे लोककथांचे पुस्तक प्रसिध्द केले. या ग्रंथात उभयतांनी लोककथांच्या अभ्यासाची दिशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. श्री नटेश शास्त्री यांनी 'Folklore in Southern India'हा ग्रंथ प्रसिध्द केला. 'Tales and Poems of South India' या ग्रंथात ई. जे. रॉबिन्स यांनी दक्षिण भारतातील लोकगीते आणि लोककथा यांचे संकलन केले.

प्रसिध्द भाषाशास्त्रज्ञ सर जॉर्ज ग्रियर्सन यांनी भारतातील भाषांचा अभ्यास करतानाच लोकसाहित्याच्या क्षेत्रातही मोलाचे लेखन केले. 'linguistic Survey of India' या त्यांच्या भाषाशास्त्रावरील बहत्ग्रंथाबरोबरच 'Some Bihari Folk songs'या नावाचा संग्रहही प्रसिध्द आहे. १८८४ साली प्रसिध्द झालेल्या या लेखानंतर दोनच वर्षांनी म्हणजे १८८६ साली त्यांनी 'Some Bhojpuri Folk songs' या लेखात भोजपुरीतील बिरह, जंतसर, सोहर इत्यादी गीतांचे संकलन केले. यात त्यांनी मूळ गीते देऊन त्यांचा इंग्रजी अनुवाद केला आहे आणि शेवटी भाषाशास्त्रीय टीपा दिल्या आहेत. भोजपुरी लोकगीतांच्या संकलनाचा हा पहिला प्रयत्न आहे असे म्हणता येईल. या काळातच ग्रियर्सन यांनी बंगालमधील 'Asiatic society' च्या पत्रिकेत 'विजयमल' ची लोकगीतकथा प्रसिध्द केली.

# लोकसाहित्याचे स्वरूप

आम्रपाली घरडे

एम. ए. २

'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह' आणि 'लोकसाहित्याचे स्वरुप', 'गावगाड्याबाहेर', 'लोकरंगभूमी' या माझ्या लोकसाहित्यावरील ग्रंथांचे महाराष्ट्रातील अभ्यासकांनी चांगले स्वागत केले. त्यात 'लोकसाहित्याचे स्वरुप' या ग्रंथाची पहिली आवृत्ती अल्पावधीतच संपली. गेल्या काही वर्षांपासून या पुस्तकाची मागणी खूप होती. महाराष्ट्रातील त्याचप्रमाणे इतर प्रांतांतील विद्यापीठांनी 'लोकसाहित्य' या विषयासाठी संदर्भ–ग्रंथ म्हणून या ग्रंथाला मान्यता दिली. त्यामुळे मागणीची तीव्रता आणखी वाढली. त्यामुळे काही वर्षातच चार आवृत्त्या प्रकाशित झाल्या व संपल्या.

'लोकसाहित्य' या विषयाला आता महाराष्ट्रात खूपच महत्त्व प्राप्त होऊ लागले आहे. जवळजवळ सर्व विद्यापीठांनी पदव्युत्तर अभ्यासक्रमांत या विषयाला स्थान दिले आहे. प्रतिवर्षी अनेक संशोधक याशी संबंधित विषयांवरशोध–प्रबंध सादर करीत आहेत.

मराठीत 'लोकसाहित्य' ही संज्ञा Folkloreसाठी तर 'लोकवाड्.मय' ही संज्ञा Folk-Literature साठी वापरण्यात येते. परंपरेने या संज्ञा आता रुढझाल्या आहेत. या ग्रंथात प्रारंभी या संज्ञांचे अर्थ देऊन यासंबंधीची अनेक मते दिली आहेत. लोकसाहित्य समाजजीवनात का प्रचलित राहते, म्हणजेच समाजजीवनातील त्याची अर्थपूर्णता स्पष्ट करुन अभ्यासपध्दती, त्याचप्रमाणे अलीकडच्या काळात कोणत्या पध्दतींनी अभ्यास केला जातो यासंबंधीचा ऊहापोह करुन त्याचे पध्दतशीरपणे संकलन कसे करावे याविषयी विवेचन केले आहे. लोकवाड्.मयाच्या प्रकारांची प्रमुख लक्षणे सांगून शेवटी परंपरेने चालत आलेले मौखिक वाड्.मय आणि व्यक्तिनिर्मित ललित वाड्. मयातील साम्यभेदांची चर्चा करण्यात आली आहे. दोहोंच्या परस्परसंबंधांनाही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्तिनिर्मित ललित वाड्.मयात लोकतत्व अनिवार्यपणे येत असल्यामुळे वाड्. मयकृतीचा लोकतत्वीय अभ्यास करण्याची गरज प्रतिपादन केली आहे. लोकसाहित्यशास्त्राचा

परिचय करवून देताना पाश्चात्य तसेच भारतीय ग्रंथकारांच्या ग्रंथांचे साहाय्य घेतले आहे. या ग्रंथकारांच्या मतांचा मागोवा घेत—घेत लोकसाहित्यविषयक विविध प्रश्नांची चर्चा केली आहे.

या ग्रंथात सर्व लोकसाहित्यप्रकारांसंबंधीचे विवेचन करता आलेले नाही. एका ग्रंथात विविध माध्यमांतील परंपरेने चालत आलेल्या लोकाविष्कारांची ओळख करून देणे शक्य नाही. तशी माझी क्षमताही नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. लोकवाड्.मयप्रकारांची विपुल उदाहरणे देऊन स्वरूपविश्लेषण करणे आवश्यक असूनही विस्तारभयास्तव ते केलेले नाही. यापुढे यथाशक्ति लोकसाहित्यप्रकारांचे स्वरूपविश्लेषण अभ्यासकांसमोर सादर करण्याचा संकल्प आहे.

हा ग्रंथ लिहिताना डॉ. रा. चिं. ढेरे, प्रा. द. ग. गोडसे यांच्याशी वेळोवेळी झालेल्या चर्चांचा लाभ झाल्याचा त्याचप्रमाणे डॉ. चंद्रशेखर जहागीरदार, प्रा. रवींद्र किंबहुने यांच्या झालेल्या साहाय्याचा उल्लेख पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत केला होता. या सुहृदांचा हा लोभ कायम आहेच, किंबहुना वृध्दिंगत झाला आहे, होत आहे. त्यांचे औपचारिकपणे आभार मानणे त्यांना रुचणार नाही.

प्रस्तुत ग्रंथ लोकसाहित्याच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरत असल्यामुळेच चार आवृत्त्या प्रकाशित कराव्या लागल्या. आता ही पाचवी आवृत्ती प्रकाशित होत आहे.

**लोकसाहित्याचे स्वरुप :**

मराठीत 'लोकसाहित्य' या शब्द Folklore या इंग्रजी शब्दासाठी वापरला जातो. महाराष्ट्रात लोकसाहित्याचे संकलन आणि त्यासंबंधी लेखन १८५८ पासून सुरू झाले असले तरी निरनिराळ्या लोकसाहित्यप्रकारांना पारिभाषिक संज्ञा या १९१५ पासून वापरण्यात येऊ लागल्या. १९१६ पासूनच लोकसाहित्याच्या प्राणप्रतिष्ठेला प्रारंभ झाला. लोकसाहित्याच्या प्राणप्रतिष्ठेचे कार्य कै. वि. का. राजवाडे यांनी केले. 'लोकसाहित्याच्या कक्षा, आधार आणि महत्त्व लोकांच्या मनावर बिंबविण्याचे काम राजवाड्यांचे' १९२० साली कै. राजवाडे यांनी 'लोकगीत' हा पारिभाषिक शब्द वापरला आणि 'सज्जनगडावरचे एक लोकगीत' या लेखात लोकगीतांची लक्षणे विषद करण्याचा प्रयत्न केला. 'लोककथा' हा पारिभाषिकशब्दही राजवाडे यांनीच प्रथम वापरला. १९२५ साली त्यांनी 'सूर्यनारायणाची कहाणी व सूर्यव्रत' या लेखात 'लोककथा' हा शब्द वापरून 'कहाणी हे लोककथांचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे' असे म्हटले आहे. 'लोकगीत' आणि 'लोककथा' हे शब्द १९२८ पर्यंत रूढझाले नव्हते. ना.गो. चापेकर हे त्यावेळी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'चे संपादक होते. त्यांनी पत्रिकेत लोकगीत आणि लोककथा प्रसिध्द केल्या आणि हे शब्द रूढ करण्याचे श्रेय मिळविले. १९३० साली शं. गो. दाते यांचे 'लोककथा' हे पुस्तक प्रसिध्द झाले. या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत म. म. दत्तो वामन पोतदार यांनी इंग्रजीतील Folklore चे भाषांतर म्हणून 'लोकविद्या' हा शब्द वापरला. पुढे यासाठी 'लोकवाड्.मय' हा शब्द वापरण्यात येऊ लागला. 'लोकविद्या' हा शब्द रूढ होऊ शकला नाही. नंतरच्या काळात 'लोकसाहित्य' हा शब्द वापरण्याचा परिपाठ सुरू झाला. Folkloreसाठी 'लोकवाड्.मय' आणि 'लोकसाहित्य' हे दोन्हीही शब्द वापरण्यात येऊ लागले. दुर्गा भागवत यांनी त्यांच्या 'लोकसाहित्याची रूपरेखा' या ग्रंथात Folkloreसाठी 'लोकसाहित्य' हा पारिभाषिकशब्द सुचविला आहे. त्यासंबंधी त्या लिहितात —'प्रा. द. वा. पोतदारांनी 'लोकविद्या' असा शब्द सुचविला होता, पण तो रूळला नाही. शिवाय 'साहित्यात' वाड्.मय, ज्ञान व विधी यांची विविध अंगे प्रतीत होतात व 'विद्या' या शब्दापेक्षा 'साहित्य' या शब्दाची व्याप्ती जास्त असल्यामुळे हा रूढशब्द मी निवडला.

Folklore **साठी 'लोकसाहित्य' हा पारिभाषिकशब्द :**

Folklore साठी द. वा. पोतदार यांनी 'लोकविद्या' हा पारिभाषिकशब्द सुचविला असला व तो सकत्दर्शनी योग्य वाटत असला तरी तो रूढ मात्र होऊ शकला नाही. नंतरच्या अभ्यासकांनी तो वापरला नाही. Folklore साठी 'लोकविद्या' हा शब्द जेव्हा सुचविण्यात आला,

त्याच काळात Folksong साठी 'लोकगीत' आणि Folktale साठी 'लोककथा' हे पारिभाषिकशब्द सुचविण्यात आले. त्यांपैकी 'लोकगीत' व 'लोककथा' हे शब्द रूढझाले. मात्र 'लोकविद्या' हा शब्द रूढझाला नाही. 'विद्या' या शब्दाचा महाराष्ट्र शब्दकोशात १—ज्ञान, विव्दत्ता, २—ब्रम्हज्ञान, ब्रम्हात्मैक्यज्ञान, ३—उपासनामार्ग, ज्ञानप्राप्तीचे साधन, ४—कला, असे अर्थ दिले असून चौदा विद्या, त्यांत ऋतू, युजसू, सामक, अथर्व हे चार वेद व शिक्षा, छंद, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष, कला ही सहा वेदांगे व न्याय, मीमांसा, पुराणे, धर्मशास्त्र यांचा समावेश होतो, असे दिले आहे. विद्या हा शब्द संस्कृत विद् म्हणजे जाणणे यापासून तयार झाला असून ज्ञान याअर्थाने रूढ आहे. पोतदानांनी Lore साठी 'विद्या' हा शब्द वापरला. चिं. ग. कर्वे यांनी 'लोकविद्या' हाच शब्दFolklore साठी रूढ करावा असा आग्रह धरला. आजदेखील डॉ. रा.चिं. ढेरे यांनी 'लोकसंस्कृतीचे उपासक' या ग्रंथात 'लोकविद्या' हा शब्द वापरणे अधिक उपयुक्त ठरेल असे सुचविले आहे. अनसूया लिमये यांनी Folklore साठी कोणता शब्द वापरावा यासंबंधी लिहिताना म्हटले आहे की — 'लोकवाङ्.मयाला' 'लोकवाङ्.मय' म्हणावे, 'लोकसाहित्य' म्हणावे की 'लोकविद्या' अशीही एक चर्चा विव्दानांच्या लेखांमधून आपल्याला आढळून येईल. श्राव्य किंवा बोली स्वरूपात चालत आलेले वाणीचे म्हणून 'लोकवाङ्.मय' हे नाव सार्थ आहेच: परंतु लोकवाङ्.मय ही संज्ञा विषयाची व्याप्ती मर्यादित करते असे दुर्गा भागवत यांचे म्हणणे आहे. 'लोकसाहित्य' या शब्दात लोकवाङ्.मयाप्रमाणेच लोकरूढी, लोकाचार इत्यादींचाही अंतर्भाव होतो. 'लोकविद्या' हेही असेच व्यापक व इंग्रजी Folkloreशब्दाचे भाषांतर आहे. यावरून अनसूया लिमये यांना निश्चितपणे कोणता शब्द वापरणे योग्य वाटते हे कळत नाही. अशीच स्थिती बहुसंख्य मराठी अभ्यासांची झाली आहे असे दिसते. गो. म. कालेलकर यांनी 'लौकिक दंतकथा' हा शब्द सुचविला: परंतु तोही मान्यता पावला नाही. मराठीच्या पारिभाषिक शब्दकोषामध्ये 'जनश्रुती' असा शब्द उपलब्ध आहे. हा शब्द साक्षेपाने कुणी वापरला आहे असे, दिसत नाही.

Folklore साठी हिंदीमध्ये 'लोकवार्ता' ही पारिभाषिकसंज्ञा रूढझाली आहे. असे असले तरी निरनिराळे पारिभाषिक शब्द श्सुचविण्यात आले आहेत आणि ते विकल्पाने वापरण्यात येतात. पं. रामनरेश त्रिपाठी यांनी Folklor साठी ग्राम शब्द वापरण्यासंबंधी आग्रह धरला होता. Folksong साठी ग्रामगीत शब्द वापरावा असे त्यांनी सुचविले होते. मात्र 'ग्राम' या पदाने 'लोक' या पदातील व्यापक अर्थ सूचित न होता त्यांच्या अर्थाचा संकोच होतो. त्यामुळे पं. रामनरेश त्रिपाठी यांच्या आग्रहाचे वर्णन डॉ. कृष्णदेव उपाध्याय यांनी दुराग्रह असे केले आहे.

डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांनी Folklore या शब्दासाठी 'लोकयान' शब्द वापरावा असे मत मांडले होते. त्यांनी बौध्द संप्रदायातील 'हीनयान', 'महायान', या शब्दांच्या धर्तीवर हा शब्द बनविला: परंतु हीनयान, महायान इत्यादी शब्द धर्माशी संबंधित असल्यामुळे त्याच अर्थाने रूढझाले आहेत. त्यांच्या अनुकरणाने 'लोकयान' तयार केल्यावर लोकधर्माचा बांध होण्यास साहाय्य होणार असले तरी Folklore मध्ये इतरही अनेक बाबी जसे रीतिरिवाज, लोकविश्वास, समजुती, परंपरा इत्यादींचा समावेश असतो: त्यांचा बोध होत नाही. त्यामुळे डॉ. सुनीतिकुमारांनी सुचविलेला शब्द रूढ होऊ शकला नाही. डॉ. भोलानाथ तिवारी यांनी 'लोकयान' या शब्दाऐवजी 'लोकायन' असा शब्द वापरला. हाही शब्द रूढझाला नाही.

डॉ. कृष्णदेव उपाध्यायांनी Folkloreया शब्दासाठी 'लोकसंस्कती' हा शब्द वापरावा असे म्हटले आहे. Folklore मध्ये लोकसंस्कृतीचा आविष्कार होत असला आणि Folklore चा अभ्यास लोकसंस्कृतीच्या अभ्यासाचे साधन असले तरी लोकसंस्कृतीत इतर अनेक बाबींचा समावेश असतो. Folklore साठी लोकसंस्कृती या शब्दाच्या प्रयोगामुळे अतिव्याप्तीचा दोष घडतो.

# मराठी वैचारिक साहित्याची ऐतिहासिक जडणघडण

करिश्मा उमक

एम. ए. १

१८ व्या शतकाच्या अखेरीस आणि १९ व्या शतकाच्या प्रारंभी पाश्चात्यांच्या संपकामुळे भारतीय समाजात प्रबोधनाची प्रक्रिया सुरू झाली. युरोपात प्रबोधनामुळे व धर्मसुधारणेमुळे युरोपीय जग मध्ययुगातून बाहेर पडून आधुनिक युगात प्रवेशले होते. त्यामुळे पाश्चात्य जगात अनेक बदल घडून आले. माणूस हा संपूर्ण जगाचा केंद्रबिंदू बनला. माणूस त्याचे कर्तृत्व, त्याचे व्यक्तिमत्त्व, व्यक्तीचे स्वातंत्र्य, त्याचे हक्क, व्यक्ती–व्यक्ती मधील समानता अशा अनेक गोष्टींचा बुध्दिप्रामाण्यवादी, तर्कशुध्द, विवेकनिष्ठ विचार तयार झाला. त्यातूनच व्यक्तिवाद प्रतिपादला गेला. मानवच्या मूलभूत हक्काचा विचार झाला. समता, विश्वबंधुत्व, स्वातंत्र्य या मूल्यांना एक वेगळा अर्थ प्राप्त झाला. व्यक्तिवादातून स्वातंत्र्यवादी तर समष्टीवादातून समाजवादी विचार पुढे आले. **हॉब्ज व लॉक**च्या सामाजिक कराराच्या सिध्दांतामुळे ''राजा ईश्वराने नव्हे तर आपण निर्मिला'' हा विचार समाजाला एक वेगळे सामर्थ्य देवून गेला. समाजाचे दौबल्य नष्ट झाले. राजाविरूध्द बंड करण्याचा अधिकार समाजाला मिळाला. आपले भवितव्य बदलणे कुणा ईश्वराची करूणा भाकण्याची नव्हे तर आपल्या हाती आहे, जुलमी राजवटींपासून मुक्त होण्यासाठी ईश्वराची करूणा भाकण्याची नव्हे तर राजसत्तेशी संघर्ष करण्याची, ती सत्ता उलथून पाडण्याची गरज आहे हा विचार प्रभावी बनला.

अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांतीत नवे राजकीय विचार प्रतिपादले जावू लागले. राजसत्ता जुलमी का बनते? याचे तर्कनिष्ठ, विवेकनिष्ठ विवेचन **मॉन्टरक्यून** केले व सत्ताविभाजनाचा सिध्दांत मांडला. लोकशाही, समाजवाद, व्यक्तिवाद, स्वातंत्र्य, समता या संकल्पना प्रभावी ठरल्या. परिणामी विद्येचे पुनरूज्जीवन झाले. त्यातून धर्मसुधारणा चळवळ सुरू झाली. भौगोलिक शोध व औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवाद, व्यापारवाद, भांडवलशाही या व्यवस्था निर्माण झाल्या.

पाश्चात्यांचा हा वैचारिक आधुनिक, वैज्ञानिक व राजकीय वारसा घेवून इंग्रज व इतर युरोपीय व्यापारी भारतात आले. इंग्रजी भाषेमुळे पाश्चात्य जगातल्या घडामोडीविषयी भारतीयांना देखील माहिती होवू लागली. हे सर्व १९ व्या शतकाच्या सुरूवातीला घडून आले.

भारतात प्रबोधनाची पहाट सुरू झाली. याच काळात इंग्रजांच्या वाढत्या वर्चस्वाविरूध्द असंतोष भडकत गेला. त्याची परिणती १८५७ चा उठाव व आधुनिक विचारसरणीमुळे भारतीय समाजात प्रबोधनाची प्रक्रिया सुरू झाली. प्रबोधनाचा हा प्रभाव सुरूवातीला अतिशय कमी अशा सुशिक्षितांमध्ये जाणवू लागला. या सुशिक्षितांनी बुध्दिप्रामाण्यवाद भूमिका स्वीकारून आपल्या संस्कृतीचे, परंपरांचे रूढींचे आत्मपरीक्षण सुरू केले. पाश्चात्यांनी मध्ययुगातून आधुनिक युगात प्रवेश केलेला होता. त्यांनी देखील आत्मपरीक्षण केले होते. श्रध्दा बाजूला ठेवून वृथा अभिमान व बाळगता आपल्यातले दोष दूर करण्याचा प्रयत्न केला. धर्मसुधारणा व विद्येच्या पुनरूज्जीवनातून त्यांनी प्रबोधन घडवून आणले. भारतातल्या सुशिक्षित तरूणांचे लक्ष तिकडे गेले. त्यांनी देखील भारतीय परंपरांचे परीक्षण सुरू केले. समाजातील अनेक रूढींमधील निरर्थकता त्यांना जाणवली. त्यांनी आपल्या समाजात सुधारणा आणण्याचा प्रयत्न केला. बाह्य जगाशी संपर्क आल्यामुळे त्यांचे अनुभवक्षेत्र विस्तारले. बाह्य जगातील माणूस इतका प्रगत कसा व आपण इतके मागासलेले कां? असा तर्कशुध्द व बुध्दिनिष्ठ शोध ह्या सुधारकांनी घेतला. त्यातूनच भारतात चळवळ सुरू झाली. राजा राममोहन रॉय यांना भारतीय प्रबोधनाचे जनक मानले जाते. त्याशिवाय केशवचंद्र सेन, देवेन्द्रनाथ टागोर, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, तर्खडकर बंधू, दयानंद सरस्वती, लाला लजपतराय, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, महात्मा ज्योतिबा फुले यासारख्या समाज

सुधारकांमुळे भारतात समाज प्रबोधनाच्या फार मोठया चळवळी सुरू झाल्या. परिणामी भारतात सामाजिक सुधारणेबरोबरच राजकीय जागृती घडून आली व १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला.

**पाश्चात्य राजकीय विचारांचा प्रभाव** —१९ व्या शतकातील भारतीय प्रबोधनाची चळवळ ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज यासारख्या संघटनात्मक संस्थेच्या माध्यमातून जशी गतिमान झाली, तशीच ती साहित्यातून व वृत्तपत्रीय लेखनातूनही प्रभावी ठरली. प्रबोधनाला अधिक गतिमान करणारा आणि भारतीय समाजाला मध्ययुगातून बाहेर आधुनिकतेकडे नेणारा एक घटक म्हणून पाश्चात्य राजकीय विचारांचा विचार करावा लागतो. इंग्रजी शिक्षणामुळे व पाश्चात्य देशातील लिखाणामुळे भारतातील सुशिक्षित समाज आधुनिक विचाराकडे वळू लागला. मध्ययुगातून बाहेर पडून त्यांच्या विचारात प्रबोधन घडून आले. पाश्चात्य जगातली 'राष्ट्र' ही संकल्पना, 'राष्ट्रवाद' हा राजकीय विचार त्यांना प्रभावित करणारा ठरला. इटली, जर्मनीतील राष्ट्रवादी चळवळींचा प्रभाव लक्षणीय ठरला. अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांतीमुळे तसेच त्यापूर्वीच्या मानवतावाद, व्यक्तिवाद या संकल्पनामुळे नवे वैचारिक प्रवाह भारतीयांपर्यत येवून पोहोचले व त्यातून प्रबोधन घडून आले.

**राष्ट्रीयत्वाची जाणीव** —जगभराच्या माणसात मध्ययुगीन कालखंडात राजनिष्ठेची वृत्ती प्रभावी होती. राजांची राज्ये होती. त्या राजाबद्दलची निष्ठा व प्रामाणिकपणा बाळगणे हा सर्वात मोठा सदगुण होता. कारण राजा हा त्या काळात ईश्वराचा प्रतिनिधी मानला जात होता. देवानेच राजाची निर्मिती केली ही संकल्पना अस्तित्वात होती. हॉब्ज, लॉक, रूसो यासारख्या विचारवंतांनी या संकल्पनेला धक्का दिला. राजा समाजाने, सामाजिक करारातून निर्माण झाला हा विचार मांडला. 'समसज' व 'राष्ट्र' या संकल्पना पुढे आल्या. राष्ट्र आकाराला आले. आधुनिक युगात राजनिष्ठेची जागा राष्ट्रनिष्ठेने घेतली. पाश्चात्य वैचारिक परंपरेतून घडून आलेल्या प्रबोधनामुळे आपल्याकडेही राष्ट्र ही संकल्पना आली. आपण सारे भारतीय म्हणजे एक राष्ट्र आहोत ही जाणीव प्रबोधनातून निर्माण झालेली जाणीव होय.

**समजेची व व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना** —भारतीय वैचारिक व आध्यात्मिक परंपरेत 'सर्वांभूति परमेश्वर' पाहण्याची समदृष्टी होती आणि वृक्षवल्ली देखील सोयरे असे असले तरीही मध्ययुगात या गोष्टी फक्त पुस्तकात शिल्लक राहिल्या होत्या. प्रत्यक्ष समाजात उच्च—नीचतेची जाणीव प्रबळ बनलेली होती. जातीव्यवस्थेची उतरंडे अपरिवर्तनीय बनली होती. समाज रूढीप्रिय व परंपराविषयी सनातनी होत. माणसाच कर्तृत्वाचा प्रश्नच नव्हता. देव व दैवत यांचा प्रभाव होता. देवानेच निसर्गात आणि माणसातही भिन्नता निर्माण केली. तिथे समानता कुठेच नव्हती अशी परिस्थिती होती. व्यक्तिगत पातळीवरचा विचारच नव्हाता. परंतु पाश्चात्य जगात समष्टीचा विचार, व्यक्तिवादी विचार च्या 'Individualism'स्वरूपात मांडला गेला होता. ह्यातून व्यक्ती—व्यक्तीमधील समानता, स्त्री—पुरूष समानता, व्यक्तीचे अधिकार, स्वातंत्र्य या कल्पना पुढे आल्या. पाश्चात्यांच्या राजकीय विचारामुळे १९ व्या शतकातला सुशिक्षित भारतीय माणूसही समतेचा स्वातंत्र्यांचा विचार करू लागला. स्वातंत्र्याचा व समतेचा पुरस्कार हा प्रबोधनामुळेच आधिक गतिमान बनला.

**प्रबोधनातील नव्या प्रेरणा** —प्रबोधनपूर्व भारतात सर्व समाजजीवनावर धर्म संकल्पनाचा, रूढी—परंपराचा प्रभाव होता साऱ्या साहित्य निर्मितीतील विषय हे प्रामुख्याने धार्मिक आख्यायिका व धर्मग्रंथातील कथा, पुराणकथा भोवती फिरत राहिती. युरोपात देखील १५व्या शतकातील प्रबोधनकाळात परिस्थिती बदलत गेली. देव, दैव, धार्मिक ग्रंथ, दैवतकथा यातून साहित्य बाहेर पडले. साहित्य नव्हे तर संपूर्ण कलाभिव्यक्ती ही मानवकेंद्रित बनली. मानवाला केंद्रबिंदू मानून सारे चिंतन होवू लागले. मानवांची सुख—दु:खे, त्यांच्यातील समता, त्यांचे स्वातंत्र्य, हालअपेष्टा यांचे चित्रण होवू लागले. माणसाच्या वागण्याचा अर्थ, अन्वयार्थ शोधला जावू लागला. राज जुलमी कां असतो? राजालाचा इतके अनिर्बध कसे मिळतात? यासारख्या प्रश्नांची चर्चा विचारवंत करू

लागले. पाश्चात्यांचया राजकीय विचारातून त्यांची समाधानकारक उत्तरे मिळू लागलीत. थोडक्यात नव्या प्रेरणा प्रबोधनातून मिळू लागल्या.

**साहित्य अभिव्यक्तीचा अविष्कार** –स्वातंत्र्याची प्रेरणा देणारे, समतेचा पुरस्कार करणारे, भारतीय समाजजीवनावर व त्यातील अनिष्ट प्रथांविरूध्द टीका–टीप्पणी करणारे साहित्य निर्माण होवू लागले. आपल्या रूढी, परंपरेचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला. सर्व भाषांमध्ये साहित्यानिर्मिती होवू लागली. छापखान्याचा शोध लागण्यापूर्वी संपूर्ण जगभर ज्ञानप्रसार मर्यादित होता. क्वचितप्रसंगी कुणीतरी ग्रंथ लिहीत असे. लिहिणे–वाचणे दुर्मिळ होते. छापखाना निघाला, मुद्रणयंत्रे आली. परिणामी सारी परिस्थिती बदलली. भारतातली ज्ञानप्रसाराची नवी प्रेरणा १९ व्या शतकातच अधिक प्रभावी ठरली. छापखान्यामुळ विचारांचा प्रसार करणे सोपे झाल.

**आत्मपरीक्षणाची प्रेरणा** – प्रबोधनामुळे आत्मपरीक्षणाची प्रेरणा निर्माण झाली. आपल्यातले दोष हे त्यातूनच तीव्रतेने जाणवले. जातीव्यवस्था, अस्पृश्यता, सतीप्रभा, बालविवाह ह्यासारख्या गोष्टी कालबाह्य आहेत, या टाकून दिल्या पाहिजेत ही जाणीव १८ व्या शतकातील प्रबोधनामुळेच शक्य झाली. ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज या संघटनांनी हे आत्मपरीक्षण केले. सुधारणा करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

**बुध्दिप्रामाण्यवाद** –प्रबोधनामुळे बुध्दिप्रामाण्यवाद व विवेकनिष्ठा ह्यासारख्या प्रेरणा निर्माण झाल्या. युरोपात **रॉजन बेकन**सारख्या राजकीय विचारवंताने बुध्दिप्रामाण्यवादाचे सूत्र सांगितले,

'परंपरा व अधिकारी यांचे शब्द प्रमाण मानण्याची खोड सोडा व जगाकडे उघडया नजनेने पहा. कोणतेही वचन केवळ देव म्हणून मान्य करता येणार नाही. ते तुमच्या बुध्दीला पटले पाहिले.'' १९ व्या शतकात हाच बुध्दिप्रामाण्यवाद भारतातली आला. महात्मा ज्योतिबा फुलेंनी अशाचप्रमारे अनेक गोष्टी केवळ परंपरा सांगते, म्हणून मान्य न करता बुध्दीला पटतील तरच स्वीकारल्या. परंपरा व रूढी झुगारून त्यांनी स्त्री–शूद्रासाठी शिक्षणासाठी दारे खुली केली. **राजा राममोहन रॉय** यांच्यापासून अगदी सावकरांपर्यत साऱ्याच समाज सुधारक विचारवंतानी बुध्दिप्रामाण्याची व विवेकनिष्ठेची कास धरली.

**स्वातंत्र्य व समता** –प्रबोधनामुळे स्वातंत्र्य व समता ह्या प्रेरणा भारतीय विचारविश्वात महत्त्वाच्या ठरल्या. आम्ही सर्वाभूति परमेश्वर पाहत असलो, वृक्षवल्ली आपले सोयरे असले तरीही विचार आणि आचार यात प्रचंड तफावत होती. तशीच तफावत मध्ययुगात युरोपतही होती. पण प्रबोधनानंतर तिकडचा समाज बदलला. भारतात हा बदल १९ व्या शतकात प्रबोधनानंतर निर्माण झाला. समतेच्या, व्यक्तिस्वातत्र्यांचा नवीन अर्थ आम्हाला पहिल्यादांच माहीत झाला. व्यक्तिवाद, समाजवाद, लोकशाही या राजकीय विचाप्रणालीची नव्याने ओळख झाली. सामाजिक समतेचा विचार हा या प्रबोधनाची देणगी मानावी लागेल. स्त्री–पुरूष समतेचा विचारदेखील त्यातूनच झाला.

**शिक्षणाचे महत्त्व कळले** –प्रबोधनामुळे भारतीय माणूस अज्ञानाच्या गाढ निद्रेतून जागा झाला. ही निद्रा अज्ञानाची, रूढीप्रियतेची, परंपरावादाची, ग्रंथप्रामाण्याची व बाबा वाक्यम् प्रमाणम् या वृत्त्तीच्या स्वरूपातली होती. परिणामी सामान्य समाज ह पोथीनिष्ठ होता. मुळात काही अडतच नव्हते. काही अडल्यास धर्ममार्तंडाकडे जायचे. ते धर्मग्रंथाचा आधार देत सांगायचे आणि आम्ही ते मानायचे अशी स्थिती होती. स्वतःच्या बुध्दीला पटण्याचा प्रश्नच नव्हता. कारण बुध्दीचा वापरच होत नव्हता तसेच विवेकाचा व तर्काचा वापरच होत नव्हात. याउलट युरोपात सोळाव्या शतकातच विचारवंत ठणकावून सांगू लागले की, केवळ देव म्हणाला म्हणून नाही तर एखादी गोष्ट स्वीकारता येत नाही तर ती गोष्ट बुध्दीला पटली पाहिजे. परंतु भारतात मात्र अनेक न पटणाऱ्या गोष्टी भारतीय लोक करीतच होते. अगदी १९ व्या शतकापर्यंत समाज परंपरावादी व मतिहीन होता. मती नव्हती म्हणून वित्तही नव्हते. वित्त नव्हते म्हणून गती नव्हती ही बाब १९ व्या शताकातील समाज सुधारकांनी ओळखली. शिक्षणाचे महत्त्व त्यांचा लक्षात आले. स्त्रिया व मुलींसाठी शाळा निघाल्या.

**धोंडो केशव कर्वे, आनंदीबाई जोशी, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले** यांनी स्त्रिया, मुले व अस्पृश्यासाठी शाळा सुरू केल्या. समाजातल्या सर्व स्तरापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. शिक्षणामुळे प्रबोधनाची गती वाढली. पुढे शिक्षणाने बाजारू रूप धारण केले. परंतु १९ व्या शतकात मात्र शिक्षण हेच समाज प्रबोधनाचे सर्वात महत्त्वाचे साधन होते.

**विषमतेविरूध्द जनजागृती —** १९ व्या शतकातील समाज प्रबोधनाचे समतेची जाणीव निर्माण झाली. समाजातील विषमता लक्षात आली. बाह्य जगाने ही विषमता टाकून देण्याचा प्रयत्न केला. त्याची प्रचिती येवू लागली. विषमतेविरूध्द जनजागृती हेवू लागली. ही जनजागृती म्हणजे प्रबोधनाची प्रमुख प्रेरणा ठरली.

थोडक्यात प्रबोधनामुळे तिकडे युरोपिय देश असे मध्ययुगातून आधुनिक युगात आले, तसाच प्रकार भारतात देखील घडून आला. १९ व्या शतकातील प्रबोधनामुळे आमचे अनुभवविश्व विस्तारले. पंचक्रोशीतून भारतीय मनोवृत्ती बाहेर पडली. बाह्य जग किती बदलले हे कळू लागले. बदलाचा अर्थ समजू लागला. आपणही आता रूढी, परंपरा, धर्म, चालीरिती यांच्या बाहेर पडले पाहिजे ही जाण निर्माण झाली. कालबाह्य गोष्टी टाकून देवून नव्या गोष्टींचा स्वीकार केला पाहिजे ही जाणीव निर्माण झाली. मध्ययुगील सनातनी वृत्ती आणि परंपरावादातून भारतीय समाज बाहेर पडू लागला. प्रबोधनाने ही प्रक्रिया सुरू केली. पुढे ती गतिमान झाली नाही, परंतु समाजातील विषमतेविरूध्दची जाणीव मात्र प्रभावी ठरली.

# मराठी निबंधवाङ्मय : स्वरूप

निशिगंधा उमक
एम. ए. १

सरकारी नोकरीवर लाथ मारून चिपळूणकरांनी इ.स. १८७४ मध्ये 'निबंधमाला' सुरू केली. मराठी जनतेची अस्मिता जागृत करून त्यांना स्वदेशभक्तीचे धडे देण्याचे कार्य 'निबंधमालेने' केले. इंग्रजी शिक्षण घेऊन 'इंग्रजांचे सर्वच काही श्रेष्ठ' अशी विचारसरणी असलेल्या नवशिक्षित तरूण पिढीला जोराचा धक्का देण्याचे कार्य चिपळूणकरांनी केले. राजकीय विषयावर लेखन करण्याचे धाडसही त्यांनीच पहिल्यादा केले. बोलके व पोटभरू सुधारक, कुटिल परकीय शासक आणि भारतीय जनतेला येशूच्या कळपात ओढू पाहणारे कुत्सित मिशनरी ही चिपळूणकरांच्या वाङ्मयाची प्रेरणा ठरली. या तिन्हींचा खरपूर समाचार घेण्यासाठी व त्याचे वाभाडे काढण्यासाठी त्यांनी आपली लेखणी झिजवली. त्यांची लेखणी खंडण—मंडण करण्यात सिध्दहस्त होती. परिणामकारक कोटया आणि उपहासप्रचुर भाषा यांच्या सहाय्याने ते प्रतिपक्षावर तुटून पडत. हे करीत असतानाच त्यांनी आपली रसिकता व कलावृत्तीही जोपासली होती. निबंधमालेने खऱ्या अर्थाने मराठीत प्रथमच निबंध, चरित्र व टीका हे वाङ्मय प्रकार रूढ केले. लोकप्रिय केले. त्यांच्या वाङ्मयात उद्‌बोधनाचा भाग फार मोठा असूनही त्यात कलेचा अंशही तितकाच प्रभावी होता. लो. टिळक आणि आकरकर यांच्या मदतीने 'केसरी' व 'मराठा' ही दोन वर्तमानपत्रे सुरू केली. त्यातून चिपळूणकरांनी आपले अनेक विचार मांडले. हिंदु धर्मातील अनिष्ट रूढींनी अन् गुलामी वृत्तीने त्याना अस्वस्थ केले. ही अस्वस्थाताच त्यांच्या लेखनाची प्रमुख बनली व त्यातून तेजस्वी विचारानी युक्त असे लेखन त्यांच्या हातून झाले.

१८७४ मध्ये सुरू केलेली 'निबंधमाला' हे चिपळूणकरांचे स्वतंत्र ग्रंथकर्तृत्व होय. हे नियतकालिक होते. प्रत्येक महिन्याला एक अंक निघत असे. सात वर्षात एकून ८१ प्रसिध्द झाले. यानंतर ज्या हेतूने ही माला चालू केली होती तो हेतू सफल झाल्याचे पाहून त्यांनी ती स्वत:च बंद केली. चिपळूणकरांनी मालेचे संचालन एकाकी, कोणाहीजवट लेखाकरिता व आर्थिक मदतीकरिता याचना न करता, सरकारच्या गैरमर्जीची तमा न बाळगता केल. अशा या 'मालेचे' पुण्यात अन् पुढे

सर्वत्र महाराष्ट्रत जोरदार स्वागत झाले. गतवैभवाचे पोवाडे गाणे, सामाजिक प्रतिक्रियेला वाचा फोडणे, त्याला योग्य अशी गती व दिशा देणे हे मालेचे कार्य यशवी ठरले. चिपळूणकरांच्या बहारदार शैलीने जनमानसामध्ये आदराचे स्थान मिळविले. निबंधमालेबद्दल डॉ. अ.ना.देशपांडे म्हणतात. 'परिरसाच्या स्पर्शाने ज्याप्रमाणे लोखंडाचे रूपांतर होऊ जाते त्याप्रमाणे चिपळूणकरांच्या प्रतिभेच्या स्पर्शाने जड असणारे शब्द त्यांच्या निबंधमालेत सजीव झाले आहेत.' अन् म्हणूनच आधुनिक वाङ्मयामध्ये त्याना असाधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे. 'जनजागृती' हाच खरा निबंधमालेचा उद्देश असल्याने प्रखरतेने जाणवते. याशिवाय मराठी भाषेला प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या हेतूनेही मालाकारांचे कार्य महत्त्वाचे ठरते. या दोन महत्त्वाच्या उद्देशाने प्रेरित होऊन चिपळूणकरांनी १.भाषाविषयक, २.वाङ्मयविषयक, ३.परमतखंडनात्मक, ४.सामाजिक, ५.राजकीय, ६.मानसशास्त्रीय अशा वेगवेगळया विषयांवर परिणामकारक लेखन केले. निबंधमालेचा उद्देश काय होता? हे समजून घेण्यासाठी त्यांचाच एक उतारा पुढे देत आहे. एका निबंधात ते म्हणतात – 'इंग्रज सरकार शहाणे म्हणून पूर्वीचे सर्व प्रकार वेडगळ, इंग्रज लोक विद्वान, शूर, सुशील म्हणून लोक मूर्ख, भित्रे व दु:शील, इंग्रजाची कविता, शास्त्रे, कला वगैरे उत्कृष्ट म्हणून आमची सर्व त्यांच्या उलट.... असे आम्ही कधी कबूल करणार नाही.... इंग्रज जसे देव नव्हेत तसेच आम्हीही पशु किंवा राक्षस नाही. दोघातही गुणदोष आहेतच आहेत आणि त्याविषयी वाटाघाट करण्याचा त्यांना जसा अधिकार आहे तसाच तो आम्हास आहे...' या त्यांच्या बाणेदार, सडेतोड विचारातून निबंधमालेचा हेतू लक्षात येण्यास हरकत नाही. त्यावेळच्या नवशिक्षितानी इंग्रजी भाषेचा.... वाङ्मयाचा अन् त्यांच्या एकूणच वागणुकीचा उदोउदो करण्याचे कार्य हाती घेतले होते. त्यांचा खरपूर समाचार घेण्यासाठी व स्वदेशी विचारांची पेरणी करण्यासाठी आपण लेखन प्रपंच केल्याचे अनेक ठिकाणी चिपळूणकरांनी नमूद केले आहे. एके ठिकाणी ते म्हणतात – 'इंग्रजी ग्रंथकारांच्या पेनातून उतरलेले प्रत्येक वाक्य म्हणजे ब्रम्हवाक्य, त्यात असत्य म्हणून लेशमात्रही असायचे नाही. अशा बाळवट समजुतीचा समाचार घेण्यासाठी व अशा समजुतीत वावरणाऱ्या लोकांना वठणीवर आणण्यासाठी आम्ही हातात कलम घेतले आहे. अन् हाती घेतलेले हे कार्य पूर्ण झाल्यानंतर कलम खाली ठेवले आहे. तत्कालीन आंग्लशिक्षितांच्या न्यूनगंडाचे निराकरण करून 'स्वाभिमानी राष्ट्रवादा' च्या निर्मितीला पोषक होईल अशी मानसिक क्रांती महाराष्ट्रात घडवून आणण्याचे ऐतिहासिक कार्य निबंधमालेने घडवून आणले आहे.'

इ.स. १८७४ साली चिपळूणकरांच्या निबंधमालेस सुरूवात झाली आणि एका नव्या जागृतीचे युग सुरू झाले. मराठी भाषेचे सामर्थ्य वाचकांच्या प्रत्ययास आले. 'वाघिणीच्या दुधावर' पोसलेल्या या मराठी भाषेच्या शिवाजीची लेखणी प्रारंभी जरी, विद्वता आणि कवित्व, संपत्तीचा उपभोग, इतिहास, भाषादूषण, भाषा पध्दती, वाचन, भाषांतर, लोकभ्रम यासारख्या 'निरूपद्रवी' विषयांवर आपला अंमल गाजवीत होती तरी थोडयाच वेळात तिचे सामर्थ्य प्रत्ययास येऊ लागले. इंग्रज सरकार, मिशनरी, तथकथित सुधारक इ. विषयावर ते जेव्हा लिहू लागले तेव्हा मराठी निबंधाचे खरे स्वरूप तर सिध्द झालेच पण सर्वसामान्य जनता जी इंग्रजी राज्याच्या प्रभावामुळे स्तिमित होऊन गेली होती, तिच्या डोळयात चरचरीतपणे अंजन घालून स्वदेशाबद्दलचा तीव्र अभिमान त्यांनी तिच्या ठायी निर्माण केला. मराठी भाषा इंग्रजीला सुध्दा मागे टाकू शकते, राजकर्त्यांना दटावू शकते आणि राज्यकर्ते तिची धास्ती खातात हे त्यांनी सिध्द केले. अव्वल इंग्रजीतील सुशिक्षित वर्गात आढळणाऱ्या विविध दोषांची उदा. स्वच्छंदीपणा, बेजबाबदावृत्ती, स्वार्थांधता, व्यसनीवृत्ती याची तीव्र जाणीव चिपळूणकरांना झालेली होती व त्यांचा मूळ पिंड साहित्यिकाचा म्हणून ही प्रतिक्रिया मार्मिक स्वरूपात प्रकटली. स्वार्थी–जुलमी इंग्रज राज्यकर्ते, गोड बोलणारे धूर्त मिशनरी आणि बोलघेवडे, कृतीशून्य सुधारक हे त्यांच्या हल्ल्याचे मुख्य लक्ष्य बनले. आपल्या लेखणीच्या भात्याला त्वेषाची अन् उपहासाची तीव्र धार देऊन चिपळूणकरांनी प्रतिपक्षाचा

पुरा बीमोड केला. निबंधमालेने एका बाजूला विध्वसंक व दुसऱ्या बाजूला विधायक असे दुहेरी कार्य केले. देशातील स्वार्थांध युग संपविणे आणि देशभक्तीची बीजे पेरणे हे ते दुहेरी कार्य होय.

मराठी वाङ्मयातील निबंध या प्रकाराला रूप अन् प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य चिपळूणकारांनी केले आहे हे त्यांचे वैशिष्टय म्हणून ओळखावे लागेल. मराठी निबंधाला त्यांनी भारदस्तपणाचे रूप दिले. त्यांच्यामुळेच मराठीत निबंधरचनेचे शास्त्र तयार झाले. पुढे निबंधमालेची जी कला निर्माण झाली तीही चिपळूणकरामुळेच. निबंधाचे विषय, रचना, मांडणी, प्रारंभ, विवेचन, अवतरणांचा उपयोग... ऐतिहासिक कथा दंतकथांचा निबंधात वापर.... भाषेचा डौल, प्रखर टीकादृष्टी, निबंधाचा शेवट यासारखी सारी अंगे चिपळूणकरांच्या निबंधापासूनच जोखजी जाऊ लागली. पुढे देशाच्या उध्दारार्थ जी एक थोर कार्यकर्त्यांची पिढी निर्माण झाली त्यांनीही चिपळूणकरांच्या निबंधापासून प्रेरणा घेतली. एकबाजूला सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्य करीत असताना चिपळूणकरांच्या वळणावरचे निबंध लिहून चिपळूणकरांची परंपरा जोपासली. त्यात बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, शि. म. परांजपे, विश्वनाथ राजवाडे, श्री. व्य. केतकर, ह. ना. आपटे, लक्ष्मण पांगारकर, वा. म. जोशी, न.चि. केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, वि. दा. सावरकर.... अशा नामवंताचा समावेश होतो. या सर्वांना प्रेरणा देयाचे कार्य निबंधमालेने एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे केले आहे.

'मी मराठी भाषेचा शिवाजी आहे' या त्यांच्या स्वत:बद्दलच्या उद्गारावरून त्यांचा बाणेदारपणा व भक्कम असा आत्मविश्वास दिसून येतो. शिवाजी महाराजांनी लोकांना जसे जागृत केले तशीच भाषाविषयीची जागृती ते करू पहातात. भाषेचा विकास म्हणजे केवळ भाषेचा विलास नव्हे तर मराठी माणसाचेही तेज वाढले. त्यांनी आपल्या लेखणीस सामाजिक विचारमंथनाचे साधन बनविले. त्यांच्यामुळेच महाराष्ट्रात एक नवीन राष्ट्रवादी संप्रदाय निर्माण झाला अन् त्याचबरोबर वाङ्मयोपासनेच्या व्रताचही आरंभ झाला. चिपळूणकरांचे वाङ्मय म्हणजे जणू देशभक्तीचे अधिष्ठान असलेले वाङ्मयीन आंदोलन आहे. पाश्चात्य सुधारणेच्या नाचऱ्या ढंगामुळे तत्कालीन पिढी स्वाभिमानशून्य बनून स्वधर्म, स्वभाषा व स्वदेश याविषयी तुच्छतेने बोलत असे. पाश्चात्त्यांच्या मानसिक व बौध्दिक गुलाम बनलेल्या या पिढीवर आपल्या लेखणीचे प्रहार करून त्यांना बरेचसे वठणीवर आणले. बोलवेघडया पोकळ गप्पांना पायबंद घातला. यासाठी मोठया हिरीरीने ते प्रतिपक्षावर तुटून पडत. त्यांच्या या युयुत्सु वृत्तीमुळे त्यांचे निबंध अत्यंत परिणामकारक बनले आहेत. चिपळूणकरांचे युक्तीवादाचातुर्य यशस्वी होण्याला त्यांचा खुपरा उपहास पुष्कळ प्रमाणात सहाय्यकारी ठरला. त्यांची लेखणी ही जर तलवार मानली तर तिला जालीम उपहासाचे जलाल पाणी दिलेले होते असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. चिपळूणकरांचा देशाभिमान हा केवळ निबंधमालेच्याच निर्मितीला आधारभूत असलेला मुख्य स्थायीभाव नसून तो त्यांच्या सबंध जीवनाचाच प्रेरक भाग होता. त्यांच्या देशाभिमानाला त्यागाची तशीच मुत्सद्देगिरीचीही जोड होती. निबंधमालेच्या प्रत्येक लेखातून अन् लेखातल्या प्रत्येक वाक्यातून देशप्रेमाचा झरा वाहताना दिसतो. विशाल देशहितदृष्टी हीच त्यांच्या निबंधामागील प्रेरणा होती. थोडक्यात, त्यांच्या निबंधमालेत त्यांची रसिकवृत्ती, त्यांची विद्वता, त्यांचा देशाभिमान, त्यांची बाणेदार प्रवृत्ती त्यांचा अभिमान आणि स्वाभिमान, दूरदृष्टी, समाजाबद्दलची कणव, ढोंगी वृत्तीविषयीची चीड, भाषेबद्दलचे प्रेम, उपक्रमशीलता या अन् अशा अनेक गोष्टीचा सुंदर संगम झाल्याचे दिसून येते. दुदैवाने अशा या प्रतिभावंत सुधारकाला अवघ्या ३२ वर्षाचे मोजके आयुष्य मिळाले. पण मिळालेल्या या अल्प आयुष्यात त्यांनी जे मोलाचे कार्य केले त्याचे वर्णन शब्दात करणे खूपच अवघड आहे. निबंधमालेच्या रूपाने त्यानी जी जनजागृतीची मशाल पेटविली ती ठिळक, आगरकरांनी पुढे नेली.... अन् संपूर्ण भारताला अंधाराच्या कोठडीतून मुक्त करण्याचे कार्य झाले.... त्यांचे हे ऋण आपण सर्वांनीच मान्य केले पाहिजे.

# मराठी वैचारिक साहित्याचा उगम : कारणमीमांसा

शीतल वाढवे

एम. ए. भाग १

समाज स्थैर्याच्या दृष्टीने सामाजिक संस्थांचे सातत्य आवश्यक असले तरी या सातत्याच्या फार आहारी गेल्याने कालमानानुसार आवश्यक असणाऱ्या बदलांना विरोध करण्याची सवय जडते. ठराविक चाकोरीतून जाणारा परंपरानुगामी समाज कालांतराने अगतिक होतो. त्याच्या ठिकाणी जडत्व येते आणि खरे पाहता हीच स्थिती पेशवाईअखेर मराठी समाजाची झाली होती. त्याचा प्राचीन काळ उज्ज्वल होता, मूळची आध्यात्मिक तत्वे उच्च व उदात्त होती, संताची शिकवणही उदार व विश्वव्यापक होती, पण त्या परंपरानिष्ठ समाजाचा आचार मात्र स्वार्थबुध्दीला अनुसरून अगदी क्षूद्र पातळीवरून चालला होता. आचारविचारातील या तीव्र विसंगतीचा नि आत्मवंचनेचा घोर परिणाम म्हणजे सामाजिक अध:पात आणि राजकीय पारपंत्र्य.

इ.स. १८१८ च्या आधी संस्थाने मोडकळीस आलेली होती. तशीच स्थिती येथील धार्मिक संस्थाची व संप्रदायांची झालेली होती. राजेमहाराजे जसे सत्ताशून्य बनले होते तसेच धर्मगुरूही प्रभावशून्य झाले होते. किंबहुना ते दोघेही भ्रष्ट व दुराचारी होत चालले होते, दैन्याची व दौर्बल्याची अवकळा राजकारण व धर्मकारण या दोन्ही क्षेत्रांवर पसरलेली होती. एकसूत्रीपणाचा व सहिष्णुपणाचा फार काय चैतन्याचा व जिवंतपणाचा अभाव दोन्ही क्षेत्रांतज जाणवू लागला होता. ‘हे देवाधर्माचे राज्य’ असे म्हणून त्यासाठी फकिरी घेतलेल्या श्री. शिवाजी महाराजांनी पेटविलेले स्वाभिमानाने स्फुल्लिंग विझत जाऊन त्यावर स्वार्थाची व अनाचाराची राख साचत गेली. त्यांनी सजीव राज्य केले व सतेज केलेला धर्मही खांदोकोपऱ्यात पडला किंबहुना सडत चालला. स्वराज्याइतकीच स्वधर्माचीही अधोगती व भ्रष्टस्थिती त्यावेळी परमावधीस जाऊन पोहोचली होती. अशी ही रावबाजी दुसरे बाजीराव पेशवे यांच्या वेळची स्थिती होती. याहीपूर्वीचा थोडा विचार करता दिसून येते की, मुस्लिमांची सत्ता महाराष्ट्रत प्रस्थापित झाल्यावर प्राचीन आचारांचे अवडंबर कमी होऊन नामस्मरणाला महत्त्व येत चालले होते. मूर्तिपूजेची जागा पोथीपूजेने पटकावली. दानधर्माची दिशाही सोयीनुसार बदलली. असले परिणाम  बाह्य स्वरूपात घडले तरी मूळच्या अंतरगात फरक झाला नाही. श्रुति व पुराने यांच्यावरील श्रध्दा काही कमी झाली नाही. तीर्थयात्रादिकांचे महात्म्य पूर्वीसारखेच अबाधित राहिले. बौध्द, जैनादी नवे पंथ निघोत, ख्रिस्ती व इस्लामी सत्तेचा असह्य जुलूम सोसण्याचा प्रसंग येवो, ‘अयोध्या, मथुरा, योकाशी काची अवन्तिका। पुरी द्वारावती चेव सप्तैना मोक्षदायिका।’ ही महाराष्टीयांची परंपराप्राप्त श्रध्दा काही डळमळली नव्हती. याला कारण पाहू जाता,  वैदिक धर्माची व तत्त्वज्ञानाची मूलगामी बीजे इतकी तर्कशुध्द व भक्कम आहेत की त्यांच्यावर चोहोबाजूंनी हल्ले चढविले गेले तरी त्यांचा भंग होत नाही. एकंदर काय की, राजकारण, अर्थकारण यांचा वैदिक धर्माला बराच उपसर्ग पोहोचला तरी या योगाने महाराष्ट्रीय धर्माच्या मूळ  स्वरूपात ओळखता येण्याजोगा तरी बदल झालेला दिसून येत नाही. तात्कालिन वन्यजातींचा विचार करता असे दिसून येते की त्यांची स्थिती अत्यंत दयनीय अशी होती. या जाती कितीही अडाणी असल्या तरी त्या नास्तिक नसून देवदेवता मानणाऱ्या आहेत. सुरापान व मांसाहार त्यांना वर्ज्य नसल्याकारणाने, त्यांच्या देवतांनाही ते पदार्थ वर्ज्य नसून इष्टच आहेत.त्यांच्यात मनुष्याचा बळी देण्याची चाल पूर्वकाळी हाती. त्यांच्यात विवाहासंबधी शिथिलता असून घटस्फोट मान्यता आहे. त्यातही त्यांच्यात काही कडक नियम आहेत. त्यांच्यातले स्त्री पुरूष व्यभिचार हे पातक मानतात. वचनभंगाचे पातक हे आपल्याकडून होऊ देत नाहीत. लग्नसंबंधातील निर्बंधांचा ते भंग करीत नाहीत. काही जातीचा विवाह लावण्यास उपाध्याय चालतो, पण कित्येक जातीत स्त्रियाच उतावळेपणा करतात. बहुतेक सर्व वन्य जाती मूळाच्या आस्तिक, पापभीरू, कर्मफल व पुनर्जन्म मानणाऱ्या होत्या.

१७ व्या शतकात उदय पावून १८ व्या शतकाच्या माध्यापर्यत सर्व हिंदुस्थानचे सार्वभौमत्व आपल्याकडे घेण्याच्या प्रयत्नात बरीच यशस्वी झालेली मराठयांची संस्कृती ब्रिटिश संस्कृतीहून राष्ट्रीयत्व आणि लोकशाही या दोन्ही तत्त्वांच्या दृष्टीने मागे असलेली दिसते. ज्यावेळी मराठी लोक शिवाजीच्या नेतृत्वाखाली हिंदवी राज्याची स्थापना करीत होते, त्याचवेळी ब्रिटीश लोक कॉम्प्रेलच्या नेतृत्वाखाली आपल्या धर्माच्या व देशाच्या राजाला पदच्युत करून लोकशाहीची स्थापना करण्याचा प्रयत्न करीत होते. ज्यावेळी मराठी लोक केवळ परधर्मियांचे राज्य नष्ट करून स्वधर्मीय राजाचे राज्य स्थापन करण्याच्या विचारात व प्रयत्नात गुंतले होते त्याचवेळी ब्रिटिश लोक राजा स्वकीय व स्वधर्मीय असला तरी तो जुलमी असल्यास त्याला काढून दुसऱ्या राजास गादीवर बसवावे आणि त्याने लोकमतानुसार राज्यकारभार चालवावा या तत्वाच्या प्रयत्नात गुंतले होते. पेशवाईचा कालखंड लक्षात घेता पानिपतच्या पूर्वी जे पोवाडे, ज्या शाहिरी वाङ्‌मयाने मराठयांचे शृंगार, वीररसाचे दालत खुलविले होते त्याच वाङ्‌मयाला 'पतित समाजाची ही पहा आवड' म्हणून नावे ठेवायची समाजाने सोय करून दिली. शाहिरी वाङ्‌मयातील पोवाडयांची पैदास कमी होत गेली आणि लावण्या बहरू लागल्यात, त्यांना ऊत येऊ लागला. पोवाडे रचणारे शाहिरी शेला—पागोटयाच्या आशेने थाटाच्या दर्जाला उतरू लागले आणि मोकळया व सुलभ शृंगाराच्या लावणीबाजांनी आपल्या कथनात नागडया इष्कबाजीला जोम आणला.

इ.स. १८१८ साली पेशवाई अस्तंगत पावली. इंग्रजांनी अखंड हिंदुस्थान पादाक्रांत केला. तसे पाहता पेशवाई उदयास येण्यापूर्वी इंग्रजांनी आपले पाय भारतात रोवले होते. सन १७५७ मध्ये प्लसीच्या लढाईतच हे निश्‍चित झाले होते. मात्र त्यावेळी त्यांना कायमचे दृढ होता आले नाही. बाजीराव हा जात्याच सत्ताभित्वाची तसाच भित्रा व कपटीपण होता. तो कमालीचा ढोंगी होता, त्याचे धोरण छाकटे व संधीसाधूपणाचे होते. गादीवर येताच स्वत:ची चैन भागविण्याकरिता त्याने लोकांकडून युक्तायुक्त मार्गानी पैसा उकळण्यास प्रारंभ केला. जनतेवर डोईजन कर लावले. पैशासाठी, स्वत:च्या चैनीसाठी अब्रुदार माणसांचा त्याने छळ सुरू केले. मातब्बर व कर्तबगार लोकांना दुर सारून हुजरे, पानके खुशामते असल्या लोकांना जवळ केले. बहुते साऱ्या मराठे लोकांशीश सरदरांशी त्याचा या ना त्याप्रकारे बेबनाब होत होता आणि ज्या इंग्रज सरकारच्या कृपेने तो पेशवेपद उपभोगीत होता त्यांचा देखील तो असा तसा का होईना पण द्वेष करीत होता. त्यांच्याविरूध्द गुप्त कारस्थाने करण्यास त्याने प्रारंभ केला आणि याचाच परिणाम म्हणजे इ.स. १८१८ साली स्वत:च्या डोळयांनी पेशवाईचा अस्त पाहण्याचे त्याच्या मस्तकी आले. बाजीरावाच्या वाडयात दोन—तीनशे बायका नित्य न्हावयास येत असतं. सकाळी न्हावयाचा समारंभ करावा. तो प्रहर दिवापर्यत चाले. नंतर जेवावयाची तयारी झाल्यावर इच्छेस येईल त्या वाडयात बाजीरावाची स्वारी जात असे. पंक्तिभोजनाच्या समयी सर्व बायका जवळ बसलेलया असावयाच्या. आश्रित लोकंनी चार—पाच, पाच—पाच लग्ने करून घरी एक बायको ठेवावी आणि सरकारवाडयात बाकीच्या बायका पाठवाव्या आणि याचकरिता अन्यप्पा राहातेकर यांनी जास्ती लग्ने केली होती. यावरून आपणास कळून येते की बाजीरावाची वृत्ती किती गलिच्छ आणि लांछनास्पद होती. बाजीरावाचा दरबार म्हणजे शास्त्री, 'पंडित, भटांची कचेरी आणि या भट—पंडितांचे काम काय? तर तोंडभरून बाजीरावाची स्तुती करणे'. 'बाजी हा कृष्णाचा अवतार आहे, कोणी म्हणावे, ' शिवाचाच जणू अवतार प्रकटला आहे' असे गुणगान करण्यामागील हेतू म्हणजे निव्वळ पोट भरणे. आपले पोट भरले की झाले आणि याचाच परिणाम म्हणजे भट—भिक्षुकांचे आशीवार्द असल्या भाकड रीतीरिवाजांना उत येऊ लागला. एकीकडे स्वैराचार, नैतिक मूल्यांची पायमल्ली यांना भरती येत होती तर दुसरीकडे त्याचवेळी जप, अनुष्ठानाचे प्राबल्यही वाढले होते.

ब्रिटिशपूर्वकाळी, ऐहिक वागणुकीकडे प्रजेचे लक्ष जाऊ नये, त्यांनी क्रियाशून्य रहावे, शोषिक बनावे अशी 'अफूची गोळी' समाजात मिळाली होती. पेशवाई अखेर अव्वल इंग्रजीतसुध्दा

त्या गोळीची नशा कमी झाली नाही. 'मादक' धर्माच्या गुंगीखाली सर्व लोंबकळत होते. अशावेळी त्यांना वास्तव दु:खाची, असहाय्यतेची आठवण कशी होणार? 'भविष्य पुराणात जे लिहिले आहे तेच घडून येते. त्यात बदल होत नाही वा करता येत नाही'. परंपरेच्या बंदिस्त चौकटीत सनातन पध्दतीने आयुष्य कंठीत जाणे हीच तत्कालिन समाजाला मिळालेली शिकवण. हीच शिकवण समाजाने मोठया अभिमानोने अंगिकारली आणि स्वत:ला निष्क्रीय करून घेतले. 'नशिबी असेल ते होणारच', 'स्वस्थ रहावे आणि जे जे होईल ते ते पहावे' अशी दुबळी व पौरूषत्वाचा अभाव जाणवणारी जाणीव पत्करून स्वत:ला कर्तृत्वशून्य करून घेतले. प्राप्तस्थिती 'देववादामुळे लाभावी' ही मनोवृत्ती बाळगून प्रयत्नवादाला त्याने दूर ढकलले. परिणामत: मराठे दैववादी राहिले. शब्दप्राधान्याला उराशी कवटाळून विचारप्रधान्याचा त्यांनी धिक्कार केला आणि मोठया कष्टाने उभारलेल्या वैभवाचा डोलारा स्वत:च्याच हातांनी उलथून पाडला. खरे पाहता मराठयांच्या तलवारीला धार होती, तिला पराक्रमाचे पाणी होते, मात्र त्यांच्या मनोवृत्तीला चिकितसकतेचे, सारसार विचारांचे खतपाणी मिळाले नाही. सर्वसाधारण जनतेचे व्यवहार पंचक्रोशीतले होते. चालत आलली पुराणूगामी वहिवाअ कुणीही तोडू वा सोडू शकत नव्हता. समाजाच्या सर्वत्र क्षेत्रांत शिथिलता पसरली होती. ज्ञान मिळवावे, नव्या कल्पनांचा शोध घ्यावा, काहीतरी नवीन प्रयोग करावे ही प्रेरणाच त्यांच्यात नव्हती. सारीच अंगे दुबळी आणि निष्क्रीय बनली असता वैज्ञानिक, शास्त्रीय क्षेत्रात तरी कसली हालचाल होणार? ''निवृत्तीधर्माचे फाजील स्तोम माजल्यामुळे त्यावेळच्या पंडितांनाही लौकिक विषयावर लिहिणे म्हणजे मोलाचे आयुष्य वाया दवडण्यासारखे आहे असे वाटत असे'' आणि म्हणूनच त्यांनी आपल्या सर्वच ग्रंथांचा विषय परमेश्वरप्राप्ती आणि साधुसंतां पुरताच मर्यादित ठेवला आणि भगवंताचा महिमा हाच वाङ्मयाचा मुख्य उद्देश करवून टाकला.

असा हा स्थिर, मागासलेलस, अल्पसंतुष्ट, कर्मठ, रूढीप्रिय समाज की, ज्यांची सारीच जीवनांगे जरठ होऊन बसली होती. मनानमही तो गुलाम झाला होता. आत्मविश्वासाला मुकला होता, मानसिक दास्यात गुरफटला होता. देव, धर्म, जाती, परंपरा, अंधश्रध्दा असल्या जटिल आणि कुटिल अशा जाळयात तो जखडला होता.

## वैचारिक साहित्यानिर्मितीची उद्दिष्टे

शिवानी देऊळकर
एम. ए. भाग १

ब्रिटिशपूर्व भारतीय जीवनात ठळकपणे व सातत्याने जाणवणारी गोष्ट म्हणजे सर्व क्षेत्रांतील स्थितीशीलता. अनेक स्वकीय व परकीय राजवटी येथे आल्या व गेल्या पण जीवनविषयक दृष्टिकोनात पाहिजे तो बदल झाला नव्हात. जीवनातील सर्वच बाबी थंड गोळा होऊन पडलेल्या होत्या. अनेक शास्त्रे, आचार, रूढी, परंपरा इत्यादी सामाजिक व्यवहारांच्या क्षेत्रावर मध्ययुगीन संस्कृतीचेच वर्चस्व राहिले. हिंदी समाज हा अगदी विस्कळीत झाला होता. निरनिराळे सरदार व त्यांच्या वतनवाडया यामुळे समाजाचे असंख्य विभाग पडले होते. त्यांच्या आपापसातील भांडणांमुळे संपूर्ण समाज हादरून निघाला होता. पोकळ बडेजावात गुंग झालेल्या ह्या समाजवर्गाला स्वत:च्या जबाबदारीचे, आपल्या हक्काचे संपूर्णत: विस्मरण झाले होते. आपल्या मार्गाने पिळून काढून स्वत:चे चोचले पुरविणे एवढाच या समाजाचा उद्योग असे.

इंग्रजांच्या विज्ञाननिष्ठ, नागर व उद्योगप्रधान अशा गतिशील, प्रयत्नवादी व व्यापक संस्कृतीचा, भारतीयांची पारमार्थिक, कृंषीप्रधान व ग्रामीण अशा स्थितीशील, दैववादी व संकुचित संस्कृतीशी संघर्ष होताच संस्कृती हीन ठरली, दुबळी पडली आणि अखेर इंग्रजापुढे तिला हार खावी लागली. इंग्रज हे तर व्यापारसाठीच इकडे आलेले होते तेव्हा प्रथमत: त्यांनी बंगालमध्ये आपला व्यापार सुरू केला. इंग्रजांना अवघ्या ५ वर्षात जनता वश झाली होती. हेच 'हिंदू लोकांच्या

मदतीनेच आम्ही हिंदुस्थान मिळविला' असे जे इंग्रजांनी म्हटले ते खरेच आहे. इंग्रजांनी ५ वर्षात बंगाल प्रांत काबीज केला. मात्र महाराष्ट्र पचनी पडायला त्यांना ४० वर्षे लागलीत. महाराष्ट्राने अखेरपावेतो इंग्रजांशी लढा दिला. पण हा एका पायावरील लढा कोठपर्यत टिकणार? मराठयांच्या तरवारीला पाणी होते यात शंका नाही मात्र त्या तरवारीची मूठ झिजली होती, कुजली होती हे विसरून घेता येणार नाही. एकंदर काय की, जीवनातील एक क्षेत्र जरी बळकट असले तरी दुसऱ्या अनेक क्षेत्रांत अंधारच होता. प्रत्येक बाबतीत इंग्रज त्यांना आपल्यापेक्षा श्रेष्ठ वाटू लागले. त्यांची अष्टपैलूता हिंदी लोकांच्या डोळयात भरू लागली. त्यांच्या तेजापुढे त्यांचे डोळे दिपू लागले आणि त्यांनी दाखविलेल्या मार्गाने चालावयास भारतीय जनता तयार झाली. त्याप्रमाणे इंग्रज हे भारताचे राज्यकर्ते ठरले.एखाद्या देशात आपले राजकीय वर्चस्व स्थापित झाल्यावर नेते लोक जित राष्ट्रावर आपली संस्कृती लादीत असतात ही गोष्ट तर इतिहासप्रसिध्दच आहे. अर्थात इंग्रजसुध्दा याला अपवाद नाहीत. भारतावर पाया रोवताच त्यांनी, त्यांच्यातील काही मुत्सद्यांनी पाश्चात्त्य शिक्षणाप्रणालीमध्ये आपली संस्कृती भारतीयांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न सुरू केला. तसेच त्यावेळचे जे मिशनरी लोक होते त्यांनी देखील या कार्याला हातभार लावला. एकंदरीत पाश्चात्त्यांनी आपल्या संस्कृतीचे जाळे आणि ख्रिस्ती धर्माचा प्रसार एकप्रकारे बुध्दिपुरस्पररीत्या सुरू केला. त्यांचा आपल्या चिकाटीवर आणि आपल्या धैर्यावर पूर्ण विश्वास होता. यातच त्यांनी जो उद्योग सुरू केला त्यानंतर हिंदी जनता त्यांना एकप्रकारे पूज्यच मानू लागली. मिशनऱ्यांनी प्रथमतः काही शाळांची स्थापना केली. अडाणी, मूढ अशा हिंदी जनतेला त्यांनी शिक्षण देण्यात सुरूवात केली. इ.स.१८२७ पर्यंत या शाळांची संख्या ८० वर येऊन मुलांची संख्या ३००० च्या घरात गेली. मुलांबरोबर मुली देखील शिक्षण घेऊ लागल्यात. प्रारंभी काही रूढीवाद्यांनी मुलींना शाळेत पाठविण्यास अडथळा आणला होता. मात्र अखेर शिक्षणातील प्रागतिकता त्यांच्या लक्षात येऊन त्यांनी पण आपली बळजोरी कमी केली.

हिंदी समाजातील जीर्ण अशा चालीरितीवर प्रहार करण्यास विद्या हेच शस्त्र अतिशय उपयोगी पडले. इंग्रजांनी कनिष्ठातील कनिष्ठ अशा जातीपर्यंत या शिक्षणाचा प्रसार सुरू केला. आपली सामाजिक दु:स्थिती, त्यातील दोष आणि त्यामुळे हाते असलेली अवनती या साऱ्यांचे दृश्य स्वरूप लक्षात घेऊन आणि आपल्याला प्रगत जर व्हावयाचे असेल, इतर राष्ट्रांच्या स्पर्धेत टिकावयाचे असेल तर या दोषांचे निर्दालनच करावयास हवे अशी नव्या शिक्षितांची खात्री होऊ लागली. दिवसेंदिवस हा प्रभाव वाढत गेला आणि त्यातूनच नवीन उदयोन्मुख अशी तरूण शिक्षित पिढी जन्माला आली. मुद्रणकलेच्याद्वारे त्यांनी या समाजातील ज्या हिंडीस चालीरीती होत्या उदा. बालविवाह, जातीभेद, स्त्री शिक्षणाचा अभाव, विधवांची दु:स्थिती इत्यादी विषयांवर लहान—लहान पुस्तके त्यांनी छापील आणि सामान्यातील सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याची सोय केली.

पाश्चात्य शिक्षणप्रणाली ही एकप्रकारे भारतीयांना उपकारच ठरली. अनेक वाङ्मय, साहित्य निर्माण होऊ लागले. शब्दाप्रामाण्यावर जगणारा समाज सत्य डोळयासमोर अनुभवू लागला. शास्त्र—पुराणादी नियमांना कवटाळून जगणारा दैववादी समाज कालांतराने प्रयत्नवादी होऊ लागला. त्यांच्या विचाराला गती प्राप्त झाली. पुराणिकतेचा पगडा त्याला भेडसावू लागला. त्यातील वैगुण्ये त्याला दिसू लागली आणि तो एका नव्या परिवर्तनाची दिशा पाहू लागला. हिंदु समाजात त्या अनिष्ट चालीरीती दृढ होऊन बसल्या होत्या त्यातील अवगुण लक्षात घेऊन इंग्रजांनी त्या सर्वांचे निर्मूलन करण्याचा सपाटा सुरू केला. इ. स. १८२९ मध्ये अत्यंत पाशवी आणि निर्दय अशी सतीची चाल त्यांनी बंद केली. १८३२ मध्ये जो धर्मांतर करील त्यास त्यांच्या पूर्ण आप्तांच्या इस्टेटीपासून अलग न करता त्यातील हिस्सा मिळावयास हवा हा कायदा पास केला. त्यावेळी हा कायदा फक्त बंगालपुरताच लागू होता. मात्र १८५० मध्ये त्याला पूर्णत्व प्राप्त झाले. भारतातील काही भागांत ठगांचा भयंगर उपद्व्याप माजला होता तो १८३६ मध्ये बंद केला. 'ठग बंदोबस्त

कायद्या' मध्ये प्रांताच डोंगरावरील कित्येक देवस्थानांनजीक असलेल्या कडयावरून उडी घेऊन देहावसान साधल्यास मोक्ष मिळतो. अशाप्रकारे देहांत करून घेताच शेवट थेट देवलाकात जाण्याचा मार्ग खुला होता असा काही भागात लोकांना समज असल्याने पुष्कळ यात्रेकरू आपखुशीच्या कडेलोटाने कपाळमोक्ष करून घेत होते. या कडेलोटाला इंग्रजांनी बंदी केली आणि नरमेधाची चाल बंद केली. गंगातटावर मरण पावल्याने सहज मुक्तीचा लाभ घडतो, त्यासारखे पुण्य दुसरे नाही, सा कल्पनेस वश होऊन कितीतरी माणसे गंगातटावर अत्यवस्थ मरणोन्मुख स्थितीत जाऊन पडत. त्यांना इंग्रजी राज्यापूर्वी कोणी अटकावा केला नव्हता उलट त्यांना सहयोग देत होते. ही गंगाकिनारी मरण्याची चाल इंग्रजांनी बंद केली. १८५० च्या सुमारास आगगाडीचा रस्ता तयार करण्याचा विचार अमलात आला आणि लगेच १८५३ च्या एप्रिलमध्ये आगगाडी सुरू झाली. या व अशा कितीतरी नवनवीन सुधारणा इंग्रजांनी भारतात घडवून आणल्या. भारतवासीयांना या गोष्टी नवीनच होत्या. पेशवाईत दरवर्षी विद्वान ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्याची जी चाल होती ती इंग्रजांनी काही भारतीय सुधारलेल्या नवमतवादी विद्वान व वजनदार लोकांच्या विनंतीवरून बंद केली व त्यातील द्रव्याचा विनियोग मराठी ग्रंथलेखनाला उत्तेजन आणि कॉलेजात फेलो म्हणून गुरू–शिष्य नेमण्याकडे करावा असे ठरविले.

महाराष्ट्रत सामाजिक विचारांची धारणा मुख्यत: इंग्रजी राजवटीत होऊ लागली. इंग्रजी शासन, इंग्रजी शिक्षण जसजसे येथील भूमीत बध्दमूल होत गेले तसतसे येथील समाजजीवनातील समाजव्यवस्थेला, संस्कारांना, श्रध्दांना एकंदर जीवनपध्दतीलाच एकप्रकारचे प्रचंड आव्हान मिळाले. जुन्या, नव्या मतांचे संघर्ष सुरू झाले. 'स्वातंत्र्य', 'लोकशाही' इत्यादी आधुनिक जीवनमूल्यांचा साक्षात्कार त्यांना होऊ लागला. ''इंग्रजी राज्याने पाश्चात्त्य सुधारणांचा पाया तयार केला व सुधारणांची आकांक्षा आणि सांस्कृतिक व सामाजिक पुनर्विवेचनाची तृष्णा येथे निर्माण झाली''. असे जे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मत व्यक्त केले आहे हे सर्वस्वी खरेच आहे. एकंदर काय की, पाश्चात्त्य विद्येच्या स्पर्शाने हा जो अंतरबाह्य परिणाम घडून आला त्यातून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आदी क्षेत्रात मूलगामी बदल व्हावेत असा आग्रह सुरू झाला. यातून जागृतीचे नवे पर्व उदयास आले. येथेच खऱ्या अर्थाने समाजप्रबोधनाचा प्रारंभ सुरू झाला. नवे ज्ञान मिळविण्याची धडपड सुरू झाली. 'ज्ञानप्रसारक','ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश','ज्ञानचंद्रोदय','ज्ञानदर्शन', 'विविधज्ञानविस्तार' इत्यादी नियतकालिकांच्या नावावरून समाज हा ज्ञानाच्या मार्गावर वाटचाल करीत होता हे निदर्शनास येते.''पेशवाई जाऊन अवधी वीस–पंचवीस वर्षे झाली पण अल्पावधीतच एक समाज आपली जुनी–पुराणी वस्त्रे फेकून देण्यास तयार होतो. हे परिवर्तन केवळ इंग्रजी शिक्षणातूनच होऊ शकले हे एक वज्रलेप सत्य. एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्राच्या गतीला चालना देणारा एक काळ आणि याच काळात असे काही भरीव कार्य करणार विवेकनिष्ठ कार्यकर्ते उदयास आले की, ज्यांनी प्रचलित सामाजिक संस्था, धर्मसंस्था इत्यादींचा चिकित्सक विचार करून त्यातील परिणाम, विचार व कृतीद्वारे समाजापुढे मांडले.''

पाश्चात्त्य शिक्षणातील सामर्थ्याची जाणीव प्रथमत: बाळशास्त्री जांभेकरांनी झाली. त्यांनी सुरू केलेल्या 'दर्पण' आणि 'दिग्दर्शन' या नियतकालिकांमुळे तरी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात त्यांचे नाव सदैव राहील. इ. स. १८३२ मध्ये त्यांनी 'दर्पण' हे पत्र सुरू केले आणि त्यातून समाजाने पाश्चात्त्य शिक्षणाचा अंगीकार करावा, त्यातील ज्ञान प्राप्त करावे त्याशिवाय समाजाचा तरणोपाय नाही अशा वृत्तीचे लिखाण पुरविण्यात येऊ लागले. इ.स. १८४१ मध्ये भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' पत्र सुरू केले. यातून जे विचार प्रतिपादित होत असत ते देखील पुरोगामीच होते. राज्यकर्त्यांचा स्वार्थीपणा सुध्दा कधीकधी त्या पत्रातून उमटत असे. इ.स. १८४२ मध्ये ख्रिस्तीधर्मोपचारार्थ असे 'ज्ञानोदय' नावाचे पत्र सुरू झाले. १८५० मध्ये 'मराठी ज्ञानप्रसारक' हे मासिक निघाले. एकंदर काय की, या सर्वच नियतकालिकांनी महाराष्ट्र समाजाच्या वैचारिक

घडणीला अतिशय मदत केली. निरनिराळे विषय यातून प्रतिपादित होत असत. बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, दादोबा पांडुरंग, विनायक जनार्दन, कीर्तने, गोविंद नारायण मारवाडकर, विष्णुबुवा ब्रम्हचारी इत्यादी लेखक विचारंतांनी आपल्या विचारांची पराकाष्टा केली. समाजाला नवे चैतन्य दाखवून दिले. एक नवा प्रवाह समाजात वाहू लागला.

## वैचारिक साहित्य : संकल्पना व स्वरूप

तृप्ती गावंडे
एम. ए. भाग १

अर्वाचीन मराठी साहित्य अनेक वादांतून साकार झाले. त्यातील एक वाद म्हणजे गांधीवाद होय. इ.स. १९२० म्हणजे लोकमान्य टिळकांच्या मृत्युनंतर अखिल भारतीय राजकारणाची सूत्रे व नेतृत्व म. गांधीजीकडे असल्यामुळे त्यांच्या विचारप्रणाली आणि कार्यपध्दती जनतेच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले आहे म्हणून गांधीवादाची सुरूवात झाली. गांधीजीचा विचार स्वातंत्र्य आंदोलन साकार करणारा विचार होता म्हणून या विचारातून मराठी वाङ्मय समोर येऊ लागले. हा गांधीवाद कसा साकार झाला ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

टिळक आणि गांधीजी यांच्यात 'भगवद्गीते'तील तत्त्वज्ञानाबद्दल मतैक्य नव्हते. परंतु दोघांनाही पाश्चात्त्य संस्कृतीत न आढळणारे असे एक सर्वश्रेष्ठ तत्त्व भगवद्गीतेत आहे असे वाटे. या तत्त्वाचा आश्रय केल्याशिवाय मानवी संस्कृतीची खरी उन्नती होणार नाही व त्यासाठी मानव संस्कृतीला आध्यात्मिक आधिष्ठान देऊन तिच्या सर्व अंगोपांगांचा व्यवहार अध्ययात्म दृष्टीने अथवा मोक्षदृष्ट्या चालू पाहिजे असे दोघांनाही वाटत असे. टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे' असा उद्घोष करण्यापूर्वी १९१४ ला मंडालेच्या तुरूंगात 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला आणि कर्मयोग सिध्दांताची मांडणी केली.

इकडे गांधीजींनी भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानातून सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. एकंदरीत मध्यमवर्गीय मनोवृतीला पुनर्जीवन व आध्यात्मिकरण सोयीचे आहे आणि क्रांतिकारक तत्त्वज्ञानापेक्षा ते फार सुलभ आहे हे दोघांनीही जाणले होते.

२०व्या शतकातील एका नव्या नीतीप्रधान तब्बल राजकीय तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते व प्रत्यक्ष व्यवहारात प्रयोग करून घेणारे महात्मे अशी गांधीजींची ख्याती होती. गोखल्यांच्या आध्यात्मिकीकरणाची कल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. 'सत्य आणि अहिंसा' ही त्यांची प्रमुख साधने होती व 'सत्य हाच परमेश्वर आणि अहिंसेने त्याचा शोध लावणे शक्य आहे' असा त्यांचा सिध्दांत होता. कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह याद्वारे राज्यकर्त्यांना तडजोड करण्यास भाग पडते असा त्यांचा विश्वास होता. टिळकांच्या मृत्युच्या दिवशीच १ ऑगस्ट १९२० रोजी त्यांनी 'असहकारितेची घोषणा' केली आणि देशभर दौरे काढून कार्यक्रमाचा प्रसार केला.

गांधीयुगाला प्रारंभ १९२० साली झाला. तरी महाराष्ट्रात प्रभाव पडायला दहा वर्षे जावी लागली. गांधीना ललित साहित्याविषयीची आस्था नव्हती कारण ललित साहित्य हे काल्पनिक असल्यामुळे ते असत्य असते अशी त्यांची धारणा होती. कथा, कादंबरी, नाटक, इतर इ. ललित वाङ्मयाचे काही वैचारिक निबंध वाङ्मयावर गांधीवादाचा परिणाम निश्चित झालेला दिसतो.

इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांनी आपल्या निबंधातून नि:शस्त्र प्रतिकार, अहिंसा, सत्याग्रह इत्यादींवर तर्कशुध्द विचारसरणी मांडली. श्री. शि. म. पराजंपे यांनीही 'स्वराज्य' साप्ताहिकातून उपरोधिक व वक्रोक्तीपूर्ण शैलीने गांधीवादाच्या विरोधाचा समाचार घेतला. कृ.प्र.खाडिलकर यांनी 'नवाकाळ' ह्मा वर्तमानपत्राच्या अग्रलेखातून गांधीवादाचा पुरस्कार केला. १९२० पूर्वी हरिभाऊ आणि त्यांच्या आसपास केशवसुत संप्रदायाचे कवी तसेच गडकरी १९२० पूर्वीच दिवंगत झाले. त्याचवेळी

गांधीनी एका वर्षात **'स्वराज्य'** ही घोषणा केली. पण निर्माण केलेले नवे चैतन्य कथा, कादंबरी, नाटक यातून प्रगटू शकले नाही. इतिहासाचार्य राजवाडे यांनी केलेला गांधीवादाचा पुरस्कार ललित वाङ्मयात प्रेरक ठरू शकत नाही. १९३० नंतर प्रत्यक्ष अवलंब करणाऱ्या आणि विचारसरणी घेणाऱ्या निबंधांची एक परंपरा निर्माण झाली. विनोबा भावे, साने गुरूजी, आचार्य जावडेकर, दादा धर्माधिकारी, म.पो. गाडगीळ, लक्ष्मणशास्त्री जोशी इ. विचारवंत यात प्रमुख होते.

गांधीवादाचा प्रसार करणे हे त्यांचे जीवितकार्य होते. विनोबा भावे म. गांधीचे पहिले सत्याग्रही, 'भूदानयज्ञाचे उदाते' आणि 'सर्वादायी चळवळीचे प्रवर्तक' होते. 'मधुकर', 'जीवनदृष्टी' व 'सिंहावलोकन' इ. निबंधसंग्रह गांधीवादी तत्त्वज्ञानाचा व जीवनदृष्टीचा प्रसार करणारे आहेत. मराठीतील एक श्रेष्ठ भाष्यकार गांधीप्रमाणेच विनोबांनी पवनारला आश्रम काढला. आश्रम परंपरेचे पुनरूजीवन केले.

साने गुरूजी हे नेत्याच्या काळात समाजवादी झाले असले तरी प्रारंभापासून गांधीवादी विचारसरणीने प्रभावित झाले होते. गांधीवादातील सांस्कृतिक विचार त्यांनी मराठीत मांडला. 'भारतीय संस्कृती' हे त्यांचे उत्तम चर्चेचे विषय बनले. गांधीवादी दृष्टीकोनातून भारतीय संस्कृतीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. अनेक संस्कारक्षम निबंध लिहिले. 'श्यामची आई', 'मंत्री', 'स्त्रीगीते' इ. बाबतीत वाङ्मया लिहिले. पण गांधीवादी होण्याचा मराठी वाङ्मय निर्मितीवर परिणाम झाला नाही तसेच त्यांच्या ललित वाङ्मयांना प्रतिष्ठाही लाभली नाही. 'मुलांचे व बायकोचे हळवे वाङ्मय' अशी उपेक्षाच झाली. म. गांधीवर टॉलस्टायच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव आल्यामुळे परंतु मुळात गांधीवादीवर विचार प्रेरक ठरू शकला नाही. जावडेकर, आचार्य भागवत, दादा धर्माधिकारी ह्यांनी गांधीच्या तत्वप्रणालीचा अविष्कार केला असला तरी त्याचा ललित वाङ्मयावर ठसा उमटू शकला नाही. ना.सी.फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्या ही कादंबऱ्यात त्या काळात गांधीवादाचेच वर्चस्व होते. समाजाकडे अनुकंपेने, भूतदयेने पाहिले त्यामुळे थोडा तरी परीणाम या वाङ्मयावर झाला. 'उपेक्षितांचे अंतरंग' श्री. म. माटे यांनी उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला. १९३० मध्ये रघुवीर सुमंत ह्यांना दलित व्यक्तीचे जीवन जाणून घेण्याची व त्यांच्या विषयी सहानुभूती निर्माण करण्याची शक्ती खर्ची घातली. विभावरी शिरूरकर, गीता साने, प्रेमा करल, मालतीबाई इत्यादींनी मध्यमवर्गीय स्त्रीजीवनाची चित्ररेखा आखली.

१९४० नंतरच्या मराठी साहित्यिकांपुढे मनू, मार्क्स, गांधी, सार्त्र आणि आंबेडेरी या प्रेरणांचे पंचक होते. क्षीण अपवाद वजा जाता गांधीची प्रेरणा मराठीत ललित साहित्य निर्माण करू शकली नाही. मार्क्स व सार्त्र यांच्या प्रेरणा अनुभवबाह्य आणि बौध्दिक स्वीकाराच्या पातळीवरच्या असल्याने त्यांच्यामुळेही मराठी साहित्यात लक्षात घ्यावा असा नवा दिवस उगवला नाही. शक्य तिथे प्रकट पण बहुतांशी छुप्या पध्दतीने मनुप्रेरणेने म्हणजे परंपरावादी परंपरेचे साहित्य येथे अखंड सुरू आहे.

१९६० नंतर आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्याचा स्फोट या संमिश्र वाङ्मयीन पार्श्वभूमीवर होतो. या प्रेरणेने मराठी साहित्यात एक अनोखे सुवर्णयुग निर्माण केले. तिच्यामुळे मराठी साहित्यात दुसरे मूलभूत प्रबोधन सिध्द झाले. या युगंधरप्रेरणेतून जन्माला आलेली दलित साहित्य ही एकूणच विश्वसंस्कृतीत आणि साहित्यात एक अन्यन अशी ऐतिहासिक घटना मानली जाते.

या देशातील क्रॉनिक शोषणव्यवस्थेचे शवविच्छेदन डॉ. आंबेडकरांनी केले आणि या शोषणव्यवस्थेचे अजोड क्रौर्य आंबेडकरी प्रेरणेने पेटलेल्या दलित प्रतिभांनी आपल्या ललित साहित्यातून मांडले. आंबेडकर या साहित्याचे आदिपुरूष आहेत. जडवाडी नीतीशास्त्र हे या प्रेरणेचे स्वरूप आहे. या प्रेरणेच्या मार्गदर्शनानुसार हे साहित्य अंर्तबाह्य विद्रोही आहे. भारतातील आणि जगातील विचारप्रणालीमधील व वाङ्मयीन परंपरांमधील काय स्वीकारायचे आणि काय नाकारायचे या संदर्भात दलित साहित्याची स्पष्ट भूमिका आहे. आंबेडकरी प्रेरणा अध्यात्मवादी असणे हा वस्तुस्थितीचा भाग असण्यापेक्षा तो अध्यात्म सोडणे कठीण असलेल्या अध्यात्मनिष्ठ दलित व

काही दलितेतर मंडळीच्या सवलतीचा भाग आहे. पण या अशा सवलतनिष्ठ लोकांमुळे आंबेडकरांचे नास्तिक्य आणि मैत्री करूणेवर आधारलेली नीती बाधित होऊ शकत नाही.

**नियतकालिकांचे सांस्कृतिक कार्य :—**

चिपळूणकरांच्या 'निबंधमालेने' घडवून आणलेली सत्व जागृतीसाठी व महाराष्ट्रापुरतीच मर्यादित असलेली एकाकी घटना नव्हती. इ.स. १८७५ ते १८९५ या काळात समग्र भारतात नवचैतन्याची लाटच उसळली होती. इंग्रजी संस्कृतीच्या सुरूवातीलच्या सर्वस्पर्शी आघाताने स्तिमित झालेली भारतातील सुशिक्षित जनता हळूहळू अंतर्मुख होऊन आपल्या सांस्कृतिक परंपरेच्या स्मरणातून स्फूर्ती घेऊन आत्मश्रध्द बनू लागली आहे. बंगालमध्ये श्रीरामकृष्ण परमहंसाचे परमशिष्य स्वामी विवेकानंद यांनी याच सुमारास अखिल जगतात भारतीय वेदांत तत्वज्ञानाचा जयजयकार करण्याकरिता संन्यास दिला आणि पुढे लवकरच 'रामकृष्ण मिशन' स्थापन झाले. १८७७ साली स्वामी दयानंद सरस्वतींनी लाहोरात जी 'आर्य समाजाची' शाखा स्थापन केली तिनेच पंजाबात नवजीवन निर्माण केले. अशारीतीने स्वाभिमानाचे आणि जागृतीचे नवे युग उदयास येत असताना त्या नवयुगनिर्मितीला पोषक अशा अनेक घटना महाराष्ट्रात घडून आल्या. निबंधमालेचे संचालनही स्वाभिमानी राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारी त्यावेळची महाराष्ट्रजीन सर्वात महत्त्वाची घटना होती. पाश्चिमात्या संस्कृती व भारतीय संस्कृती यांच्या सहचर्यातून भारताच्या सांस्कृतिक इतिहासात सर्वस्वी अपूर्ण असे जे नवे जीवन येथे मूळ धरू लागले त्याची सुरूवात १९७५ ते १९८५ या कालखंडात झाली.

**नियतकालिकांची कामगिरी :—**

इंग्रजी राजवटीत शिक्षण प्रसाराबरोबरच नव्या विचारांची जागृती झाली. मराठी नियतकालिके व मराठी वाङ्मयाचा संबंध अत्यंत जिव्हाळयाचा आहे. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या सर्वागीण विकासाला मराठी नियतकालिकांनी सहकार्य केले. चिपळूणकर, टिळक, आगरकर, परांजपे, केळकर इ. अर्वाचीन मराठी वाङ्मयातील विद्वानांचे व साहित्यिकांचे लेखन नियतकालिकांतून प्रसिध्द झालेले आहेत. उपरोक्त लेखक श्रेष्ठींनी आपले विचार लोकांपर्यत पोहेचविण्याचा गद्यलेखनाच्या माध्यमापेक्षा नियतकालिकातील लेखनाच्या माध्यमाचा अधिका प्रमाणात उपयोग केलला आहे. इंग्रजी पूर्वकालात अभावानेच जाणवणाऱ्या मराठी गद्याचे इंग्रजी आमदानीत नियतकालिकांनीच उत्तमप्रकारे पोषण केले आहे. इंग्रजी वाङ्मयाच्या परिचयानंतर आधुनिक मराठीत रूढझालेले निबंध, लघुकथा, कादंबरी, कविता इ. वाङ्मयप्रकार प्रथम मराठी नियतकालिकातच प्रसिध्द होऊन मान्यता पावलेले आहेत. इंग्रजीच्या संपर्कामुळे महाराष्ट्राचे जीवन सतत बदलत गेले. या बदलत्या जीवनाचे प्रतिबिंब स्पष्टपणे मराठी नियतकालिकांनीच प्रथम बोलके केले. या नव्या आंग्ल स्फुर्ती जीवनातील नव्या मराठी गद्याला मराठी नियतकालिकांनीच मराठी लोकांच्या जीवनाशी अधिक जवळचा संबध आणला. राजकीय, धार्मिक सुधारणांन अनुकूल—प्रतिकूल अशी अनेक आंदोलने महाराष्ट्रत झाली. ही आंदोलने यशस्वी करण्याकरिता आवश्यक असलेली लोकजागृती मुख्यत: नियतकालिकांनीच मोठया प्रमाणावर घडवून आणली. या जागृतीच्या बाबतीत प्रभावी वक्त्यांच्या मैदानी भाषणांनी पुष्कळ कार्य करून दाखविले. पण त्या मैदानावर जे लोक ही भाषणे ऐकण्याकरिता जमले नव्हते त्यांच्यापर्यत भाषणे शेवटी नियतकालिकांनीच नेऊन पोहोचविली. १८७८ साली सरकारला वर्तमानपत्राचे सामर्थ्य, किती वाढले होते? याची स्पष्ट कल्पना येईल. नियतकालिके ही पाश्चिमात्यांकडून घेतलेले विचार व्यक्त करण्याचे एक प्रभावी साधन भरपूर लोकांना मराठी भाषेचे गद्यवैभव व लोकशिक्षणाचे कार्य प्रचंड प्रमाणावर करून घेतले.

तात्पर्य, मराठी नियतकालिकांनी सामाजिक प्रबोधन, सांस्कृतिक ठेवा आणि वाङ्मयीन महात्म्य साकार केले आहे म्हणून आजही नियतकालिकांचे कार्य प्रचंड प्रमाणात करून घेतले.

अर्वाचीन या शब्दाचीच उत्पत्ती १८१८ मध्ये झाली. म्हणजे अव्वल इंग्रजी विचाराला भारतात वाव मिळायला लागला. या अव्वल कालखंडात जा बदल दिसून येतो तो इंग्रलीच्या प्रभावाचे सूत्रच ठरते. इंग्रजांनी इंग्रजी भाषेचा भारतात प्रसार केला. त्यातून सामाजिक, राजकीय आणि वाङ्मयीन अंगाची नवी कहाणी सुरू झाली. एकीकडे स्वातंत्र्याचे आंदोलन, दुसरीकडे सामाजिक लढा तर तिसरीकडे वाङ्मयीन चळवळ उभी राहिली.

१८१८ नंतर भारतात इंग्रजांचे राज्य प्रस्थापित झाले आणि या राजवटीला शह देण्यासाठी एक भाषा भारतीयांना सापडली. ही भाषा म्हणजे इंग्रजी होय. या इंग्रजीचे भारतीय विद्यार्थ्यांना ज्ञान ग्रहण केले. त्यातून भारतीयांमध्ये संवाद होऊ लागला आणि राजकीयांमध्ये लढा उभा राहिला. या राजकीय लढ्याच्या बाजूने लोकमान्य टिळक उभे राहिले. ही राजकीय चळवळ भारतीयांना स्वातंत्र्याचे, घोषवाक्य सांगणारी होती. इंग्रजांनी राजकीय लढा दडपण्यासाठी अनेक प्रयत्न केले. भगतसिंग, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, झाशीची राणी इ. या राजकीय लढ्यात सामील झाले. 'स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय आपण आपला विकास, देशाचा विकास करू शकणार नाही' असे या मंडळीना वाटू लागले.

तात्पर्य, अव्वल इंग्रजी काळात राजकीय, सामाजिक, वाङ्मयीनदृष्टया प्रबोधनाची नवी परंपरा साकार झाली नवयुगाची कास पकडली व नव्या प्रबोधनाचा इतिहास साकार केला.

## उत्तम समीक्षेचे/समीक्षकाचे गुणविशेष

स्नेहा दाभाडे
एम. ए. भाग १

समीक्षक हा सर्वसामान्य रसिकासारखे पण तज्ञ रसिक असतो. त्याची रसिकता चोखंदळ असते. त्याच्या ठिकाणी 'भावयित्री' प्रतिभा असते म्हणजे आस्वादन क्षमतेच्या बळावर पुनर्निमिती करणारी असते. कलास्वाद घेणारी ही प्रतिभा विश्लेषक असते पण साहित्यकृतीचे आकलन करण्याइतका व्यासंग आणि आस्वाद घेण्याइतकी भावसंवेदना त्याच्याजवळ हवी. समीक्षकासा रसग्रहण करतांना साहित्याचे सूक्ष्म अवलोकन, मार्मिक विश्लेषण व प्रसंगी यथोचित मूल्यमापनही करावयाचे असते. समीक्षा ही सर्वमान्य निर्दोष व थोर दर्जाची होण्यासाठी समीक्षकाच्या अंगी खालील गुण असावेत.

**सहृदयता :—** अभिनव गुप्तांनी कलासौंदर्यांचे निकष शेवटी सहृदयप्रणीतच मानले आहेत वाङ्मयातील श्लील, अश्लील, औचित्य, अनौचित्य इ. ठरविणारा सहृदय असतो. 'अन्न सहृदया : एवं प्रमाणम।' तोच सौंदर्याचा व आनंदाचा रसिकपणे उपभोग घेतो. सहृदयाचा पहिला गुण म्हणजे हृदयसंवात म्हणजे कला व कलावंताविषयी सहानुभूतीने, प्रसन्नपणे पाहण्याची वृत्ती, हिच्या अभावी काव्यातील सौंदयदर्शन तर घडत नाहीच पण पूर्वग्रहदूषितपणा, छिद्रान्वेषवृत्ती इ. फाटे फुटतात. काही टीकाकारांना मराठीत चांगले ललित वाङ्मय आढळत नाही. याचे कारण हृदयसंवादाचा अभाव, तथापि सहानुभूती म्हणजे शब्दाशब्दाला 'माशल्ला' म्हणणारी स्वस्त व अविवेचक वृत्ती नव्हे. सहानुभूती विवेचक गुणांसह हवी.

**तद्रूपता :—** तद्रूपता म्हणजे कलाकृतीचा आस्वाद घडण्यासाठी आवश्यक अशी एकाग्रता वा तन्मयता. तद्रपूता म्हणजे पूर्ण तन्मयता नव्हे त्यात किमान ताटस्थ हवे. किमान ताटस्थांच्या अभावी सामान्य रसिक क्रियाशील बनू शकतो. म्हणून विशुध्द रसिकतेत हतटस्थपणा हा गुध हवा.

**बहुश्रुतता :—**समीक्षकाचे ज्ञान व दृष्टी विविधांगी असावी. त्याने काव्यकलेशी संबंधित अनेक गोष्टीचे शक्य तेवढे ज्ञान करून घ्यावे. त्याचप्रमाणे साहित्य मीमांसेला उपयोगी ठरणाऱ्या सौंदर्यशास्त्र, भाषाशास्त्र, तत्त्वज्ञान या शास्त्रांची त्याने माहिती करून घ्यावी. देशोदेशीचे श्रेष्ठ

साहित्य त्याने वाचलेले असले पाहिजे. साहित्याचा सांस्कृतिक अनुबंध लक्षात घेण्याची त्याच्याजवळ क्षमता हवी.

**व्यासंग** : — विविध कालखंडातील प्रचलित काव्य परंपरा, वाङ्मयीन मूल्ये, ऐतिहासिक परिस्थिती, साहित्यकाराचे चरित्र व व्यक्तीमत्व विशेष इत्यादींचे जितके सखोल ज्ञान टीकाकारसा असेल तितका तो विविध कलाकृतींच्या रसास्वादात अधिक पद्रूप हाईल व त्यातील सौंदर्यास्वाद स्वत: उपभोगून इतरांसही प्राप्त करून देईल. टीकाकारास वरील व्यापक ज्ञान नसेल तर त्याची टीका उथळ व पूर्वग्रहदूषित होईल. नवनवीन प्रयोग त्यास आकलन करता येणार नाही. उदा. कलीदासकालीन समाजाची व संस्कृतीची सूक्ष्म माहिती असेल व तत्कालीन वाङ्मयीन संकेताचे ज्ञान असेल तरच त्याच्या काव्याचा व नाटकांचा आस्वाद अधिक समर्थपणे घेता येईल. संस्कृतप्रचून भाषा, उपमा, अलंकाराचे अज्ञान इ. मुळेच अनेक टीकाकारांना मोरोपंतांच्या काव्यातील गोडी कळत नाही. टीकाकार सर्वज्ञ असावा असे नव्हे. पण अर्थग्रहण व्हावे व रसास्वाद चांगला घडावा म्हणून सामान्यत: अनेक लेखकांच्या अनुभवांची व शक्य तेवढया आनुषंगिम ज्ञानाची शिदोरी त्याच जवळ हवी.

**रसज्ञता** :— कलाकृतीतील सौंदर्याचे रहस्योद्घाटन करणे हे टीकाकारांचे काम आहे. पण सामान्य वाचकास काही व्यावहारिक लाभ करून द्यावा हा त्याच्या टीकेचा उद्देश नसतो. वाङ्मयीन चित्रण कलापरीक्षेच्या व सौंदर्य परीक्षेच्या नियमांनी झाले आहे किंवा नाही हे पाहणे त्यांचे काम आहे. ललित व ललितेतर वाङ्मय त्याने एकाच फूटपट्टीने मोजू नये. ललित कृतीचा विषय तिच्या मांडणीपासून अभेद्य असतो. म्हणून तिचे परीक्षण अंतर्बाह्य सुसंगतीतून व्हावे. अन्य शास्त्रानुरोधाने नव्हे. म्हणजेच टीकाकार हा रसज्ञ हवा. सर्वज्ञ नको.

**रिचर्डस्नने टीकाकाराजवळ पुढील गुण असावे असे सांगितले** :—“The Qualification of good critic are three. He must be an adept at experiencing without accentricities. The state of mind relevant to the work of art, he is judging, secondly, he must be able to distinguish experience from one another as regards their less superficial features. Thirdly he must be a sound judge of values.”

म्हणजे परीक्षणासाठी घेतलेल्या कलाकृतीशी संबंधित, प्रसंगोचित असलेल्या मनोवृत्तीचा, विक्षिप्तपणाला थारा न देता अनुभव घेण्यात टीकाकार वाकबगार असला पाहिजे. दुसरे म्हणजे निरनिराळया अनुभवातील कमीअधिक उथळ (वरवरचे) अनुभव कोणते हा भेद त्याला दाखवता आला पाहिजे. तिसरे म्हणजे त्याला मूल्यांची पूर्ण पारख हवी.

**मित्रत्व** :—टीकाकार हा सामान्य वाचकाला आपला मित्र वाटला पाहिजे. जरी त्याने एखाद्या लेखकाचे किंवा पुस्तकाचे गुणावगुण चर्चिले तरी त्याचा मुख्य हेतू वाचकाला मूळ लेखन वाचण्यास प्रवृत्त करणे हा असला पाहिजे.

**बौध्दिक कणखरपणा** :—समीक्षा व्यवहार हा एक बौध्दिक व्यवहार असल्याने समीक्षाजवळ बौध्दीक कणखरपणा हवा. “The critic’s mind must be a rrained mind, mind which instinctively or as a conscious process is guided by principles of ideas.”

**कल्पकता** :—कलावंताप्रमाणे समीक्षाजवळ कल्पकताही हवी या कल्पकतेने तो कलाकृतीतील धूसर अज्ञान भाग जोडून काढतो. कलावंताने ठेवलेल्या रिकाम्या जागा भरून काढतो. त्याने उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देतो. साहित्यकृती काय व्यक्त करू पाहात आहे व ते तिला कितपत व्यक्त करता आले, ते त्याला कल्पतकेमुळे न्याहाळता येते.

**शोधकता** :—समीक्षक हा नम्रपणे जिज्ञासू शोधक हवा. त्याला सत्याची कदर हवी. साहित्यासबंधीच्या सर्व गोष्टी कोष्टकात बसू शकत नाही. मग त्यासाठी साहित्याच्या पोटात शिरून तिच्या प्रयोजनाचा, रूपांचा शोध त्याने घेतला पाहिजे. आपल्या हाती लागल्यासारखे वाटणारे साहित्यिक प्रवृत्तीच्यासंबंधीचे निष्कर्ष परत—परत तपासून पाहून ते सुधारण्याचे, त्यांना आवश्यक ती

मुरड घालण्याचे, त्याच्याजवळ धैय हवे. शब्दाच्या मागे दडून राहिलेली जी कलाकृतीच्या चलनवलनाची क्रिया तो कलावंत शब्दात रेखाटीत नाही ती टीकाकारालाच ओळखावी लागतात.

रा.श.वाळिंबे यांनी समीक्षकाचे विधी—निषेध पुढीलप्रमाणे सांगितले आहेत.

**विधी :—**

१ टीकाकारा सत्यप्रिय असावा. टीकाभूत ग्रंथातील खरे गुण व खरे दोषच त्याने सांगावे.
२ त्याच्या ठिकाणी मर्मग्राही बुधिमत्ता व विश्लेषक कौशल्य हवे. म्हणजे त्याच्या टीकेस समतोलपणा येईल.
३ त्याच्याजवळ निर्णय देण्यासाठी युक्तिवाद कौशल्य व कणखरपणा हवा.
४ ते नि:पक्षपाती हवा तसेच तो व्यवहार चतुर, भाषापंडित, सौजन्यशील व निरहंकारी असावा.
५ त्याने विवेकपूर्ण अवलोकन करावे.
६ शास्त्रे आणि काव्ये यांच्या अवलोकनाने उत्पन्न होणारे नैपुण्य आणि काव्यज्ञ जे कोणी असतील त्यांच्यापासून मिळविलेल्या ज्ञानाच्या सहाय्याने त्याने आपला अभ्यास समृध्द करावा.
७ साहित्य शास्त्रातील विविध प्रणालींचे त्याने ज्ञान करून घ्यावे.
८ स्वतंत्र बुध्दिमत्तेचा खोटा डौल न मानता पुढीलांचे, प्राचीनांचे काय—काय सिध्दांत आहेत त्यांचा त्याने अभ्यास केलेला असावा.
९ रसपरिपोष, शब्दातील ध्वनी, रसारवर अधिष्ठित असलेला ध्वनी शैलीला आकर्षकपणा आणणाऱ्या गोष्टी लयबध्दता किंवा समप्रमाणता इ. चे त्याचे यथार्थ ज्ञान करून घ्यावे.
१० वाङ्मयातील निरनिराळया परंपराचे व संप्रदायांचेही त्याने ज्ञान करून घ्यावे, याशिवाय ज्ञानाचे कोणते तरी एक क्षेत्र निवडून त्या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान आत्मसात करून जगाच्या बौध्दिक शर्यतीत मागे न पडण्यासाठी इतर काही क्षेत्रातील ज्ञानाचा त्याने थोडा—थोडा परिचय करून घेतला पाहिजे.
११ त्याच्याजवळ काव्यात्मकता हवी व स्वत:च्या अभिरूचीला वळण लावण्याचे सामर्थ्य हवे.

# समाजशास्त्रीय समीक्षा पध्दती

पायल काकडे
एम. ए. भाग १

**समाजशास्त्रीय समीक्षा पध्दतीचे स्वरूप :—**

१. समाजशास्त्रीय समीक्षा पध्दती असे धरून चालते की कलाव्यवहाराचा समाजाशी निकटचा व महत्त्वाचा संबंध असतो. काल ही निवांत पोकळीक जन्माला येत नाही. केवळ एका व्यक्तीची ती निर्मिती असत नाही. काळाच्या आणि परिस्थितीच्या समीक्षक लेखकाच्या सामाजिक संदर्भाचा आणि या संदर्भांना लेखक कोणत्या प्रकारे आणि किती प्रमाणात सामोरा गेला याचा खास करून अभ्यास करतो.

२. समाजशास्त्रीय समीक्षेचा उदय १८ व्या शतकात पाश्चात्य विचारवंत **व्हीको** या टीकाकाराने होमरच्या महाकाव्याची सामाजिक पार्श्वभूमी दिग्दर्शित केली तेथे झाला पण या समीक्षा पध्दतीचे पहिले पूर्ण स्वरूपी दिग्दर्शन फ्रेंच टीकाकार **तेन** याने आपल्या विख्यात सिध्दांताच्या आधाराने केले. साहित्यकृती हा लेखकाच्या वंशवारसा, आजूबाजूची परिस्थिती आणि कालौघातील विशिष्ट बिंदू यांचा परिपाक होय असे सूत्र त्याने सांगितले.

३. समाजशास्त्रीय समीक्षेला मार्क्सवादी विचारप्रणालीने अधिक परिपुष्ट केले. कलेची पाळेमुळे वास्तव जीवनात खोलवर रूजलेली असतात. उत्पादने साधने, उत्पादन पध्दती, यातून निर्माण झालेले वर्ग, या वर्गाचे हितसंबंध, त्यातून उद्‌भवणारे अनेकविध प्रश्न त्याच्यातून निर्माण होणारे ताण या आधारावर साहित्यिकाच्या कलाकृतीची निर्मिती होते. सांस्कृतिक इमले वर्गीय प्रभुत्वातून साकार होतात. ही वर्गीय जीवनदृष्टी साहित्यात परार्तीत होत असते.

४. मार्क्सवादी समीक्षा अर्थशास्त्रधिष्ठित असते तर समाजशास्त्रीय समीक्षा समाजरचना समाजधारणा, समाजाच्या बांधणीला उपयुक्त ठरणारे मानसिक विचारबंध, भावानुभवप्रवृत्ती यांचाही विचार करते. विशिष्ट समाजरचनेमुळे निर्माण झालेले साभिप्राय सांस्कृतिक समाजघटक आणि साहित्य, संघटनेचे घटक यांचे अन्योन संबंध स्पष्ट करणे हे समाजशास्त्रीय समीक्षेचे प्रयोजन असते. यासाठी **समीक्षकाने पुढील घटक नजरेसमोर ठेवावे**.

अ) समाज जीवनाचे एकंदर स्वरूप

ब) ज्ञानाचा प्रचलित व्यूह

क) सांस्कृतिक परंपरा व त्यांचे विशेष

ड) कलावंताची प्रकृती

फ) संस्कृतिवितरणाची माध्यमे

ग) श्रोत्यांची अभिरूचीची जडणघडण

ह) साहित्यमंडळे, प्रकाशन संस्था, विविध सांस्कृतिक संघटना व त्यांची कार्ये.

ज) विद्यापिठे – अभ्यासक्रमाची आखणी, पाठयपुस्तकांचे स्वरूप

ल) साहित्य आणि साहित्येतर कलांची स्थिती–गती, परस्पसंबंध

म) संवेदनाविश्वावर परिणाम करणारे विविध घटक (उदा. टी.व्ही. बोलपट, नभोवाणी, चित्रप्रदर्शने, संगीताचे मेळावे, फॅशन, व्यापारी डिझाईन्स, औद्योगिकीरणाने निर्माण झालेले विविध रचनाबंध इत्यादी.)

न) प्रतिभावंत आणि त्याची प्रभावकक्षा परकीय कलाकृती, संस्कृती, विज्ञान इत्यादी
नवा–जुना परिचय.

५. समीक्षकाने साहित्य व समाज यांच्यातील नातेसंबंधांचा खोलात जाऊन विचार केला पाहिजे. प्रथमत: साहित्यिक, लेखनव्यवसाय, लेखनसंस्था यांचा आर्थिक पाया काय आहे याचा विचार, त्यानंतर लेखकाचे समाजातील स्थान आणि त्याचे समाजविषयक तत्त्वज्ञान नंतर साहित्याचे सामाजिक प्रयोजन आणि शेवटी त्या काळातील साहित्याचे वाचक कोण आहेत आणि साहित्याचा समाजावर प्रत्यक्ष परिणाम कोणता होत आहे याचा विचार करावा.

६. प्रत्येक लेखकाची संपूर्ण सामाजिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी उभी करण्याचे कारण नाही. तो कोणत्या वर्गात, कुटुंबात, आर्थिक स्तरावर जन्मला, जगला हे पाहणे शक्य आहे. आज लेखकाचा जन्म कोणत्या वर्गात झाला या गोष्टीला फार महत्त्व देता येत नाही. शिवाय लेखकाने आपल्या लेखनात केलेली स्पष्ट विधाने त्याच्या साहित्याचा सामाजिक वर्ग यांचा फार निकटचा संबंध उरलेला नाही. बुध्दीमंतांचा एक मध्यस्थ वर्ग निर्माण झालेला आहे.

७. आज या अभ्यासात आर्थिक, सामाजिक, राजकीय संदर्भाचा साहित्याशी सरळ, साक्षात संबंध जोडता येत नाही. आर्थिक व अन्य घटकांबरोबर सांस्कृतिक घटक, प्रथा, समज, संकेत यांचाही मोठा प्रभाव असतो.

८. ज्ञानप्राप्तीची समाजशास्त्र अशी एक शाखा आहे तीत विचार आणि अविष्कार यांचा आणि सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचा संबंध काय असतो. याचा अभ्यास असतो. या पध्दतीचा समाज व साहित्य यांच्यामधील संबंध तपासण्यासाठी देखील उपयोग करता येईल.

९. या पध्दतीच्या अभ्यासाची दिशा पुढीलप्रमाणे सांगता येईल.
क) प्रथम विशिष्ट कालखंडाची निवड होते.
ख) त्यातील कोणत्या विषयाचा अभ्यास करावयाचा हे निश्‍चित होते.
ग) या विषयासंबधीच्या सर्व साहित्यकृतींचे विश्लेषण करून त्या मध्यवर्ती कल्पनाबंधाचा अविष्कार कसा झाला याचा विचार करण्यात येतो.
घ) कलाकृतीचे सर्व सामाजिक संदर्भ विचारात घेतले जातात. गट, वर्ग, पिढया, व्यवसाय, पंथ, पक्ष, प्रदेश आणि साहित्य प्रवाह हे अलग करण्याचा प्रयत्न होतो.
च) याविषयीची प्रगती कोणत्या प्रकारे होणार याचा अंदाज घेतला जातो.
छ) विचाराचा आशयच केवळ नव्हे तर आकृतिबंधही त्याच्या ऐतिहासिक, सामाजिक स्थानामुळे घडत असतो.

अशा या समीक्षापध्दतीचा उपयोग साहित्याचे स्वरूप, प्रेरणा व प्रयोजन समजून घेण्यासाठीही होतो. त्यांचे विवेचन खालीलप्रमाणे करता येईल.

**साहित्याचे स्वरूप :—**

१) कलाकृतीतील आशयानुसार वेगवेगळया वाङ्मय प्रकारात कमीअधिक प्रमाणात समाजसापेक्षता असते उदा. प्रेमकवितेतही कालानुसार बदलणारे प्रकटीकरणाचे रूप—प्रबंधकाव्याकडून स्फुट काव्य, एकेरी नावे इ. कथा—कादंबऱ्यांमधील स्त्री समस्यांचे रूप बदलतांना दिसते. उदा. ‘यमू ते अचला’ चा प्रवास पहा

२) अनुभव हा लेखकाच्या अस्तित्वालाच चिकटलेला असतो. त्यामुळे समाज जीवनाच्या जडणघडणीचा परिणाम, कलाकृतीवर होतो. उदा. ‘रायटर्स वर्कशॉप’ घेऊन लेखकाच्या लेखनाच्या लेखनाला वळण दिले जाते. उदा. ‘शतखंड’ सारखी एकांकिका या वर्कशॉपमधून आली.

३) १९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, जनवादी चळवळींनी जोम धराला. तत्पूर्वी सदाशिवपेठी, गांधीवादी, पुरोगामी अशी विशेषणे लावली जात. या विशेषणांमागील साहित्याचा अभ्यास साहित्याच्या जिवंत प्रवाहाच्या अनुषंगाने व्हायला हवे. चळवळींनी साहित्याचे स्वरूप कसे ठरते ते पाहिजे जावे. उदा. लिटल मॅगेझिनच्या चळवळीने बोलीभाषांना साहित्याचे माध्यम केले व आज साहित्याचे स्वरूप तेच झाले.

४) समाजशास्त्रीय समीक्षादृष्टीने साहित्याच्या स्वरूपाबाबत विविध प्रश्न विचारता येतात. उदा. लेखकाची संवेदनशीलता ज्या वातावरणात तयार होते तिचे स्वरूप, ती समकालीन विचारधारेशी सुसंगत आहे काय, ती पुरोगामी आहे की प्रतिगामी, वाचकांची अभिरूची कशी आहे व त्यांचा अनुभव करण्यासाठी लेखक लिहितो काय, दिवाळी अंकाच्या व्यावसाायिकीकरणामुळे कादंबरी आकाराने लहान झाली काय, दूरदर्शनच्या पटकथालेखनासाठी मालिकांना मिळणारा अवधी पाहून लेखनाचा आकार कमीजास्त केला जातो का, साहित्यावर राजकीय स्थित्यंतराचा किमी व कोणता परिणाम झाला, त्यात वास्तवाचे चित्रे किती प्रमाणात आहे. या प्रश्नाच्या उत्तरातून समाजशास्त्रीय भूमिकेने साहित्याच्या स्वरूपावर प्रकाश पडतो.

**साहित्याच्या प्रेरणा :—**

साहित्य लेखनामागील प्रेरणा त्या—त्या साहित्याच्या सांस्कृतिक वातारणातही दडलेल्या असतात. लेखकाच्याभावती सांस्कृतिक संदर्भानी भारलेली प्रतीके, पूर्वसंचित, पुराणकथा असतात. या सांस्कृतिक परंपरेमुळे लेखकाला जशी नवी दिशा मिळते तद्‌वत त्याच्या कलाकृतीचा घाट बनतो. विशिष्ट प्रकारच्या संकल्पना विशिष्ट कालखंडात अवतरता. त्याचाही कलाभिव्यक्तीवर परिणाम होतो. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाची निर्मिती पंथप्रसाराच्या उद्देशाने झाली. धर्मप्रवण

समाजरचना हे त्यामगचे कारण होते. तत्कालीन लेखक, लोकांची अभिरूची लक्षात घेऊही लेखन संपन्न होते. राष्ट्रप्रेम, लोकशाही, व्यक्तीस्वातंत्र्य या उदयास आलेल्या संकल्पनांमुळेही साहित्यावर परिणाम झाला. कलाकृती ही व्यक्तिगत निर्मिती असली तरी तिचे कलाकृतीपण सामाजिक असते.

**साहित्याचे प्रयोजन :—**

साहित्या निर्मितीमागे अनेक प्रयोजने असतात. समकालीन प्रमुख साहित्य धारा, विशिष्ट साहित्य वा सामाजिक, राजकीय चळवळीशी असलेले नाते, ग्रंथप्रकाशन व प्रसिध्दीची सुलभता, लोकप्रिय वाङ्मयप्राकर साहित्य संस्थांचे पद, मासिकाच्या संपादनाची व अन्य जबाबदारी, विविध ठिकाणाहून मिळणारी अनुदाने, मदत, विद्यावेतन, प्रवास यातून घडणारी साहित्यनिर्मिमी ती नेहमी दुय्यक दर्जाची असते असे नाही पण अशा या साहित्यनिर्मिती मागील प्रयोजनांचा शोध घेण्यास समाजशास्त्रीय दृष्टीचा उपयोग होते. तसेच ही पध्दती कोणत्याही वाङ्मय प्रकाराचा दर्जा व त्याचे प्रयोजन लक्षात घेऊनच त्यातील सामाजिकतेचा विचार करणे आवश्यक आहे असे सांगते. उदा. केतकरांच्या कादंबऱ्या, केतकरांचे महाराष्ट्रीयांचे काव्य परीक्षण किंवा आधुनिक मराठी साहित्याच्या प्रारंभकाळीच दिसणारी कोश, व्याकरण ग्रंथ यांची निर्मिती का झाली ते या पध्दतीने समजून घेता येते.

अशाप्रकारे कलाकृतीचे धागेदोरे उकलून दाखविताना कला, समाज संबंध, सांस्कृतिक अंगे या दृष्टीने कलाकृती तपासणी करण्याचे महत्त्वाचे कार्य समाजशास्त्रीय समीक्षा करू शकते. काळाच्या संदर्भात लेखकाचे स्थान व त्याच्या लेखनाची आपण तपासू शकतो.

## उत्खनन

चेतना रावेकर
एम. ए. भाग २

गौरी देशपांडे यांची 'उत्खनन' ही कादंबरी मे २००२ साली प्रसिध्द झाली. या कादंबरीची नायिका दुनिया असून ती पुरातत्त्व या विषयाची प्राध्यापिका आहे. तिला उत्खननाविषयी आवड आहे. तिला पुरातत्त्वशास्त्रात रस आहे.

दुनिया ही आपल्या आईवडिलांना एकुलती एक मुलगी होती. तिचे वडील बापू हे प्राणिशास्त्रज्ञ होते. पक्षांचा त्यांचा विशेष अभ्यास होता. आपली मुलगी दुनिया हिने शास्त्रज्ञ व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. सुरूवातीला त्योच्या म्हणण्यानुसार ती विज्ञानशाखेकडे वळली. परंतु त्यामध्ये तिला गती नव्हती. ती भरपूर अभ्यास करी, मेहनत करत असे. कशीबशी ती काठावर पास झाली आणि तिने निर्णय घेतला आर्टस् शाखेकडे वळायचे. कॉलेजमध्ये असताना तिची आणि अनंताची भेट झाली. तो दुनियापेक्षा वेगळया विचाराचा होता. दुनिया विद्यार्थीदशेत अभ्यासाला महत्त्व देणारी तर अनंताला अभ्यासात विशेष रस नव्हता. दुनिया निरर्थकपणे त्याच्या प्रेमात पडली. दुनियाने अनंताला आपल्याला दिवस गेल्याचे सांगितले आणि तेव्हापासून तो गायब झाला. तेव्हा दुनियाचे वय १८—१९ वर्षाचे होते आणि बापू आणि आईने निर्णय घेतला की या कुवार मुलीच्या अपत्याला आपल्या घरात, उजळ माथ्याने जन्माला येऊ द्यायचे. स्वीकार करायचा, मायेने वाढवायचे. एका चुकीसाठी तिची आणि तिच्या मुलीची जिंदगी बरबाद करायची नाही.

आई दुनियाला म्हणाली, 'दुनिया अनंताचा पत्ता कळला असता तर त्याला तुझ्याशी लग्न करण्यास प्रवृत्त केलं असतं. तो कोण आहे हे आम्हाला चार लोकांकडून कळलं आहे. पण खरं तर तेही करायला ते नाराज होते. तेव्हा एक प्रकारे तो गायब आहे हे ठीक आहे. तशा बळजबरीच्या लग्नात तुला सुख लाभणे शक्य नाही.' आईवडिलांना आणि दुनियालाही हे मुलं वाढविणे महत्त्वाचे वाटते. ते तसे करतातही.

यामुळे आईबापूच्या कुटुंबाला लोकांनी वाळीत टाकले होते. शनिवारी–रविवार, सणासुदीला येणारे नातेवाईक, मित्र, बापूचे सहकारी यांनी घरी यायचे बंद केले आणि मणीच्या (मुलगी) जन्मानंतर बापू, आई, दुनिया आणि मणी, सखाराम आणि कुत्री, मांजरी इतकेच त्यांचे संकुचलेले जग होते.

दुनिया परदेशामध्ये पुरातत्त्व शास्त्राचा प्रबंध लिहिण्यासाठी जाते. तेथे तिची दयालशी भेट होते. दोघांची तेथे मैत्री होते. तोही येथे संशोधनासाठी आलेला आहे. कालांतराने दयाल तिला लग्नाबाबत विचारतो. तेव्हा ती त्याला आपले जीवन सांगते हे ऐकून दयाल म्हणतो, ''तू जे सांगितलसं, त्यानंतर तर तुझ्याशी लग्न करायचा निश्चय बळकटच झालाय माझ्या मनात! अस स्वत:ला झोकून देणारी माणसं मला फार आवडतात. हेवा वाटतो मला त्यांचा.'' ('उत्खनन',पृष्ठ १८) दुनियाला दयालची भेट म्हणजे गेल्या जन्माने ऋणानुबंध वाटतात. तर दयाल हे नाकाराणारा आहे.

दयाल बापू, आई, मणी यांना भेटतो. दुनिया मणीला दयालशी ओळख करून देते, आणि दाल मणीला वडील म्हणून पसंत आहे हे तिला विचारतात, तेव्हा ती आनंदाने स्वीकार करते. दयालने पहिल्या भेटीतच मणीला आपलेसे केले होते. मणी ही स्वतंत्र विचारसरणीची आहे. हुशार आहे. मणीची आणि जब्बारची दोस्ती होते. मणी उशिराने का होईना कुणाशी तरी लग्नाला तयार आहे. यामुळे दुनियाला बरे वाटतं एकदा ती जब्बारला हसून म्हणते, ''बरा मणीचं 'आप्पू–आप्पू' चालवून घेतोस! यावर तो म्हणाला, ''तिच्या त्या आप्पूनं तुमचं बापू–बापू चालवून घेतलं ना, तसंच! आणि नुसताच आप्पू नाही तर इतरही काय–काय, कोण–कोण घेतो की चालवून!'' ('उत्खनन',पृष्ठ ५) त्यांच्या दोघींच्या रोखाने खोचकपणे बोलला. जब्बारशी लग्न करशीलसं वाटलं होतं!'' यावर ती म्हणते, आई, अर्णव मला फार्फार आवडतो. आय लव्ह हिम! बट ही इज नॉट सेक्सी!'' ('उत्खनन',पृष्ठ १४) हा मणीच्या बोलण्याचा परखडपणाच येथे दिसून येतो.

आयुष्याचे श्रेय म्हणून आपल्या आवडीचे काम करत असताना स्त्रियांच्या वाटयाला अनेक कटकटी, वैफल्ये येत असतात आणि त्यातूनच त्या सहारा शोधत असतात. अभयाची, अर्णव, सती, तीर्थकर आणि मणीची गट्टी जमते. कुठल्याही सुखदु:खाच्या प्रसंगात ही कुटुंब एकमेकांना आधार देतात. जब्बार आणि मणीच्या लग्नाबाबत ताणांना सुरूवात झाली होती. मणीला लग्न न करता संसार थाटायचा होता. या गोष्टीला दयालची संमती होती. मणीला मुलंबाळं नको असतात. पैशसाठी ती जब्बारवर अवलंबून नाही. ती कोणाचाही विचार करत नाही. ती कमावती आहे. पण त्याने लग्नाचा हट्टच धरला होता. शेवटी नाईलाजाने सर्वजण या गोष्टीला तयार होतात.

मणी ही जन्मत:च समजदार, शहाणी आणि गंभीर वृत्तीची होती. किती प्रसंगामध्ये दुनिया तिची आई असून तीच तिची आई झालेली होती. धुसफूस, आदळआपट, रडारड, चिडचिड हे तिच्या गावीच नव्हते. पण कधी कधी तसे प्रसंग येऊनही हर्षनंदाने नाचणे नव्हते. हेच तिचे वेगळेपण होते.

कालांतराने जब्बारला सोडून मणी अप्पू आणि दुनियाकडे राहायला येते. दुनियाला वाटते की चार लोकांसारखा संसार सुरळीत चालावा पण मणी चार लोकासारखी सामान्य विचारांची नाही. जब्बार हा एका जाहिरात कंपनीचा आर्ट–डायरेक्टर, त्याच्यामध्ये प्रौढी आहे पण तरीही तो मणी माहेरी येऊन राहिल्यानंतर दुनियाशी हुज्जत घालायचा. मणी आणि दयाल तिला त्याच्यांकडे दुर्लक्ष करायला सांगायचे.

दुनियाला दयाल भेटला व तो बापू, आई, मणी या सर्वामध्ये सामावून गेला. त्यामुळे ते समाधानी होते. दुनियाचे आईवडील थकले होते. बापूच्या आणि आईच्या संसारामध्ये दुनिया आणि मणी वाढत असताना तिला दोघींमध्ये पिढीचा फरक जाणवला नाही. बापूच्या घरी त्या दोघीही घरच्या मुली म्हणून वाढल्या. मणीचे आईपण करायचे ते आईने सर्व केले. दुनियाला आपण

मणीची मोठी बहीण आहोत असे वाटायचे. तशी कधी सावत्र बहीण असल्यासारखे कारण मणीला नेहमी झुकते माप असायचे. त्या एकमेकीच्या बहिणी, मैत्रिणी व मायलेकीही होत्या. पण नंतर मणी दयालच्या बरोबरीने काम करायला लागली. मणी एक स्वयंभू होती. स्वयंसिध्दही, स्वयंपूर्ण पण आत्मग्न, आत्मतुष्ट नव्हती. आपले विचार, भावना, त्रास–मन:स्ताप, जय–पराजय, सारे ती मनात ठेवून ते पचवून त्यावर विचार करून कधी काही म्हणाचे, ज करायचे ते ठामपणे मांडत असे, करत असे. तिच्यामध्ये आत्मविश्वास होता. त्यामुळे ती यशस्वी डॉक्टर झाली होती. पण मणी आणि जब्बारचं पटत नव्हतं आणि ती माहेरी होती याची दुनियाला खंत होती. आपल्याला जसा आईबापू, मणीला समजावून घेणारा दयाल भेटला आणि सर्वांचे आयुष्य बदलून गेले. अधिक समृध्द झाले. तसं मणीला कोणीतरी भेटावे ही दुनियाची इच्छा होती.

विभागप्रमुख होण्याचा दुनियाचा हक्क असताना तिला डावलले जाते. परंतु दुनिया त्याबाबत संघर्ष करत नाही. दुनियाला वाटते मणीला मुलंबाळं व्हावीत. दुनिया मणीला विचारते की, ''आपल्याला मुलं व्हावीत असं खरंच वाटत नाही मणी तुला ?'' यावर ती म्हणते, ''आत्ता तरी नाही आणि लवकरच मी पस्तीस वर्षाची होईन. जर ताबडतोबीनं मूल झालं नाही, तर फार उशीर झाला. मग मेडिकलीसुध्दा ती रिस्क आहे आणि आता म्हणशील तर मी इतकी उद्योगात आहे. की मुलाला द्यायला लागतो तेवढा वेळ काढणं मला शक्य नाही. इतकी सगळी मुलं पडलीयत जगात, त्यांच्यात माझ्यात मुलांची भर टाकल्यानं काय फरक पडणारेय ?'' ('उत्खनन',पृष्ठ ४७) मुलाबाळापेक्षा आपल्या कर्तृत्वशक्तीला मणी महत्त्व देते. मणी पुढे जब्बार बरोबर राहते, परंतु दोघांचे पटत नाही. जब्बार तसा विचित्र स्वभावाचा तीर्थकारच, अर्णवच आणि खुद्द तिचं बापूवरचं प्रेमही डाचत राहते. जब्बार आणि मणी यांच्यामध्ये निर्माण झालेल्या वितुष्टामुळे दयालला वाईट वाटते. दुनिया, दयाल आणि मणीमध्ये समाधानी असते. अचानक खूप दिवसांनी अनंताचे पत्र येते. आनंता ब्रेनट्यूमरने आजारी आहे. त्याला दुनियेला भेटण्याची इच्छा असते. पण ती अनंताच्या पत्राने हादरून जाते. पत्र वाचून झाल्यावर मणी, तिला विचारते 'कोणाचं पत्र आहे.' त्यावर ती म्हणते, 'तुझ्या वडिलांचे तुझ्या जन्मदात्या बापाच.' पण मणीच्या जन्माला कारण ठरलेल्या अनंताला ती बाप म्हणून स्वीकारू शकत नाही. पण ती आणि दयाल त्यावर उपचार करण्यासाठी तयार असतात. आणि दुनिया अनंताला बोलवून घेते, त्याल अखेरच्या दिवसात आपली आठवण आली यातच ती सुख मानते. अर्थात ती आपल्या जुन्या मित्राला विसरू शकत नाही.

दयालला तर त्याच्या भेटीची उत्सुकता होतीच. तो म्हणाला, ''वा! आता अखेर भेटणारा तर हा ग्रेट माणूस मला! दुनिया, तुझ्या–माझ्यातले उत्कृष्ट गुण तिच्यात, आहेत. हे वगळता मणीमध्ये एक प्रकारचा वेडगळ धाडसीपणा आहे, त्याचा हाच जनक.'' ('उत्खनन',पृष्ठ ८२) येथे आपल्याला दयालच्या मनाचा मोठेपणा दिसतो. शेवटी अनंताही दुनियेच्या कुटुंबात मिसळून जातो. अनंता आणि अर्णवच चांगलच जमतं परंतु जब्बार घरी आल्यावर ''मात्र आत्तात जा तुम्ही आणि परत येऊ नका'' असं सांगायला अनंता मागे पुढे पाहत नाही. पण मणी आणि अर्णवची वाढणारी मैत्री सर्वांच्या लक्षात येते आणि जब्बारला ती खुपतच असते. तो दुनियावर आरोप करतो. आपल्या अक्करमाशा मुलीला आमच्या गळ्यात बांधली म्हणून दोष देतो. पण दुनियाला याच काही वाटत नाही.

कांदबरीच्या शेवटी अनंता दुनियाचे ऐकतो आणि सर्जरी करून घ्यायला तयार होतो. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करून घेतल्यावर दयाळ आणि मणी दोघांची मुद्दाम एकांतात भेट घडवून आणतात. इतके दयाल आणि मणी आधुनिक विचाराचे आहेत. नंतर मणी आणि दयाल अनंतावर सर्जरी करतात. असे या कादंबरीचे कथानक आहे.

# मराठी साहित्यातील स्त्री

जयश्री कोकांडे
एम. ए. भाग २

भारतीय राज्यघटनेचे पंधरावे कलम सांगते की, स्त्री व पुरूष असा कोणताही भेदभाव भारतराष्ट्र करणार नाही; परंतु प्रत्यक्षात आजही सर्व क्षेत्रात स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. स्त्रीला विकासासाठी दाही दिशा मोकळया आहेत, असे सांगितले जाते, पण तरीही ठिकठिकाणी, 'लक्ष्मण रेषा' आहेतच.

समाजिक, आर्थिक गुलामगिरीने ग्रासलेल्या या समाजाचे स्वरूप एकसंघ नाही. एकात्म नाही. जात–पात–वर्ग–वर्ण यांचे अधिष्ठान असलेल्या या समाजव्यवस्थेत सर्व स्तरातील स्त्री अद्याप गुलामाचे जीणे जगत आहे. चूल, मूल घर यांच्या जबाबदाऱ्याचे ओझे घेऊन जगत आलेली स्त्री अजूनही एका कोंडलेल्या जगातच आहे. तिचा गतकाळ अनंत यातनांनी भरलेला होता. तर वर्तमानकाळ अशांतीचा, अपेक्षाभंगाचा, असमाधानाचा, असुरक्षिततेचा आहे. अशा परिस्थितीतून स्त्रिया आपल्या हक्कासाठी रस्त्यावर येत आहेत. संघटित होत आहेत. शहरातून ग्रामीण भागापर्यंत, डोंगरकपारीत स्त्रियांच्या संघटना जन्माला येत आहेत. शिक्षण, अर्थार्जन आदी कारणांसाठी स्त्री बाहेर पडत आहे. कोंडलेल्या जगात जगत असताना तिला आपल्या बुध्दीची, मनाची, शक्ती किती मोठी आहे याचे भान नव्हते, पण आता ती नव्या संस्कृतीच्या निर्मितीसाठी उंबरठयाबाहेर आली आहे.

पुरूषांप्रमाणे स्त्रीदेखील एक माणूस आहे. तिला देहाप्रमाणे मनही आहे. या जाणिवेचा उदय आता तिच्यात झाल आहे आणि त्या जाणिवेतूनच आता ती लिहू लागली आहे; बोलू लागली आहे. स्त्रियांनी आजवर जे भोगलं त्याचे प्रतिबिंब या लिखाणातून उमटू लागलं ते कथा, कविता, कादंबरी किंवा आत्मचरित्रात्मक लिखाणतून जनतेसमोर आले. या लिखाणलाच 'साहित्य' असे नाव पडले.

स्त्रियांच्या वेगवेगळया प्रश्नामधून उदयाला आलेल्या साहित्य प्रकारामध्ये

१) स्त्रियांच्या कथा
२) स्त्रियांच्या कविता
३) स्त्रियांची आत्मचरित्रे
४) कादंबरी

यांचा समावेश आहे.

**१) स्त्रियांचे कथालेखन** :–स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रीला सर्व क्षेत्रे मोकळी झाली असली तरी आजवर भोगलेल्या सर्व दु:खांचे, अन्याय, अत्याचारांचे चित्रण ती कथा लेखनातून यापूर्वीही करत होती. अशा प्रकारचे लिखाण करणाऱ्या बहुसंख्य स्त्रिया पांढरपेशा, उच्चजातीय व मध्यमवर्गातील होत्या. प्रारंभीच्या काळात जेव्हा स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने लिहून लागल्या तेव्हा त्यांचे कौतुक झाले. पण नंतर मात्र या लिखाणातील फोलपणा वाचकांच्याही लक्षात येऊ लागला. त्यामुळे मातीशी नाते न सांगणारे, वास्तवाचे चित्रण न करणारे असे काल्पनिक लिखाण फार काळ तग धरू शकले नाही.

**२) स्त्रीची पारंपारिक प्रतिमा** :–प्रारंभीच्या कथालेखिकांच्या साहित्यातून कौटुबिंक जबाबदाऱ्या पार पाडताना मेटाकुटीस येत असलेली, मुला–बाळांसाठी खस्ता खाणारी, पै–पाहुण्यांची वर्दळ सांभाळणारी, वडिलधाऱ्यांच्या मर्जीने वागून वैचारिक स्वातंत्र्य हरवून बसलेली, पतीकडून असहकार्य व उपेक्षा वाटयाला शारीरिक अस्वास्थ्य व मानसिक कुंचबना निमूटपणे सहन करणाऱ्या स्त्रीची प्रतिमा रंगविली जात होती. आजही अशाच प्रकारचे चित्रण कथा कादंबऱ्यांमधून बहुअंशी दिसते. अशा पध्दतीने स्त्रीची भूमिका रंगविल्यामुळे या साहित्याचा पतरवर्तनाच्या चळवळीला फारसा उपयोग झाला नाही. मराठी लेखिकांच्या बाबतीत 'इमर्सन' म्हणतो की, 'Every wall ia s

door'या लेखिका अशा तटबंदीच्या चार भिंतीच्या आत आहेत. या भिंतीतच त्यांनी दारे शोधली पाहिजेत; परंतु त्यासाठी मराठी लेखिकांना विद्रोहाची भूमिका घ्यावी लागणार आहे. यासाठी त्यांना असुरक्षिततेची भिंग तोंडून, स्वास्थ्याच्या कोशातून बाहेर येण्याची गरज आहे.

काशीबाई कानिटकर या मराठीतील पहिल्या लेखिका महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री डॉक्टर आनंदीबाई जोशी यांचे चरित्र काशिबाईनीच लिहिले आहे. या काळात त्यांनी तत्कालीन वृत्तपत्रांतून सामाजिक प्रश्नांवर स्फुट लेखन, वाङ्मयीन ग्रंथाचे परिक्षणही केले होते. त्यांच्याबरोबरच्या सर्व स्त्रिया स्वयंपाकघरात अडकवलेल्या असताना काशीबाई 'मथुराबाईची करूण कथा' या माध्यमातून नवऱ्याने टाकून दिलेल्या स्त्रियांचे प्रश्न व त्याचा कोंडमारा जनतेसमोर मांडला होता. त्यानंतर १८९६ मध्ये 'बिचारी आनंदीबाई' या नावाने 'मनोरंजन' मध्ये शांताबाई या लेखिकेने कथा लिहिली होती. १८९५ ते १९२० या काळात लक्ष्मीबाई अभ्यंकर यांचा 'सद्यस्थिती' हा एकमेव कथासंग्रह प्रसिध्द झाला. याशिवाय काशीबाईच्या काळात वामनसुता, सुवासिनी, ताराबाई तर्खड, हिराबाई पेडणेकर, कमलबाई किबे या कथालेखिका होत्या.

# चांगले आरोग्य


विक्की रंगारी

B.A.II


चांगले आरोग्य म्हणजे काय याची नुसती व्याख्या करणे सोपे आहे. पण आपल्या दैनंदिन आयुष्यात चांगले आरोग्य ही एक गुंतागुंतीची गोषृट होऊन बसली आहे. याचे मुख्य कारण मळ म्हणजे आधुक जीवन जगण्यासाठी आरोग्याला बस बाधा असणा-या कितीतरी गोष्टी आपल्या कराव्या लागतात. त्या टाळता येत नाहीत. म्हूणूनच उत्तर आरोग्य कसे राखायचे हे प्रश्नचिन्ह सर्वांना भेडसवत आहे. अर्थात उत्तम आरोग्याची व्याख्या करणे ही सापेक्ष असणार. निरनिराळृ तज्ज्ञांची याबाबत निरनिराळी मतज असणार. निरनिराळ्या उत्तम आरोग्य मापायची नेमकी मोजपअ अजूर सापडलेली नाही, ज्या माणसास जीवश जीन विपूलता असते व जो काण्त्याही रोगापासून मुक्त असतो त्याचे आरोग्य चांगले, अशी योगशास्त्रात चांगल्या आरोग्याची व्याखय केलेली आहे. तसेच शरीराची जर रोज काळती घेतली नाहत तर आरोग्य टिकणार नाही, असाही इशारा योगधा शास्त्रशुद्ध योगशास्त दिला ओह. चांगले आरोग्य मळ म्हणजे काय हे समजण्यासाठी प्रथम आपण अनरोगयाी कारणे व पिरि परिणाम समजून घेतले पाहिज. शकधीकधी वंशपं वंशपरंपरागत काही प्रकृती दोष प्रवास करतात. आु आत आजुबाजूचे अव

# Ethics in Research : A Perspective

Madhuri Thote
B. A. I

Ethics is the branch of Philosophy Morality and ethics are two sides of one coin Ethics can not be taught but only can be practised The vast majority of scientists doing research have had no formal training in research ethics. Students have been poorly mentored in research ethics, and faculty who were trained by the same methods may themselves be lacking an ethics education.

Conventional wisdom that may or may not be handed down from mentor to student probably differs widely from laboratory to laboratory. There are many other activities that the government does not define as "misconduct" but which are still regarded by most researchers as unethical. These are sometimes referred to as "other deviations" from acceptable research practices and include: Publishing the same paper in two different journals without telling the editors Submitting the same paper to different journals without telling the editors

Plagiarism is taking another's work and passing it off as your own. In a broad sense we are all guilty of plagiarism many times each day. We often take ideas from others and don't attribute them to their original source. More often than not we don't even know the original source!

When we talk about the decline and fall of the Roman Empire or say, "To be or not to be, that is the question" in normal conversation, we rarely attribute the words to Gibbon and Shakespeare respectively. True plagiarism is, quite bluntly, stealing. Sometimes a person just copies text word for word from a book or article and pretends that he is the author. Or buys an already written paper on the web.These are quite deliberate aims to deceive. One should always provide references for any statistics,graphs,tables,numbers, etc. that one wishes to use in one's own paper. Thus, it isn't just the words of another person's ideas that one should reference.Make sure that you write it precisely, word-for-word as in the original. Also essential that you enclose the quoted text in quotation marks. Failing to put someone else's direct text in quotation marks and crediting the author, may lead to accusations of plagiarism.

It's often preferable to take down the substance of an author's idea in your own words, i.e. to paraphrase. The greater part of your paper should be in your own words with appropriate documentation of the ideas of others.Of course, some direct quotation is fine – but always with citation. Many instances of plagiarism stem from sloppy research rather than through a deliberate desire to cheat. Many students during the research process take bad notes, e.g. they write down someone else's text *verbatim* but forget to include the quotation marks. Later when they are writing the actual paper and they refer to their notes, they fail to remember that the text is another author's and not their own. A reader who recognizes the original text might think that the student has cheated. And this may lead to tough penalties. So, the golden rule is to take excellent notes, write your whole paper yourself and to document your sources as well and as honestly as possible.It is not necessary to document every single statement. One need not give a reference for stating that President John F. Kennedy was assassinated in 1963. This fact is common knowledge and belongs in the public domain.

However, if you are referring to Historian X's thesis that Kennedy was killed by a crime syndicate and not by Lee Harvey Oswald, proper citation to such a theory is requisite.Research involving human subjects in the Medical, Social and Behavioral Sciences poses complex ethical issues. It requires careful thought and consideration on the part of both researchers and research participants.

## GANDHIJI AND VEGETARIANISM

Nikhil Bhende
B. A. III

Man requires food which can supply issue building substance to provide for the growth and daily wear and tear of the body. Tissue building substances are known as proteins. They are obtained from milk, meat, eggs, pulses and nuts. The proteins contained in milk and meat are easily digestible and assailable and also more valuable than vegetable proteins. Milk is superior to meat. For vegetarians milk, being the only source of animal proteins, is a very important, is a very important article of diet. The chief function of milk is to supply animal proteins for tissue repair. Gandhiji gives the second place to cereals : wheat, rice, bajari, etc. Different cereals are used as staple In different provinces of India. In many places more than one kind of cereals are eaten at the same time. This mixture is not necessary for the nourishment of the body. It makes it difficult to regulate the quantity of food intake, and puts an extra strain upon digestion. It is better to take only one at a time. Wheat may well be described as the king among the cereals. Polished rice and wheat without its pericarp, supply us with almost pure starch. Important constituents of the cereals are lost with the removal of the pericarp.

We are in the habit of dipping each morsel of the chapatti in vegetable or dal gravy before eating it. The result is that most people swallow their food without proper mastication. Mastication ensures a through mixing of food with saliva. Everybody seems to think that pulses are an essential constituent of diet. Those who have to do hard manual work and cannot afford to drink milk, cannot do without pulses. Clerks, Businessmen, Lawyers, Dotprs. Teachers and those who are not too poor to b7uy milk, do not require pulses. Pulses are generally considered to be difficult to digest.

Gandhiji gives the third place to vegetables and fruits. Among fresh vegetables, a fair amount of leafy vegetables must be taken every day. A fair helping of ordinary fresh vegetables if advisable. Our daily diet should include the available fruits of the season, e.g. mangoes, jambu, guavas, grapes, papayas, lime, oranges, mooosambi, etc., should all be used in their season. The best time for taking fruits is in the early morning. A breakfast of fruit and milk should give full satisfaction. Banana is a good fruit. Milk and banana make a perfect meal. A certain amount of fat is also necessary. This can be had in the form of ghee or oil. If ghee can be had, oil becomes unnecessary. It is difficult to digest and is not so nourishing as pure ghee. Among oils, sweet oil, groundnut oil and coconut oil should be given preference. Oil must be fresh. If available, it is better to use hand-pressed Oil. A certain amount of sugar is necessary. If one cannot get sweet fruits, sugar may become a necessity. But the undue prominence given to sweet thi9ngs nowadays is wrong.

Because of our wrong habits and artificial way of living. Very few people know what their system require. Our parents who brings us into this world do not, as

a rule, cultivate self-control. Their habits ad their way of livig influence the children to a certain cities some people keep on nibbling from time to time. This habit is harmful. The digestive apparatus requires rest. Dieticians are of opinion that the inclusion of a small quantity of raw vegetables like cucumber, vegetable marrow, pumpkin, gourd, etc., I one's menu is ,more beneficial to health than the eating of large quantities of the same cooked. Ghadhiji does not regard flesh-food as necessary for us at any stage and under any climate in which it is possible for human being ordinarily to live. Vegetarianism is one of the priceless gifts of Hinduism. One should eat not in order to please but just to keep the body going Mr. Henry Salt's book, a plea for Vegetarianism showed Gandhiji why apart from a hereditary habit, and apart form his adherence to a vow administered to him by his mother, it was right to be a vegetarian not to live upon fellow animals.

